म. ग्रं. सं. ठाणें
विषय वाङ्मय
सं. क्र. २५८
१९९३
REFBK-0000857

# बादशहा सातवे एडवर्ड

## यांचें संक्षिप्त चरित्र.

"अहह महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः।
भर्तृहरि.

लेखक

वामन कृष्ण तुळपुळे,

हेडमास्तर लोकलबोर्ड स्कूल गढागार. ता. चिपळूण, जि. रत्नागिरी.

REFBK-0000857

मालक, 'नवीन किताबखाना' पुणें.

१९१३.

किंमत १२ आणे.

ह्या पुस्तकाचीं १–९६ पृष्ठें पुणें एथें ' जगद्धितेच्छु ' छापखान्यांत, व बाकीचीं सर्व पृष्ठें पुणें एथें 'इंदिरा' छापखान्यांत छापिलीं आहेत.

[ हें पुस्तक इ० स० १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून सर्व प्रकारचे हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. ]

म. ग्रं. सं. ठाणें

# प्रस्तावना.

—:*:—

आपले परमपूज्य बादशहा सातवे एडवर्ड हे हयात असतां त्यांचें चरित्र लिहून तें मुलांच्या हातीं द्यावें असा हेतु धरून हें लहानसें चरित्र लिहिण्यास मीं सुरवात केली होती. परंतु त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें तो माझा हेतु सिद्धीस गेला नाहीं. ह्यामुळें मनाला फार वाईट वाटतें; तरी एकदां हातीं घेतलेलें काम तसेंच अर्धवट सोडून देणें बरें नाहीं असें वाटल्यावरून त्यासच आणखी शेवटचीं कांहीं प्रकरणें जोडून हें लहानसें चरित्र पुरें केलें आहे. आपल्या राजाविषयीं प्रेम बाळगणें, त्याच्यावर भक्ति ठेवणें व त्याची आज्ञा किंवा त्यानें केलेले कायदे शिरसा वंद्य मानणें हे गुण हिंदुस्तानवासी लोकांच्या अंगीं स्वभावसिद्धच आहेत. ईश्वरांशावांचून राजत्व प्राप्त होत नाहीं; देवाप्रमाणेंच राजाच्या अंगीं सामर्थ्य असतें; वगैरे प्रकारची त्यांची समजूत " राजा कालस्य कारणम् ", " राजा करील ती पूर्वदिशा; " इत्यादि रूढ वचनांवरून दृढ झालेली आहे असें दिसतें. आपले पौराणिक ग्रंथ पाहिले तरी त्यांत राजे लोकांच्याच गोष्टी लिहिलेल्या असतात व त्यांत वरील तत्त्वच प्रतिपादन केल्याचें दिसून येतें. तसेंच

आपला अलीकडचा इतिहास पाहिला तरी राजा कसाही असो त्याच्याविषयीं प्रजेच्या मनांत आदरच वसत असल्याचें दिसून येतें. केवळ प्रजा राजाच्या विरुद्ध होऊन त्यांनीं त्याच्या विरुद्ध कांहीं कारस्थानें केल्याचें फारसें नव्हे तर मुळींच दिसून येत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. राजे लोकांविषयींच्या गोष्टी वाचणें किंवा ऐकणें यांतच धन्यता मानावयाची असा आमचा स्वभावच बनलेला आहे. तशांत राजा आवडता असला तर त्याचें चरित्र वाचण्याकडे लोकांचा ओढा जास्त असणें स्वाभाविकच आहे. इंग्रज प्रभूच्या साम्राज्यांत हा आमचा देश सामील झाल्यापासून ह्या देशाची झालेली भरभराट, सर्वत्र शांतता झाल्यामुळें सर्वांना मिळत असलेलें सुख व समाधान, इंग्रज प्रभूची न्यायप्रियता इत्यादि गोष्टींमुळें इंग्रज प्रभूविषयीं आम्हां लोकांचें मन प्रेमळ बनलें असल्यामुळें हा माझा प्रयत्न सर्व लोकांस आवडेल व ते मोठ्या प्रेमानें हें पुस्तक वाचतील असा मला भरंवसा आहे.

मला इंग्रजी भाषेचें ज्ञान असतें तर ह्या पुस्तकास लागणारी माहिती विपुल मिळाली असती, व हें पुस्तक निराळ्या तऱ्हेनें लिहिण्याचा प्रयत्न मला करतां आला असता. परंतु इंग्रजी भाषेंतील पुस्तकांचा उपयोग मला करतां न आल्यामुळें मराठी, गुजराथी, व हिंदी या देशी भाषांत मिळालेल्या अल्प साधनांचा उपयोग करून हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे.

हें पुस्तक लिहिण्यांत असा एक हेतु आहे कीं, प्राथमिक शाळांतील मुलांच्या हातीं हें पुस्तक दिल्यास ह्या पुस्तकाच्या वाचनानें त्यांच्या मनांत आपल्या राजाविषयीं पूज्यबुद्धि व निष्ठा उत्पन्न होऊन त्यांच्या गुणांचें अनुकरण करण्याची बुद्धि त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावी; आणि अशा रीतीनें तीं राजनिष्ठ व नीतिमान् बनावीं.

पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्टांत आपले नवे बादशहा पांचवे जार्ज यांचें चरित्र देणें अवश्य वाटल्यावरून तें फार थोडक्यांत लिहिलें आहे.

हें पुस्तक लिहितांना मराठी, गुजराथी व हिंदी या भाषांतील वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें वगैरे साधनांचा मला फार उपयोग झाला. ह्याकरितां मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच ज्या मार्मिक गृहस्थांनीं माझा हस्तलेख वाचून मला उत्तेजन दिलें, त्यांचेही मजवर मोठे उपकार झाले आहेत.


शेवटीं, प्रकाशक, रा. रा. हरि कृष्ण दामले, पुणें एथील नवीन किताबखान्याचे मालक, ह्यांनीं ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचे कामीं जें मोठ्या आस्थेनें साहाय्य केलें, त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें हें माझें अवश्य कर्तव्य आहे. ह्या पुस्तकाची विक्रीस तयार झालेली प्रत त्यांच्या नजरेस पडली नाहीं, ही मात्र मोठी शोचनीय गोष्ट होय !

पुस्तककर्ता.

ठाणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ कुलवृत्त. | १ |
| २ बालपण व शिक्षण. | ९ |
| ३ अमेरिकेचा प्रवास. | १९ |
| ४ पितृवियोग व येरुशलेमची यात्रा. | २२ |
| ५ विवाह. | २६ |
| ६ युरोपांतील प्रवास, आजार वगैरे. | ३२ |
| ७ हिंदुस्तानचा प्रवास व मातृवियोग. | ३७ |
| ८ राज्याभिषेक व दिल्लीदरबार. | ५१ |
| ९ कारकीर्द व मृत्यु. | ६५ |
| १० कार्यक्षमता, स्वभाव वगैरे. | ८४ |
| ११ उपसंहार. | ९८ |
| परिशिष्टें. | |
| १ राणीचा जाहीरनामा. | १०३ |
| २ सातवे एडवर्ड बादशहा यांचा जाहीरनामा. | ११० |
| ३ बादशहा पांचवे जार्ज यांचें संक्षिप्त चरित्र. | १११ |


पृथ्वीचा नकाशा.
सूचना.
ब्रिटिश प्रदेशांचा रंग
आर्टिक महासागर
ग्रीनलंड
अलास्का
उत्तर
कानडाचें राज्य
अमेरिका
युनायटेड स्टेटस
अटलांटिक महा सागर
पासिफिक महासागर
आफ्रिका
इराण
अरबी समुद्र
हिंदी महासागर
उत्तरध्रुववृत्त
कर्कवृत्त
विषुववृत्त
मकरवृत्त
जपान
ब्राझिल
पश्चिम ऑस्ट्रेलिया
लंडन
पारीस
रोम
B.P W. POONA CITY.

# बादशाह सातवे एडवर्ड यांचें संक्षिप्त चरित्र.

## प्रकरण १ लें.

### कुलवृत्त.

जेथ जेथ संपत्ति आणि दया
दोन्ही वसती आलिया ठाया।
ते ते जाण धनंजया
विभूति माझी ॥ १ ॥

ज्ञानेश्वरी अ० १०.

जगाच्या रहाटीकडे पाहिलें तर आपणास असें दिसून येईल कीं, सर्व मनुष्यांचें स्वरूप अथवा सामान्यधर्म एकच असून त्यांच्या योग्यतेंत मात्र सारखेपणा दिसत नाहीं. ह्याचें कारण काय असावें? ह्या प्रश्नाचें उत्तर अनेक प्रकारांनीं देतां

येईल. पण वरच्या ओवीमध्यें दिलेलें उत्तर बरेंच समर्पक आहे असें वाटतें. असो. आपल्या हिंदु लोकांच्या समजुतीप्रमाणें आपला जो राजा असेल तो सर्वांत श्रेष्ठ असा मानला जाऊन त्याची आज्ञा शिरसावंद्य मानण्याचा व त्याच्या ठिकाणीं निष्ठा ठेवण्याचा गुण आपल्या आंगवळणींच पडलेला आहे. ईश्वरी इच्छेनें ज्या राजाच्या अमलाखालीं आपण असतों त्याच्याशीं एकनिष्ठ-पणें वागण्याबद्दल आपणा हिंदुस्तानवासी लोकांना कधीं शिकवावें लागत नाहीं. आपल्या आंगीं स्वभावतःच ह्या गुणाचें वास्तव्य आहे. आपल्या मराठी भाषेंत " राजा करील ती पूर्व दिशा " अशी एक म्हण प्रचलित आहे. यावरून राजाच्या मोठेपणावर आपला किती विश्वास असतो हें दिसून येईल. तसेंच " ना विष्णुः पृथिवीपतिः " या वाक्यावरूनही राजाला ईश्वरांश मानण्याची आपली फार प्राचीन काळापासून वहिवाट आहे; मग तो राजा कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असला तरी हरकत नाहीं. हिंदु साम्राज्याचा शेवट होऊन मुसलमानी साम्राज्य झालें; कांहीं शतकांनीं मुसलमानी साम्राज्यास उतरती कळा आली, तेव्हां पुनः हिंदु साम्राज्य स्थापन होण्याची आशा लोकांस वाटूं लागली; पण ईश्वरी इच्छा कांहीं निराळीच असल्यामुळें त्या हिंदु साम्राज्याचा नाश होऊन इंग्रजी साम्राज्याच्या कृपाछत्राखालीं हा हिंदुस्तान देश सुखसमाधान, शांतता व सुधारणा ह्यांचा अनुभव घेऊं लागला. हीं ह्या आपल्या देशावर ईश्वराची कृपाच झाली असें मानिलें पाहिजे. कारण इंग्रजी साम्राज्य ह्या देशावर होण्याच्या सुमारास आपल्या देशाची स्थिति फार चमत्कारिक झाली होती; स्वजा-तीच्या अभिमानामुळें आपआपसांत वैमनस्य वाढत चाललें होतें;



महाराणी व्हिक्टोरिया. (पृष्ठ ३)

The Bombay Art Printing Work, Fort.

धर्मश्रद्धा नाहींशी होत होती; व जातीजातींतही एकोपा राहिला नव्हता: अशा अव्यवस्थित स्थितींत सर्व समाजाला आळा घालील असाच कोणी तरी सर्वसमर्थ प्रभु पाहिजे होता, आणि ही जरुरी लक्षांत आणूनच ईश्वरानें हा हिंदुस्तान देश सर्वसमर्थ अशा इंग्रज प्रभूच्या अमलाखालीं दिला, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. याबद्दल आपण ईश्वराचे आभार मानिले पाहिजेत.

इंग्रजांचें राज्य हिंदुस्तानांत सुरू झाल्याबरोबर पहिली अव्यवस्था हळू हळू नाहींशी होऊन सर्वत्र सुव्यवस्था व शांतता झाल्यामुळें सर्व लोकांस समाधान वाटूं लागलें व इंग्रज लोकांविषयीं परकेपणाचा भाव त्यांचे मनांतून जात चालला. पूर्वींच्या स्वदेशीय राजांबद्दल जसा प्रेमभाव व पूज्यबुद्धि प्रजेच्या मनांत वागत होती, त्याचप्रमाणें इंग्रज प्रभूविषयींही हिंदुस्तानवासी लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि व प्रेम वसत आहे. परलोकवासी **एडवर्ड बादशाह** यांजवर असलेलें हिंदी प्रजेचें प्रेम व भक्ति प्रसिद्धच आहे. त्यांच्या निधनानें हिंदी प्रजेस अतिशय दु:ख झालें. अशा त्या सर्वमान्य बादशाहांचें संक्षिप्त चरित्र लिहावें असा या पुस्तकाचा हेतु आहे. त्यांचें चरित्र लिहिण्यास आरंभ करण्यापूर्वीं त्यांच्या परम पूज्य मातोश्री **महाराणी व्हिक्टोरिया** यांच्या कारकीर्दीचा उल्लेख करणें योग्य असें वाटल्यावरून या प्रकरणांत त्यांच्या कारकीर्दीचें थोडक्यांत वर्णन केलें आहे.

इंग्लंडचा राजा चौथा विल्यम मरण पावल्यानंतर इसवी सन १८३७ च्या जून महिन्याच्या विसाव्या तारखेस परम भाग्यशाली **महाराणी व्हिक्टोरिया** यांस इंग्लंडच्या कायद्यास अनुसरून गादीवर बसविण्यांत आलें. त्या वेळीं त्यांचें वय सारें अठरा वर्षांचें

होतें. तथापि लार्ड मेलबोर्न वगैरे पोक्त प्रधानांच्या मदतीनें राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालला होता. पुढें इ० स० १८४० च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यांचा विवाह जर्मनींतील राजपुत्र **प्रिन्स आल्बर्ट** यांजबरोबर झाला. लग्न झाल्यानंतर त्यांस चार मुलगें व पांच मुली अशीं नऊ अपत्यें झालीं. लग्न झाल्यापासून राज्यकारभार पाहण्याच्या कामीं त्यांच्या सद्गुणी पतीची त्यांस फार मदत होऊं लागली. प्रिन्स आल्बर्ट यांच्या चांगल्या सल्लामसलतीनें महाराणी व्हिक्टोरिया व प्रधानमंडळ यांतील राजकीय संबंध समाधानकारक राहिला, आणि देशांतील राज्यकारभारांत चांगली सुधारणा झाली.

हिंदुस्तानांत शिक्षणाचा जो चांगला परिणाम सध्यां लोकांना दिसत आहे, त्या शिक्षण देण्याच्या उदारपणाच्या ठरावास महाराणी व्हिक्टोरिया गादीवर बसल्यानंतर दोन वर्षांनीं मूर्त स्वरूप आलें. हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल लार्ड विल्यम बेंटिक यांनीं आरंभीं उदारपणानें हिंदुस्तानच्या प्रजेस कांहीं देणग्या दिल्या, त्यांत हिंदुस्तानच्या लोकांस शिक्षण देण्याविषयीं एक ठराव केला होता. त्या ठरावाच्या धोरणानें हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल लार्ड आक्लंड यांनीं इ. स. १८३९ त पुनः एक ठराव प्रसिद्ध केला, त्यांत हिंदुस्तानांत ज्या प्राचीन भाषा शिकविण्याच्या शाळा आहेत त्या सुरू ठेवाव्या, इंग्रजी शाळा स्थापन कराव्या व त्यांत इंग्रजी भाषेच्या द्वारें युरोपांतील शाळांत जे विषय शिकविले जातात ते शिकवावे, व देशभाषेंत शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळाही स्थापन कराव्या इत्यादि कलमें होतीं. या ठरावांत पुढें जरुरीप्रमाणें सुधारणा झालेल्या

आहेत. पण आज आपण ज्या शिक्षणाच्या हितकारक परिणामाचा फायदा घेत आहों त्याचें बीज महाराणी व्हिक्टोरिया गादीवर बसल्यानंतर थोड्याच वर्षांनीं लावलेलें होतें.

सांसारिक व व्यावहारिक कामांत महाराणी व्हिक्टोरिया फार चतुर असत. त्यांनीं प्रथमतः स्काटलंड, आयर्लंड वगैरे ठिकाणीं प्रवास करून आपल्या देशाची चांगली माहिती करून घेतली. नंतर जर्मनी वगैरे कित्येक देशांत प्रवास करून इतर देशांचीही माहिती करून घेतली. क्रिमियाची लढाई आणि हिंदुस्तानांतील शिपायांचें बंड हीं दोन प्रकरणें त्यांच्या मध्यम वयांत उत्पन्न झालीं. या दोन प्रकरणांमुळें इंग्लंडांतील लोकांचें लक्ष्य आपलें सैन्यबळ वाढविण्याकडे लागलें. क्रिमियाच्या लढाईंत इंग्लंडचा जय झाला व शिपायांच्या बंडाच्या वेळीं हिंदुस्तानांतील पुष्कळ संस्थानिक व प्रजा यांच्या मदतीनें व स्वतःच्या पराक्रमानें इंग्रजांनीं बंडाचा मोड केला. परंतु त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीकडून हिंदुस्तानचा राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन एका प्रधानाच्या मार्फत तो चालविण्याची योजना करण्यांत आली.

शिपायांचें बंड मोडल्यावर हिंदुस्तानांतील राजेरजवाडे व प्रजाजन यांना धीर येऊन इंग्रज सरकाराबद्दल त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न व्हावा म्हणून राणीसाहेबांकडून मोठ्या ममताळूपणानें एक जाहीरनामा सर्व हिंदुस्तानभर प्रसिद्ध करण्यांत आला. तो वाचल्यानें त्यांच्या उदार व न्यायीपणाचा अजमास करितां येतो. हा जाहीरनामा म्हणजे आपल्या हक्कांची एक सनदच आहे अशी हिंदुस्तानांतील सर्व लोकांची पक्की समजूत आहे.

पुढें एडवर्ड बादशाह ह्यांनींही ह्याचें महत्त्व कायमच राखिलें. ( हे जाहीरनामे पुस्तकाच्या शेवटीं पुरवणी रूपानें दिले आहेत. )

सन १८७७ त महाराणी व्हिक्टोरिया ह्यांनीं **कैसरे हिंद** म्हणजे हिंदुस्तानची बादशाहीण हा किताब धारण केला. त्या निमित्तानें त्या वेळचे गव्हर्नर जनरल लार्ड लिटन यांनीं हिंदुस्तानची प्राचीन राजधानी दिल्ली शहर एथें मोठ्या थाटानें दरबार भरविला. त्या वेळीं महाराणी व्हिक्टोरिया स्वतः हजर नव्हत्या; पण हिंदुस्तानावर आपली असलेली ममता व्यक्त करण्यासाठीं व त्या देशाची माहिती मिळविण्याच्या हेतूनें इसवी सन १८७० त आपले दुसरे चिरंजीव ड्यूक आफ एडिम्बरो यांस व इ. स. १८७५ त प्रिन्स आफ वेल्स ( आल्बर्ट एडवर्ड ) यांस त्यांनीं हिंदुस्तानांत पाठविलें होतें.

महाराणी व्हिक्टोरिया या राजपदावर आरूढ झाल्याला पन्नास वर्षें पुरीं झाल्याबद्दल त्यांच्या राजनिष्ठ प्रजेनें इंग्लंड व हिंदुस्तान देशांत गोल्डन ज्युबिली नांवाचा महोत्सव इ.स. १८८७ सालीं केला. त्याप्रमाणेंच इ.स. १८९७ सालींही राज्यारोहणास साठ वर्षें पुरीं झाल्याच्या आनंदाबद्दल डायमंड ज्युबिली नांवाचा महोत्सव करण्यांत आला. पुढें थोड्याच दिवसांनीं ट्रान्सवालच्या प्रजासत्ताक राज्याबरोबर लढाई करण्याचा प्रसंग आला. त्या लढाईंत उभय पक्षांतील शिपाई फार मारले गेले. हें पाहून त्यांच्या मनास फार वाईट वाटलें. शेवटीं इ. स. १९०१ सालीं जानेवारीच्या २३ व्या तारखेस ६४ वर्षें राज्य करून त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली !

या चौसष्ट वर्षांच्या कारकीर्दींत आपल्या हिंदुस्तान देशाची

काय काय सुधारणा झाली ह्याचें वर्णन या प्रकरणांत करणें अशक्य आहे. तरी थोड्याशा गोष्टी पुढें लिहिल्या आहेत.

हिंदुस्तानांत इंग्रजी साम्राज्य स्थापित होण्यापूर्वीं सर्वत्र लुटालुटीची फार भीति होती. राजेरजवाडे परस्पर युद्ध करण्यांत गुंग झालेले होते. जागोजाग मारामाऱ्या, खून वगैरे होत, व प्रजेला स्वस्थता मिळावी म्हणून कांहींच प्रयत्न होत नव्हता. ठग, पेंढारी, डाकू वगैरे लोकांच्या भीतीनें प्रजा थरथर कांपत होती, कोणालाही आपला प्राण, धर्म, संपत्ति यांच्या सुरक्षिततेबद्दल खात्री वाटत नव्हती. इंग्लिशांच्या राज्यव्यवस्थेमुळें ही सर्व भीति हळू हळू नाहींशी होऊन सर्वत्र शांतता झाली.

सर्वत्र शांतता सुरू होण्याबरोबरच लोकोपयोगी अशीं निरनिराळीं खातीं व कारखाने सुरू झाले. आगगाडी, तारायंत्र, आगबोटी, गिरण्या, निरनिराळ्या खनिज पदार्थांच्या खाणी वगैरे मोठमोठे प्रचंड कारखाने सुरू झाले; तसेंच पोस्टखातें, पोलिसखातें, इंजिनियरखातें, न्यायखातें, विद्याखातें, लष्करीखातें, जंगलखातें, कस्टमखातें वगैरे निरनिराळीं खातीं सुरू होऊन देशांतील राज्यव्यवस्था सुयंत्रपणें सुरू झाली, व बरेच शतकांत हिंदुस्तानांतील प्रजेस शांततेपासून मिळणारें सुख मिळालें नव्हतें तें मिळूं लागून विद्या, कला वगैरे बाबतींत त्यांची उन्नति होऊं लागली.

इंग्लंडच्या गादीवर मेरी, इलिजाबेथ, आन व महाराणी व्हिक्टोरिया या चार स्त्रिया बसल्या. त्या सर्वांत महाराणी व्हिक्टोरिया यांची कारकीर्द सर्व प्रकारें उत्तम ठरली. त्यांनीं भोगलेलें राजवैभवही सर्वांत श्रेष्ठ होतें, व त्यांचे ठिकाणीं असलेलें प्रजावात्सल्यही इतर राजांपेक्षां श्रेष्ठ होतें.

महाराणी व्हिक्टोरिया यांच्या मनाची उदारता, दया व अनुकपा हे गुण दर्शविणाऱ्या एक दोन गोष्टी एथें देऊन हें प्रकरण आटोपतें घेतों. इ० स० १८४० त एकदां महाराणी व्हिक्टोरिया गाडींतून फिरत असतां सतरा वर्षांच्या एका उनाड मुलानें त्यांच्या अंगावर पिस्तूल झाडलें; परंतु त्या गोळीपासून त्यांस कांहीं इजा झाली नाहीं. पोलिसांनीं त्या गुन्हेगारास लागलेंच पकडलें; परंतु त्यास वेडयांच्या दवाखान्यांत कांहीं दिवस ठेवून मागाहून सोडून दिलें. इ. स. १८४२ त दुसऱ्या एका इसमानें अशीच एक गोळी त्यांजवर फेकली होती. त्याचा न्याय होऊन त्यास न्यायाधिशांनीं फांशीची शिक्षा फरमाविली. परंतु त्या शिक्षेचें वारंट महाराणी व्हिक्टोरिया यांजकडे सहीकरितां गेलें असतां त्यांनीं त्या वारंटावर सही केली नाहीं. तेव्हां त्या अपराध्यास जन्मठेपेची काळ्या पाण्याची शिक्षा देण्यांत आली. पुढें आणखी एकदां असाच प्रसंग आला होता. एका खुनी मनुष्यानें त्यांच्यावर हल्ला केला. या अपराधाबद्दल त्यास फांशीची शिक्षा कायद्याप्रमाणें व्हावयाची, परंतु फांशीच्या शिक्षेच्या वारंटावर महाराणीसाहेब सही करणार नाहींत, हें प्रधान मंडळीस माहीत असल्यामुळें नवा कायदा करून त्यास तीन वर्षांची शिक्षा करण्यांत आली, व पुढें दोन वर्षांनींच त्यास सोडून देण्यांत आलें. महाराणीच्या अशा दयाळू व उदार स्वभावामुळेंच लोकांचें मन इंग्रजी राज्याविषयीं प्रेमयुक्त होऊन राहिलें आहे.

हिंदुस्तानांत इंग्रजी राज्याचा पाया दृढ करण्याचें बहुतेक श्रेय महाराणी व्हिक्टोरिया यांच्याकडे आहे. त्यांचें नांव ऐकिलें म्हणजे प्रत्येकाच्या मनांत जो पूज्यभाव उत्पन्न होतो, त्याचें कारण

ग्रं. ...

त्यांचा मायाळू स्वभावच होय. इंग्रज संस्कार आपल्या न्यायीपणा बद्दल मोठा अभिमान बाळगतें, व न्यायीपणामुळेंच प्रजेचें मन त्यानें आकर्षण केलें आहे.

अशा ह्या महा भाग्यशाली महाराणी व्हिक्टोरिया यांच्या-पश्चात् त्यांचे जेष्ठ चिरंजीव 'सातवे एडवर्ड' हें नांव धारण करून आपले बादशाह झाले. त्यांनीं दहा वर्षेंपर्यंत उत्तम रीतीनें राज्य केल्यावर ते तारीख ६ मे इ. स. १९१० रोजीं परलोक-वासी झाले. त्यांचें संक्षिप्त चरित्र पुढील प्रकरणांत लिहिलेलें आहे.

## प्रकरण २ रें.

### बालपण व शिक्षण.

श्रीदाशरथी रामचंद्र प्रभूच्या जन्मकाळीं अयोध्यापुरींतील प्रजाजनांत जसा आनंदीआनंद होऊन सर्व लोक प्रभूच्या जन्माची वार्ता ऐकण्याकरितां उत्सुक झाले होते, तशाच रीतीनें जशी काय दुसरी अयोध्यापुरीच अशा लंडन राजधानींत तारीख ९ नवंबर इ. स. १८४१ या दिवशीं सर्व लोक मोठ्या उत्साहानें परमपूज्य महाराणी व्हिक्टोरिया यांस पुत्ररत्न झाल्याची बातमी ऐकण्याविषयीं उत्सुक होऊन राहिले होते. बकिंगहाम प्यालेस नामक राजवाड्यांतही राजकुटुंबांतील मंडळींत अशीच उत्सुकता दिसत होती. जगदीशाच्या कृपेनें सर्वांची इच्छा तृप्त करण्याकरितां दुपारीं १२ वाजतां राजपुत्राचा जन्म झाला. ही आनंददायक बातमी हां हां म्हणतां सर्व नगरभर पसरून जिकडे

तिकडे आनंदीआनंद झाला. त्या वेळचे पुढारी ड्यूक आफ वेलिंगटन ( नेपोलियन बोनापार्ट या दुर्दमनीय शत्रूचा पराभव ज्यांनीं केला ते ब्रिटिश सेनापति ) हे सर्व प्रजेच्या तर्फेनें महाराणी व्हिक्टोरिया व त्यांचे प्रियपति प्रिन्स आल्बर्ट यांचें अभिनंदन करण्याकरितां बकिंगहाम राजवाड्यांत हजर होते. युवराजाच्या जन्माचें वृत्त कानीं पडतांच त्यांना फार आनंद झाला. बऱ्याच वर्षांनीं युवराज–जन्ममहोत्सवाचा प्रसंग आलेला पाहून सर्व प्रजेस समाधान वाटलें. ही युवराजांच्या जन्माची बातमी इंग्लंड, स्काटलंड वगैरे देशांतलि लोकांच्या कानीं पडतांच जिकडे तिकडे आनंद होऊन गेला, आणि महराणी व्हिक्टोरिया व प्रिन्स आल्बर्ट यांजकडे आनंदप्रदर्शक व राजपुत्राला आशीर्वादपर असे संदेश चोहों बाजूंनीं येऊं लागले. अशा रीतीनें हा जन्ममहोत्सव अत्यंत आनंदानें साजरा झाला.

ता० ११ नवंबर रोजीं लार्ड मेयर, लंडनचा शेरीफ वगैरे ठळक ठळक मंडळी बकिंगहाम राजवाड्यांत जमा झाली. त्यांस लार्ड चेंबरलेन ( खाजगी कारभारी ) हे प्रिन्स आल्बर्ट यांच्या दिवाणखान्यांत घेऊन गेले. त्या आलेल्या गृहस्थांनीं प्रिन्स आल्बर्ट यांचें अभिनंदन करून युवराजांना आशीर्वाद दिला. युवराजाला पाहण्याची इच्छा त्यांनीं दर्शविल्यावरून राजपुत्राला मंडळींत आणण्यांत आलें. तेव्हां सर्व गृहस्थांनीं त्यांचा आनंदानें सत्कार केला व क्यांटर्बरीचे आर्चबिशप ( मुख्य धर्माधिकारी ) यांनीं ईश्वराची प्रार्थना केली. ह्याप्रमाणेंच सर्व देवालयांतून प्रार्थना होऊन राजकुटुंबाचें अभीष्ट चिंतन करण्यांत आलें. थोडक्याच



एडवर्ड बादशहांच्या नामकरणाचा व ख्रिस्ती धर्माच्या दीक्षेचा समारंभ. (पृष्ठ ११)

दिवसांनीं आलेला ख्रिस्तमसचा सणही राजवाड्यांत मोठ्या थाटानें करण्यांत आला.

इंग्लंडांतील रिवाजाप्रमाणें युवराजाच्या जन्माबरोबरच त्यास कार्नवाल प्रांताची नऊ लाखांची जहागीर मिळून कार्नवाल प्रांताचे ड्यूक ही पदवी मिळते आणि नंतर प्रिन्स आफ वेल्स हा किताब प्राप्त होतो. त्याप्रमाणें ता० ४ डिसेंबर इ. स. १८४१ रोजीं रीती-प्रमाणें जाहीरनामा प्रसिद्ध करून ह्या युवराजांना प्रिन्स आफ वेल्स आणि अर्ल आफ चेस्टर हे किताब महाराणी व्हिक्टोरिया यांजकडून मिळाले. असा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याची जरूरच असते असें नाहीं. त्यांच्या वडिलांच्या हक्काकडून त्यांस साक्स-नीचे ड्यूक आणि मातेच्या हक्काकडून ड्यूक आफ कार्नवाल, ड्यूक आफ राथ्स, अर्ल आफ केरिक, ब्यारन आफ रेनफ्रू आणि ग्रेट स्टुअर्ट आफ स्काटलंड इतके अधिकार प्राप्त झाले.

विंडसर नामक राजमहालांत सेंट जार्ज या नांवाचें एक सुंदर देवालय आहे. त्यांत मोठ्या थाटमाटानें ता० २९ जानेवारी इ. स. १८४२ रोजीं युवराजांचा नामकरणविधि करण्यांत आला. या नामकरणसंस्काराबरोबरच ख्रिस्ती धर्मांत दाखल करण्याचा विधिही व्हावयाचा होता. म्हणून त्या ठिकाणीं राजकुटुंबाचे सर्व इष्टमित्र, सगेसोयरे जमा झाले होते. पवित्र जार्डन नदीचें पाणी पालिस्तैन प्रांतांतून आणविलें होतें. क्यांटर्बरीच्या धर्मा-ध्यक्षांनीं स्वतः तो सर्व विधि केला. प्रशिया देशाचे राजे विल्यम फ्रेडरिक हे ह्या महोत्सवाकरितां जर्मनींतून मुद्दाम आले होते, आणि तेच या वेळीं युवराजांचे धर्मपिते ( गाड फादर ) झाले. या प्रसंगीं सेंट जार्जच्या देवालयांत आप्तमंडळींचा जो जमाव

झाला होता त्यांत महाराणी व्हिक्टोरिया, प्रशिया देशाचे राजे व प्रिन्स आल्बर्ट यांच्याशिवाय थोर थोर मंडळी पुष्कळ होती. सर्व विधि पुरा झाल्यावर युवराजांचें नांव प्रिन्स आल्बर्ट एडवर्ड असें ठेवण्यांत आलें. हजर असलेल्या मंडळींकडून युवराजांस "उदंड आयुरारोग्य मिळो" असा आशीर्वाद मिळाल्यावर तेथील समारंभ पुरा झाला. या आनंदकारक उत्सवाबद्दल सर्व मंडळीस एक मेजवानी देण्यांत आली. फेब्रुवारीच्या तिसऱ्या तारखेपर्यंत आलेली पाहुणे मंडळी राहून नंतर परत गेली.

कोणत्याही देशांत राजापासून रंकापर्यंत सर्व लोक पुत्रजन्म मोठा आनंदकारक मानतात. इंग्लंड देशांत तर बरेच वर्षांत युवराजांचा जन्म झालेला नव्हता; तेव्हां या प्रसंगीं राजघराण्याच्या व सर्व ब्रिटिश प्रजाजनांच्या आनंदास भरतें यावें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. देशोदेशाच्या रिवाजाप्रमाणें पुत्रजन्ममहोत्सव साजरा केला जातो; त्यांत कांहीं धार्मिक विधिही केले जातात. आपल्या इकडे षष्ठीपूजन, बारसें वगैरे जसे धार्मिक संस्कार केले जातात, तसे इंग्लंडांतही कांहीं धार्मिक विधि असतातच. आपल्या देशांत ज्याप्रमाणें राजघराण्याविषयीं प्रेम व आदरबुद्धि असते, त्याप्रमाणें तिकडील प्रजेंतही राजघराण्याविषयीं प्रेम व आदरबुद्धि असून अशा प्रसंगीं प्रजेकडूनही आनंदप्रदर्शन केलें जातें. असो.

जगदीशाच्या कृपेनें युवराज हळू हळू मातापितरांच्या आनंदाबरोबरच वाढू लागले. त्यांची प्रकृतिही जन्मापासून चांगली होती. हंसतमुख चेहरा, शांत स्वभाव वगैरे सद्गुणांनीं मंडित असल्यामुळें त्यांच्या बाललीला पाहून सर्व मंडळीच्या आनंदास पारावार राहत नव्हता. सहा वर्षांचें वय होईपर्यंत आपल्या




एडवर्ड बादशहा–उमर वर्षे ४. (पृष्ठ १२)



एडवर्ड बादशाहा-उमर वर्षे ६. (पृष्ठ १३)

वडील बहिणीबरोबर लेडी लिटलटन ( मि० ग्लाडस्टन यांची मेहुणी) यांच्या देखरेखीखालीं हंसण्या खेळण्यांत व नाना तऱ्हेच्या क्रीडा करण्यांत युवराजांचे दिवस गेले.

सातवें वर्ष सुरू होतांच युवराजांना कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें याबद्दल चर्चा सुरू झाली. इंग्लंडच्या वर्तमानपत्रांना तर त्यावेळीं युवराजांच्या शिक्षणाचाच मुख्य विषय होऊन प्रत्येक वर्तमानपत्रकार याच विषयाचा सांगोपांग विचार करूं लागला. मोठमोठ्या विद्वानांचें व हितचिंतकांचें मत घेण्यांत आलें. शेवटीं विचार कायम होऊन मिस्तर हेनरी बर्चे या विद्वान् गृहस्थाची युवराजांचे शिक्षक म्हणून नेमणूक करण्यांत आली. शिक्षकाच्या अंगीं विद्वत्ता, सद्वर्तन, चतुराई, अनुभव वगैरे जे जे गुण अवश्य पाहिजेत ते सर्व मि० हेनरी बर्चे यांच्या अंगीं होते. त्यांना आरंभींच सूचना देण्यांत आली होती कीं, युवराजांना शिक्षण देतांना इंग्रज गृहस्थाला योग्य असें नीतिशिक्षणही द्यावें. नीतिशिक्षणावांचून नुसतें शिक्षण व्यर्थ आहे. (राजकवि भर्तृहरि यांनीं एका श्लोकांत हेंच तत्त्व सांगितलें आहे. ) " या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वतां." शील चांगलें बनण्याला नीतिशिक्षण अवश्य पाहिजे.

मि० हेनरी बर्चे यांनीं दोन वर्षेंपर्यंत शिक्षकाचें काम उत्तम प्रकारें केलें. युवराजांच्या मनांतही आपल्या गुरूविषयीं भक्ति उत्पन्न झाली होती. दोन वर्षें पुरीं झाल्यावर त्यांनीं नोकरी सोडून दिली; त्या वेळीं युवराजांना फार वाईट वाटलें. नंतर त्यांच्या जागीं मि० फ्रेडरिक गिब्स या विद्वान् गृहस्थांची नेमणूक झाली. त्यांनीं सात वर्षेंपर्यंत आपलें काम उत्तम प्रकारें केलें.

उत्तम शिक्षकांची नेमणूक करून सर्व गोष्टींची तरतूद करून दिली होती, तरी महाराणी व्हिक्टोरिया व प्रिन्स आल्बर्ट यांचें युवराजांच्या शिक्षणावर पूर्ण लक्ष होतें. आपल्या या देशांत शारीरिक शिक्षणाकडे जसें दुर्लक्ष केलें जातें तसें त्या देशांत केलें जात नाहीं. मानसिक उन्नतीबरोबर शारीरिक उन्नतिही होण्याकरितां दोन्ही प्रकारचें शिक्षण देण्याकडे त्यांचा कटाक्ष असतो. आस्बोर्न महालाच्या बागेंत राजकन्या व युवराज यांच्याकरितां जमीन नेमून देऊन त्या जमिनींत भाजीपाला, फळफळावळ, फुलझाडें हीं कशीं लावावीं, त्यांस खत कसें व कोणतें घालावें, पाणी कसें द्यावें, वगैरे गोष्टी शिकविण्याकरितां त्या त्यांच्या हातून प्रत्यक्ष करून घेतल्या जात. त्यांच्याकडूनच त्या महालांत एका नियमित जागीं पदार्थसंग्रहालय बनवून घेतलें होतें. नदीकिनारा, समुद्रकिनारा, बागबगीचे वगैरे ज्या ज्या ठिकाणीं हे फिरावयास जात तेथून निरनिराळ्या वस्तु आणवून त्या संग्रहालयांत ठेवण्याचा क्रम असे. राजकन्येस पाकशास्त्र शिकविण्याकरितां एक पाकशाळा होती; एक हलवायाचें दुकान होतें; एक गोशाळा होती, त्यांत गुरें कशीं पाळतात यांचें शिक्षण मिळून त्यांच्या दुधापासून कसकसे पदार्थ बनवितात वगैरे गोष्टी शिकविल्या जात; सर्व प्रकारचे खेळ शिकविण्याचीही सर्व तजवीज केलेली होती; परंतु प्रत्येक कामाचा वेळ अगदीं ठरलेला असे. ठरलेल्या वेळांत एका मिनिटाचीही चूक पडत नसे. धर्मशिक्षण महाराणी साहेब स्वत: देत. आईनेंच मुलांना धर्मशिक्षण दिलें पाहिजे, असें त्यांचें मत होतें.

ह्याप्रमाणें त्यांना शिक्षण देण्याच्या कामीं सर्व तऱ्हेनें काळजी

घेतली होती. कोट्यवधि लोकांचें हिताहित ज्यांच्या स्वभावावर व कर्तृत्वावर अवलंबून असतें अशा पुरुषाच्या शिक्षणाविषयीं अशी योग्य काळजी बाळगणें जरूरच आहे. योग्य तऱ्हेनें व सर्वांगपूर्ण असें शिक्षण देण्याची काळजी घेतली तरी असें शिक्षण घेणाऱ्याच्या अंगींही चांगलें तेजस्वी असें बुद्धिवैभव व आस्था असावी लागते; आणि ह्या दोन गोष्टी जुळल्या म्हणजे त्या शिक्षणाचा केव्हांही चांगलाच परिणाम दिसावयाचा. राजपुत्रांचें बुद्धिवैभव व शिक्षणाची आस्था हीं उत्कृष्ट असल्यामुळें मातापितरांनीं घेतलेल्या काळजीचें सार्थक झालें असें त्यांच्या चरित्रावरून दिसून येतें. त्यांच्यावर अभ्यासाचा बोजा बराच जबर ठेविला होता तरी त्यांनीं त्याबद्दल कधींही नाखुषी दाखविली नाहीं, व नेमलेलीं कामें वेळच्या वेळीं बिनचूक करण्याविषयीं त्यांजकडून कधींही आळस झाला नाहीं. दुर्लक्ष, त्वरा व आत्मश्लाघा हे विद्यार्जनांत मोठे अडथळे आहेत. परंतु हे अडथळे त्यांच्या अभ्यासांत कधीं आले नाहींत. तसेंच आळस, मोह, चंचलता, वादविवाद, उद्धटपणा, अभिमान व लोभ हे विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं असणारे दोषही कधीं त्यांच्यांत दिसून आले नाहींत. वेळोवेळीं त्यांचे जे शिक्षक होते त्यांनीं ह्यांच्या विद्यार्थीपणाबद्दल तारीफच केलेली आहे. हे जात्याच चांगले बुद्धिमान् असल्यामुळें त्यांच्यावर अभ्यासाचें ओझें जबर होतें तरी त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं; इतकेंच नव्हे, तर कधीं कुरकूर किंवा आळस केलेला नाहीं किंवा कधीं अल्पस्वल्प नाखुषीही दाखविलेली नाहीं. त्यांचे वडील प्रिन्स कान्सर्ट हे " आपला बर्टी ( युवराजांचें लाडकें नांव ) हा फार मेहनतीनें अभ्यास करितो." असें वारंवार म्हणत असत.

ह्यावरून राजपुत्र किती आस्थेनें अभ्यास करीत होते ह्याची कल्पना होईल. त्यांच्या कारकीर्दींत जो थोरपणा दिसून आला तो सर्व त्यांना मिळालेल्या सुशिक्षणाचाच परिणाम होय असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. अभ्यास सुरू असतां मधून मधून देशांतल्या देशांत व युरोपखंडांत त्यांनीं प्रवास केला. त्या प्रवासामुळेंही त्यांचा फार फायदा झाला. आपला पुत्र, पुढें जो इंग्लंडचा राजा होणार, त्याला जरूर असलेल्या शिक्षणांत न्यूनता राहूं नये आणि तो समयसूचक, विचारी, नीतिमान्, दयाळू, उदार व विद्वान् व्हावा, अशा तऱ्हेचें शिक्षण मिळावें म्हणून राणीसाहेब व प्रिन्स आल्बर्ट हीं दोघेंही फार दक्ष असत. सतराव्या वर्षीं युवराजांना रिचमंड या शहरांत एकांतस्थळीं अभ्यास वाढविण्याकरितां म्हणून ठेविलें; एकांतवासांत कंटाळा येऊं नये म्हणून दोन तीन सोबती त्यांच्याबरोबर ठेविले होते. अठरावें वर्ष पुरें झालें म्हणजे इंग्लंडच्या कायद्याप्रमाणें मनुष्याचें अज्ञानपण संपून तो सज्ञान झाला असें समजतात. त्यास अनुसरून युवराजांस एकोणिसावें वर्ष लागतांच राणीसाहेबांकडून त्यांस एक आशिर्वादरूप पत्र आलें. त्यांतील मतलब असा कीं:—"आपल्याला शिक्षण देण्याचे कामीं आमचे हातून कडकपणा झाला असेल, परंतु तसा कडकपणा धरण्याचा हेतु आपलें कल्याण व्हावें एवढाच होता. तोंडपुजे मंडळीच्या तोंडपुजेपणास आपण भुलूं नये; अनेक लोक आतां साहजिक तोंडपुजेपणा करून पुढें पुढें येतील, परंतु त्यांचें बिंग जाणून त्यांच्याशीं तुम्हांस योग्य रीतीनें वागतां यावें, एवढाच या कडकपणाचा हेतु होता. तसें झालें असल्यास ठीकच. यापुढें आपण आपले मुखत्यार झालांत. आतां मी किंवा

आपले वडील आपणास नसता उपदेश करणार नाहींत. ज्या वेळीं आपणास सल्लामसलतीची जरूर लागेल त्या वेळीं ती आपण विचारतांच दिली जाईल." सदरहू पत्र वाचून युवराजांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आले. याच दिवशीं युवराजांस कर्नलची लष्करी पदवी देऊन लष्करी शिक्षण देण्यासाठीं कर्नल ब्रूस यांची शिक्षक म्हणून महाराणीसाहेबांनीं नेमणूक केली.

एकोणिसाव्या वाढदिवसाचा उत्सव होऊन एक महिना लोटल्यावर ब्यारन रेन्फ्रू हें नांव धारण करून एक इंग्रज गृहस्थ म्हणून यूरोप खंडांत खासगी रीतीनें प्रवास करण्याची युवराजांनीं तयारी केली. आरंभीं फ्रान्सांत जाऊन पुढें इटाली, स्पेन, पोर्टुगाल हे देश पाहून ते इंग्लंडांत परत आले. थोडे दिवस विश्रांति घेतल्यावर एडिम्बरोच्या विद्यालयांत विशेष अभ्यास करण्यासाठीं युवराजांस पाठविण्यांत आलें. या वेळीं त्यांच्यावर अभ्यासाचा बोजा बराच ठेविला होता, तरी न कंटाळतां नेमलेला अभ्यास करण्याची पद्धति पाहून त्या वेळचे शिक्षक युवराजांची स्तुति करीत असत. डा० लायन प्लेफेअर हे त्यांना व्यवहारोपयोगी रसायनशास्त्र शिकवीत, व डा० लिओनार्ड हे रोमच्या इतिहासावर व्याख्यानें देत. फ्रेंच, जर्मन व इटालियन या भाषांचाही अभ्यास सुरू होता. राजकीय, सामाजिक, वाङ्मयात्मक , ऐतिहासिक व शास्त्रीय शिक्षणाच्या क्रमांतच राजे लोकांना अत्यंत आवश्यक अशा लष्करी शिक्षणाचाही समावेश केलेला होता. त्या शहरांत एक लष्करी पलटण होती, त्या पलटणीबरोबर लष्करी शिक्षण घेण्याची त्यांस सवड ठेविली होती. त्यांस शिकविण्याकरितां जे शिक्षक नेमिले होते त्यांजकडून वेळोवेळीं युवराजांच्या वडिलांक-

डे सर्व हकीगत लिहून जात असे. या शिक्षणव्यवस्थेसंबंधानें एकदां युवराजांच्या वडिलांनीं ब्यारन स्टाकमार यांस लिहिलें होतें कीं, " राजपुत्राच्या सर्व शिक्षकांचें राजपुत्राविषयीं चांगलें मत आहे व त्याच्या अंगीं उत्साह व कर्तव्यनिष्ठा चांगली दिसून येते." त्यांना प्रसिद्ध इंग्रज कवि स्काट याचीं काव्यें आणि फ्रेंच, जर्मन व इंग्लिश या भाषेंतील कादंबऱ्या वाचण्याचा भारी नाद होता.

एडिम्बरो एथें कांहीं दिवस अभ्यास केल्यावर आक्सफर्ड एथील विश्वविद्यालयांत कांहीं दिवस त्यांस पाठविण्यांत आलें, आणि पुढें केंब्रीजच्या ट्रिनिटी कालेजांत अंडर ग्राज्युएट म्हणून कांहीं दिवस त्यांनीं अभ्यासांत घालविले. शेवटीं लष्करी शिक्षण घेण्यासाठीं युवराजांस आयर्लंडांत पाठविण्यांत आलें. अभ्यासाच्या या मुदतींत महाराणी साहेब व प्रिन्स कान्सर्ट (महाराणीचे पति) हे वेळोवेळीं युवराजांस भेटून त्यांच्या अभ्यासावर पूर्ण लक्ष ठेवीत, व विद्यालयांतील अभ्यासांतच त्यांस एकसारखे न गुंतवितां मधून मधून लहान लहान प्रवास त्यांजकडून करवीत असत.

वरील संक्षिप्त वर्णनावरून आपल्या इकडच्या राजेरजवाड्यांनीं व इतर लोकांनींही पुष्कळ उपदेश घेण्यासारखा आहे. आपल्या इकडच्या लोकांकडून आपल्या मुलांना शिक्षण देण्यांत फारच हयगय होते. प्रत्येक मुलाला ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें योग्य तें शिक्षण देण्यांत हयगय झाल्यामुळें आपल्या देशाचें फारच नुकसान झालें आहे. मानसिकशिक्षणाबरोबर शारीरिकशिक्षणही दिलें पाहिजे ही गोष्ट इंग्लिश लोकांच्या सहवासानें आपल्या लोकांना नुकती कोठें समजूं लागली आहे.

तसेंच नीतिशिक्षण, धर्मशिक्षण, हींदेखील अवश्य असलीं पाहिं-जेत, हेंही लोकांच्या मनांत येऊं लागलें आहे, हें सुचिन्ह होय.

## प्रकरण ३ रें.

## अमेरिकेचा प्रवास.

युवराज चौदा वर्षांचे होते तेव्हां इंग्लिशांची रशियन लोकांबरोबर एक लढाई सुरू झाली, ती क्रिमियन वार ( क्रिमियाची लढाई ) म्हणून प्रसिद्ध आहे. त्या लढाईच्या वेळीं अमेरिकेच्या कानडा वसाहतींतील लोकांनीं आपल्या लोकांची एक पलटण तयार करून ती आपल्या खर्चानें इंग्लंडच्या मद-तीस पाठवून दिली. ह्या त्यांच्या राजनिष्ठेबद्दल राणीसाहेबांनीं कानडा वसाहतींतील लोकांचे आभार मानिले. राणीसाहेबांनीं आमचा देश एकवार पाहून जावा अशी त्या लोकांनीं राणीसाहेबांस विनंती केली. परंतु राणीसाहेबांस त्यांच्या विनंतीप्रमाणें तिकडे जाण्यास सवड नसल्यामुळें त्या विनंतीस उत्तर देतांना युवराज मोठे झाल्यावर त्यांस कानडा देशांत पाठवूं असें त्यांनीं आश्वा-सन दिलें होतें. या आश्वासनाप्रमाणें युवराज वयांत आल्यावर त्यांस अमेरिकेस पाठविण्याचा विचार कायम झाला. इ. स. १८५८ मध्यें प्रिन्स आल्बर्ट यांनीं प्रवासाची सर्व तयारी करून देऊन युवराजांना संभाळून नेण्याच्या कामावर ड्यूक आफ न्यूक्यासल या सरदाराची नेमणूक केली.

कानडा देशाच्या पूर्वेस न्यूफौंडलंड नांवाचें बेट असून त्यांत सेंट जोन्स नांवाचें बंदर आहे. त्या बंदरांत युवराजांची स्वारी

ता० २४ जुलई इ. स. १८६० या दिवशीं पोंचली. तेथून हालि-फाक्स, क्वीबेक, मांट्रियाल, ओटावा वगैरे स्थळें पाहत पाहत व लोकांचा सत्कार घेत घेत सेंट लारेन्स नदीचा नायगारा एथील प्रचंड धबधबा पाहण्याकरितां युवराजांची स्वारी तिकडे गेली. कानडांतील लोकांनीं निष्ठापूर्वक त्यांचा अपूर्व सन्मान केला. ओटावा एथील पार्लमेंट सभागृहाच्या पायाचा दगड यांच्या हस्तें बसविण्यांत आला, व सेंट लारेन्स नदीवरील पूल सुरू करण्याचा समारंभ यांच्याच हातून लोकांनीं करविला. प्रत्येक ठिकाणीं युवराजांस मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. अशा रीतीनें कानडांतील लोकांच्या सत्काराचा स्वीकार करून युनायटेड स्टेट्स या प्रजासत्ताक राज्यांतील लोकांच्या आमंत्रणास मान देऊन युवराजांनीं तिकडे जाण्याचा बेत केला, आणि शिकागो वगैरे शहरें पाहत पाहत ता. ३० अक्टोबर इ. स. १८६० रोजीं युनायटेड स्टेट्सची राजधानी वाशिंग्टन एथें युवराज येऊन पोंचले. त्या वेळीं त्या प्रजासत्ताक राज्याचे प्रेसिडेंट मि० बुक्यानन हे होते. त्यांनीं युवराजांचा आदरसत्कार मोठ्या थाटानें करून आपल्या राष्ट्राचा आनंद व्यक्त केला. या ठिकाणीं युवराजांनीं जार्ज वाशिंग्टनची कबर पाहिली. वास्तविक पाहिलें असतां एक प्रकारें जार्ज वाशिंग्टन हा इंग्लंडचा शत्रु होता. कारण त्यानें इंग्लंडचा संबंध तोडून हीं संस्थानें स्वतंत्र केलीं होतीं. तरी हा संबंध मनांत न आणितां युवराजांनीं लोकांच्या निमंत्रणास मान देऊन त्यांचा पूज्य राष्ट्रीय पुरुष जार्ज वाशिंग्टन याच्या कबरीचें दर्शन घेतलें, व आपल्या भेटीचें स्मारक म्हणून त्या कबरीजवळ एक वृक्ष लावून ठेविला. या

कृत्यानें त्यांनीं प्रजासत्ताक संस्थानांतील लोकांच्या मनांत ब्रिटिश राष्ट्राविषयीं प्रेमवृक्षच लावून ठेविला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वाशिंग्टन राजधानी सोडल्यावर युवराज फिलाडेल्फिया एथील लोकांचा सत्कार घेऊन न्यूयार्क शहरास गेले. तेथील लोकांनींही मोठ्या प्रेमानें त्यांचा सत्कार केला. या शहरच्या लोकांनींही युवराजांस एक मोठी थाटाची मेजवानी दिली. तेथून पुढें ते बोस्टन शहरीं गेले. तेथील विद्वान् लोकांची भेट घेऊन ते पोर्टलंड बंदरास आले. तेथें हीरो नांवाची आगबोट तयार होती, तींत बसून ते परत इंग्लंडास जाण्याकरितां निघाले. ती आगबोट वाटेंत तुफानांत सांपडल्यामुळें इंग्लंडास पोंचण्यास तिला जास्त दिवस लागले. ठरलेल्या मुदतींत आगबोट आली नाहीं यामुळें इंग्लंडांतील लोकांस मोठी काळजी उत्पन्न झाली, व तपासाकरितां दोन लढाऊ आगबोटीही त्यांनीं रवाना केल्या. शेवटीं ता. १५ नवंबर रोजीं युवराजांची स्वारी इंग्लंडास दाखल झाली. तेव्हां लोकांस मोठा आनंद होऊन त्यांनीं मोठा उत्सव केला.

देशाटन हा ज्ञानसंपादनाचा एक उत्तम मार्ग आहे, असें सगळे युरोपियन लोक समजत असून ज्यांस जशी अनुकूलता असते त्याप्रमाणें ते देशाटन करीत असतात. या देशाटनाच्या योगानें संपादित ज्ञान दृढतर होतें, मन प्रशस्त होतें आणि मनांतले सगळे वेडे वांकडे विचार नाहींतसे होऊन, विद्येचें अत्यंत अमोलिक फळ जो विनय तो प्राप्त होतो. युवराजांनीं हा जो अमेरिकेचा प्रवास केला त्यांत कानडा देश पाहून त्यांस फारसें नवल वाटलें नसेल, पण, स्वतंत्र संस्थानें पाहून आणि तेथचे लोक म्हणजे मूळचे इंग्लंडचेच लोक आपलें राज्य इंग्लंडाची पर्वा

न करितां स्वतंत्रपणें कसें चालवीत आहेत, आणि नीति, कला-कौशल्य इत्यादि गुणांमध्यें इंग्लंडांतल्या लोकांना कसे मागें टाकीत आहेत, याचें निरीक्षण करून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें असेल. तसेंच आपल्या लोकांच्या अंगीं एवढी प्रखर तेजस्विता आहे असें मनांत येऊन त्यांना आनंदही झाला असेल.

ह्या प्रवासांत बरोबर असलेले ड्यूक आफ न्यूक्यासल यांनीं आपल्या एका पत्रांत या प्रवासाबद्दल पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे. “ अमेरिकेच्या प्रवासामुळें युवराजांचा पुष्कळ फायदा झाला आहे. त्यांच्या विचारांस निराळें वळण मिळालें आहे. या अनुभवामुळें त्यांच्या स्वभावांत जो फरक झाला आहे तो त्यांच्या मातापित्यांस सुखद असून पुढील कर्तव्याबद्दल येणारी जबाबदारी त्यांस कळूं लागली आहे. ”

---

## प्रकरण ४ थें.

### पितृवियोग व येरुशलेमची यात्रा.

युवराज आयर्लंडांत एका लष्करी छावणींत लष्करी शिक्षणाकरितां जाऊन राहिले होते. त्यांस भेटण्याकरितां म्हणून एकदां महाराणी व्हिक्टोरिया व प्रिन्स आल्बर्ट हे तिकडे गेले होते. त्या वेळीं थंडी फार कडाक्याची पडत होती. परत येतांना प्रिन्स आल्बर्ट यांस थंडीची बाधा होऊन त्यांची प्रकृति बिघडली. हळू हळू म्हणतां म्हणतां विषमज्वराचीं लक्षणें त्यांच्या प्रकृतींत दिसूं लागलीं. डाक्टर जेनर हे आणखी कांहीं डाक्टरांच्या

मदतीनें औषधोपचार करीत होते. परंतु ता० ७ डिसेंबर रोजीं महाराणीस आपल्या पतीच्या जगण्याविषयीं शंका वाटूं लागली. तेव्हां चार्ल्स किंग्स्ले नांवाच्या धर्मोपदेशकांनीं त्यांस धर्मबोध केला. महाराणी साहेब बिछान्याजवळ बसून पतीच्या करमणुकी-करितां Peveril of the Peak हें पुस्तक स्वतः वाचीत होत्या. त्या वेळीं इंग्लंडचे मुख्य प्रधान लार्ड पामर्स्टन हे होते. त्यांस हा आजार वाढतो असें पाहून धीरच राहिला नाहीं. त्यांनीं महाराणीस कळवून डाक्टर वाटसन यांस बोलावणें पाठविलें. प्रिन्स आल्बर्ट यांचाही त्या डाक्टरांवर भरंवसा होता. ता० १० रोजीं आणखी डाक्टरांची सल्ला घेणें जरूर आहे असें लार्ड पामर्स्टन यांस वाटून ता० १२ रोजीं सर सी० फीप्स यांस निकडीचें बोलावणें गेलें. शक्य तितके उपाय झाले, पण ईश्वरी इच्छेपुढें मानवी प्रयत्नांचें काय चालणार ? आजार एकसारखा वाढतच चालला. ता० १४ रोजीं सकाळीं डाक्टर ब्राऊन यांच्या सूचनेवरून महाराणी व सर्व मुलें त्यांच्या बिछान्याजवळ जमा झालीं व प्रिन्स आल्बर्ट यांनीं त्यांची शेवटची भेट घेतली. या आजारांत राजकन्या एलिसा हिनें आपल्या पित्याची भारी चाकरी केली. ती अहोरात्र पित्याच्या बिछान्याजवळ हजर राहून त्याच्या करमणुकीकरितां एखादें गाणें म्हण किंवा एखादें पुस्तक वाच असें करीत असे. पित्याची भयंकर स्थिति तिच्या नजरेस आली. तत्क्षणीं ती महाराणीसाहेबांस बोलावण्याकरितां धावतच गेली. युवराजांसही पूर्वींच आयर्लंडांतून बोलावून आणिलें होतें. ते, महाराणी, इतर मुलें, डाक्टर, जनरल ब्रूस वगैरे सर्व मंडळी बिछान्याजवळ जमा झाली. या वेळीं महा-

राणींनीं ईश्वराची प्रार्थना केली. पण, हाय! हाय! सर्व मंडळीस दुःखसागरांत लोटून प्रिन्स आल्बर्ट यांस काळानें ओढून नेलें! त्या वेळीं राजकुटुंबांत जो आकांत झाला त्याचें वर्णन करण्यास ही लेखणी असमर्थ आहे. लार्ड पामर्स्टन यांनीं प्रजेला जेव्हां ही गोष्ट जाहीर केली, तेव्हां प्रजेलाही फार दुःख झालें.

मरणसमयीं प्रिन्स आल्बर्ट यांचें वय ४३ वर्षांचें होतें. त्यांच्या आंगीं मुख्यतः मनमिळाऊपणा, सर्वांशीं प्रेमळ व खुल्या दिलानें वागण्याची पद्धति, कर्तव्यकर्म नेमक्या वेळीं करण्याची हातोटी, देशहिताविषयीं तत्परता, न्यायाविषयीं पूर्ण अभिमान, मनाचा थोरपणा, उद्योगशीलता, कार्यदक्षता इत्यादि गुण असल्यामुळें आपल्या मंडळीस व सर्व प्रजेस ते फारच प्रिय झाले होते. राजनिष्ठ अशा प्रजेनें त्यांचीं ठिकठिकाणीं अनेक स्मारकें करून ठेविलीं आहेत.

प्रिन्स आल्बर्ट यांची और्ध्वदेहिक क्रिया ता० २३ डिसेंबर इ. स. १८६१ रोजीं राजघराण्यांतील पुरुषाला योग्य अशा थाटानें करण्यांत आली. ह्या प्रसंगीं सर्व प्रधान मंडळी, देशोदेशींचे वकील, धर्मोपदेशक, युवराज (प्रिन्स आफ वेल्स), प्रिन्स आर्थर, ड्यूक आफ साक्सकोबर्ग, महाराजा धुलिपसिंग वगैरे मोठा लोकसमूह हजर होता.

या पितृवियोगाच्या दुःखकारक प्रसंगामुळें युवराजांचें मन फार अस्वस्थ झालें. नित्यक्रमाकडे त्यांचें लक्ष लागेना. म्हणून त्यांस यात्रा करण्याच्या निमित्तानें प्रवासास पाठविण्याचा विचार ठरला. सिरिया देशांतील पालिस्तैन प्रांतांत जार्डन नदीच्या कांठीं येरुशलेम म्हणून एक शहर आहे. त्या शहरांत ख्रिस्तीधर्मसंस्थापक येशूख्रिस्त याचा

जन्म झाल्यामुळें तें ठिकाण ख्रिस्तीलोक फार पवित्र मानतात. त्या ठिकाणीं जाण्याचा युवराजांचा बेत ठरला. अशा पवित्र स्थळांच्या दर्शनानें मनाला शांतता येते. जातांना आरंभीं मिसर देशांत जाऊन त्या देशाची राजधानी केरो शहर व त्या शहरानजीकच्या पिरामिड नांवाच्या प्रचंड इमारती पाहिल्यावर एका महिन्यानें म्हणजे ता० ३१ मार्च इ. स. १८६२ या दिवशीं तुर्कस्तानांतील जाफा बंदरास युवराज उतरले. तेथून तुर्की स्वार बरोबर घेऊन ते येरुशलेम एथें गेले. तेथें येशूख्रिस्ताचीं स्मारक अशा सर्व पवित्र स्थळांचें दर्शन घेऊन दमास्कस वगैरे स्थळें त्यांनीं पाहिलीं, व ता. १३ मेच्या सुमारास पालिस्तैन प्रांत सोडून इस्तंबूल, आथेन्स, माल्टा वगैरे स्थळें पाहत पाहत सुखरूपपणें ते इंग्लंडास येऊन पोंचले. या प्रवासांत त्यांनीं डीन स्टान्ले या नांवाचा माहितगार गृहस्थ बरोबर घेतला होता, यामुळें त्यांना कोठेंही अडचण पडली नाहीं. सदर गृहस्थांनीं युवराजांबद्दल एके ठिकाणीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून युवराजांच्या आंगच्या गुणांबद्दल चांगली कल्पना होईल. ते उद्गार असेः—" युवराजांना पाहिल्यावर कोणाच्याही मनांत त्यांच्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. या प्रवासांत त्यांच्याशीं माझा एकसारखा सहवास झाल्यामुळें त्यांचा मनमिळाऊ स्वभाव, विलक्षण स्मरणशक्ति, आत्मसंयमन इत्यादि गुण पाहून मी फार आश्चर्यचकित झालों आहें. या प्रवासांत इतिहासप्रसिद्ध व प्राचीन अशीं अनेक स्थळें आमच्या पाहण्यांत आलीं. त्या त्या वेळीं त्या स्थळांच्या ऐतिहासिक माहितीबद्दल व प्राचीन पुरुषांबद्दल युवराजांकडून जे उद्गार बाहेर पडत त्यांवरून त्यांच्या आंगची विलक्षण स्मरणशक्ति दिसून येते.


रविवारीं सुसरीवांचून दुसऱ्या कोणत्याही प्राण्याची शिकार करावयाची नाहीं असा त्यांनीं नियम केला होता. पुष्कळ वेळां बदकें, राजहंस वगैरे पक्षी दृष्टीस पडत व त्यांची शिकार करण्याविषयीं मनाला मोह पडे, तरी आत्मसंयमन करून त्यांनीं आपला नियम कधीं मोडला नाहीं. सुसरीची शिकार करण्यास मोकळीक होती तरी या प्रवासाच्या मुदतींत तो प्रसंगच आला नाहीं. रोज संध्याकाळीं एक तासभर माझ्याशीं मनमोकळेपणानें ते बोलत बसत. त्या वेळीं अनेक विषयांवर बोलणें निघे व त्यांत त्यांचे योग्य विचार पाहून मला फार समाधान होई. ”

## प्रकरण ५ वें.

## विवाह.

प्रत्येकाच्या आयुष्यांत विवाहाचा प्रसंग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. पुरुष किंवा स्त्री यांस संसार सुखावह होण्याला स्त्रीपुरुषांची निवड योग्य प्रकारें होणें अत्यंत जरुरीचें आहे. युरोपियन लोकांत विवाहाची पद्धति आपल्या इकडच्या पद्धतीपेक्षां फार निराळी आहे. त्यांच्यांत लग्नें लहानपणीं न करितां वधूवरें वयांत आल्यावर आपापल्या पसंतीप्रमाणें लग्नें ठरवितात. आईबापांवर मुलांच्या लग्नाचा फारसा बोजा नसतो.

युवराज—प्रिन्स आफ वेल्स—यांचा विद्याभ्यास पुरा झाल्यावर वयाच्या बाविसाव्या वर्षीं त्यांचा विवाह करण्यांत आला. युवराजांचें मनोहर स्वरूप, अतुल वैभव, सुस्वभाव, विद्वत्ता वगैरे



असबोर्न नांवाचा राजवाडा. (पृष्ठ २७)

The Bombay Art Printing Works, Fort.

सद्गुणांस मोहित होऊन पुष्कळ राजकन्यांनीं त्यांजबरोबर लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु त्या सर्वांत डेन्मार्कची राजकन्या आलेक्झांड्रा यांसच आमच्या भाग्यशाली युवराजांची अर्धांगी होण्याचा मान मिळाला.

पार्लमेंट उघडण्याच्या वेळीं महाराणींनीं आपल्या भाषणांत प्रिन्स आफ वेल्स व प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांच्या विवाहाचा विचार जाहीर केला होता. महाराणी इ. स. १८६२ त ब्रुसेल्स एथें गेल्या होत्या; त्या ह्या विवाहाच्या पूर्व तयारीकरितांच होत. त्याच वर्षीं नवंबर महिन्यांत प्रिन्सेस आलेक्झांड्रा लंडनास आल्या होत्या. त्यांची व महाराणीची भेट असबोर्नच्या राजमहालांत थोडा वेळ झाली. त्यावेळीं राजकन्येची सभ्यता, वागणूक, रूप वगैरे पाहून राजकुटुंबांतील सर्व मंडळीचे मनांत तिच्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें. ता० ९ सप्तेंबर इ. स. १८६२ या दिवशींच हा विवाह निश्चित झाल्याचें खासगी रीतीनें प्रसिद्ध झालें होतें; पण युवराजांच्या जन्मदिवशीं लंडन ग्याझेटांत उघड रीतीनें ही हकीकत प्रसिद्ध करण्यांत आली. ही बातमी ऐकून सर्व प्रजाजनांस आनंद झाला. लग्नाचा दिवस ता० १० मार्च इ. स. १८६३ हा ठरविण्यांत आला, व लग्नसमारंभाच्या तयारीस सुरुवात झाली. पार्लमेंट सभेनें युवराजांच्या गृहखर्चाकरितां म्हणून चार लक्ष रुपयांचें वर्षासन देण्याचा ठराव केला, व प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांस एक लक्ष रुपयांचें निराळें वर्षासन देण्याचा ठराव केला. युवराजांनीं आपणा स्वतःकरितां साङ्रिंगहाम एथील महाल ३२ लक्ष रुपयांस खरेदी केला. ही रकम युवराजांचे वडील प्रिन्स आल्बर्ट यांनीं काटकसर करून शिल्लक ठेविली होती.

इसवी सन १८६३ च्या फेब्रुवारी महिन्यांत डेन्मार्कचा राजा व प्रजा यांनीं प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांना आशीर्वादपूर्वक पुष्कळ व किंमतवान् अशा वस्तु भेट म्हणून पाठवून ठरलेल्या विवाहाबद्दल आपली पसंती दर्शविली. ता० २६ रोजीं प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांनीं कोपेनहेगन शहर सोडलें. हा दिवस सार्वजनिक उत्साहाचा मानून तें सर्व शहर ध्वजपताकांनीं सुशोभित केलें होतें. कोपेनहेगन राजधानी सोडल्यावर कील, हांबर्ग वगैरे शहरांवरून ता. २ मार्च रोजीं ब्रुसेल्स शहरीं राजकन्येची स्वारी पोंचली. त्यांच्याबरोबर त्यांचे वडील बंधु होते. ब्रुसेल्स एथें डेन्मार्क व इंग्लंड या राष्ट्रांच्या वकिलांनीं त्यांचें थाटानें स्वागत केलें. आंटवर्प बंदरांत व्हिक्टोरिया आल्बर्ट नांवाची बोट यांच्याकरितां तयार ठेविली होती. त्या आगबोटीवर बसून इंग्लंडांतील फ्लशिंग बंदरास येण्याकरितां स्वारी निघाली. फ्लशिंग बंदरांत त्यांचें स्वागत करण्यासाठीं अडमिरल स्मार्टच्या हाताखालीं ब्रिटिश आरमार तयार होतें. ता० ६ रोजीं प्रभातकाळीं ब्रिटिश आरमारावरून तोफांची सलामी झाली. तेथून टेम्स नदीच्या कांठच्या ग्रेव्हसेंड बंदरांत ती आगबोट येऊन पोंचली. तेथें युवराज आपल्या भावी पत्नीचें स्वागत करण्याकरितां तयारच होते. आगबोट बंदरांत येतांच युवराज मोठ्या थाटानें आगबोटीवर गेले. प्रिन्सेस आपल्या भावी पतीला भेटण्याकरितां मोठ्या उत्सुकतेनें सामोरी आली. लोकांच्या हर्षगर्जनेंतच त्या उभयतांची भेट झाली. त्या वेळीं त्या उभयतांस जो आनंद झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. त्या वेळीं आरमारावरील तोफांनीं सलामी दिली. तेथील मेयरांनीं हारतुरे अर्पण करून मानपत्र दिलें. तेथून रेल्वे रस्त्यानें स्वारी लंडनास

जाण्याकरितां निघाली. वाटेनें ठिकठिकाणीं प्रजेकडून त्यांचा सत्कार करण्यांत आला. स्टेशनावर तर फारच गर्दी झाली होती. डयूक आफ केंब्रीज, प्रिन्स आफ प्रशिया, डयूक आफ साक्स-कोबर्ग, सर जार्ज ग्रे, लंडनचे लार्ड मेयर व शेरीफ, इत्यादि बडे बडे गृहस्थ स्टेशनावर हजर होते. तेथें अनेकांकडून अभिनंदनपर अशीं मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. तीं आनंदानें स्वीकारून विंडसर महालांत जाण्याकरितां स्वारी निघाली. परंतु प्रत्येक ठिकाणीं प्रजेनें राजनिष्ठापूर्वक केलेल्या सत्कारास मान देण्याकरितां ठिकठिकाणीं गाडी थांबवावी लागल्यामुळें महालांत पोंचण्यास बराच वेळ लागला. प्रिन्सेसचें सौंदर्य व सभ्य वागणूक पाहून सर्व लोकांस आनंद झाला व ठिकठिकाणीं ह्याच आनंदकारक गोष्टींची चर्चा सुरू झाली. एक दोन दिवस विश्रांति घेतल्यावर सेंट जार्ज नांवाच्या दिवाणखान्यांत मेजवानीचा समारंभ झाला. त्या वेळीं नानाप्रकारचें सुंदर दारूकाम सोडण्यांत आलें. दहाव्या तारखेस विंडसर महालांतील सेंट जार्ज नांवाच्या देवालयांत लग्नसमारंभ करण्यांत आला. इसवी सन ११२२ नंतर या देवळांत हा बादशाही लग्नसमारंभ पहिलाच असल्यामुळें देवळाच्या रचनेंत या प्रसंगाला योग्य असा फेरफार करून देवालय शृंगारण्यांत आलें होतें. हा दिवस सर्व इंग्लंडदेशभर सणाप्रमाणें लोकांनीं पाळला. प्रिन्स आल्बर्ट यांच्या खेदकारक मरणानिमित्त दुःखसूचक खूण आजपर्यंत वापरण्यांत होती ती याउपर कोणीं वापरूं नये असा सरकारी जाहीर हुकूम प्रसिद्ध झाला होता. दुपारचे बारा वाजतां लग्नसमारंभास सुरुवात झाली. त्याकरितां क्यांटर्बरीचा मुख्य धर्माध्यक्ष दुसऱ्या धर्माध्यक्षांसह हजर होता.

तेथें जमलेल्या सर्व मंडळींनें प्रसंगास अनुरूप असा भपकेदार पोशाख केला होता. प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांनीं पांढऱ्या साटिणीचा मूल्यवान् झगा पेहेरला होता. त्या झग्यावर नारिंगी रंगाची वेलबुट्टी काढलेली होती. आपल्या भावी प्रियपतीकडून भेट म्हणून आलेलीं कर्णभूषणें कानांत घातलीं होतीं. मोत्यांचा कंठा व हिऱ्यांचा हार गळ्यांत घातला होता. हातांत तीन रत्नजडित सुवर्णकंकणें घातलीं होतीं. या तीन कंकणांपैकीं एक महाराणी व्हिक्टोरिया यांजकडून, दुसरें म्यांचेस्टरच्या स्त्रीसमाजाकडून आणि तिसरें लीड्स शहरांतील स्त्रीसमाजाकडून भेट म्हणून आलेलें होतें. लंडन शहरच्या वतीनें म्युनिसिपल कार्पोरेशनकडून दीड लाख रुपये किंमतीची हिऱ्यांची माला भेट म्हणून आली होती. लग्नसमारंभास आमंत्रण दिलेले असे [illegible]० प्रतिष्ठित उमराव व सभ्यगृहस्थ आले होते. आरंभीं नवरदेवांची स्वारी देवळांत दाखल झाली व मागून राजकन्या आपल्या आठ सख्यांसहवर्तमान तेथें आल्यावर विवाहविधि रीतीप्रमाणें करण्यांत आला. विधि पुरा झाल्यावर जवळच्या दालनांत महाराणी व्हिक्टोरिया लग्नविधि पाहत बसल्या होत्या त्या दालनांत हें नवें बादशाही दंपत्य त्यांचा आशीर्वाद घेण्याकरितां गेलें. तेथें राणीसाहेबांसमक्षच करारपत्रावर सहीसाक्ष होऊन करारपत्र रीतीप्रमाणें पुरें करण्यांत आलें. समारंभ पुरा झाल्यावर त्याच दिवशीं संध्याकाळीं हें राजदंपत्य असबोर्न एथील राजवाड्यांत आनंदाचे दिवस घालविण्याकरितां गेलें. या विवाहोत्सवानिमित्त लंडनमधील सर्व नाटकगृहें अगदीं फुकट उघडीं असून वाटेल त्यानें मौज पाहण्यास जावें यावें, असें चाललें होतें.

परमेश्वरकृपेनें इ. स. १८६४ च्या जानेवारी महिन्यांत प्रिन्सेस आलेक्झांड्रा यांच्या पोटीं पुत्ररत्न जन्मास आलें. ही बातमी समजतांच लोकांच्या आनंदास पार राहिला नाहीं. या पुत्राचें नांव प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर. हे सुमारें २० वर्षांपूर्वी हिंदुस्तान पाहण्याकारतां आले होते. दुसऱ्या वर्षी म्हणजे इ. स. १८६५ त दुसरे राजपुत्र जन्मास आले. त्यांचें नांव जार्ज फ्रेडरिक ड्यूक आफ यार्क. पहिले राजपुत्र प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर हे ईश्वरी इच्छेनें आपल्या वयाच्या २८ व्या वर्षी स्वर्गवासी झाल्यामुळें युवराज म्हणजे प्रिन्स आफ वेल्स ही पदवी जार्ज फ्रेडरिक यांस मिळाली, व हेच आपले नवे बादशाह झाले आहेत. ह्यांचा विद्याभ्यास त्यांच्या वडिलांप्रमाणेंच चांगला झाला आहे. या युवराजांचें लग्न प्रिन्सेस व्हिक्टोरिया मेरी आफ टेक यांच्याशीं इ. स. १८९३ सालीं झालें. यांस चार मुलगे व एक मुलगी अशीं पांच अपत्यें आहेत. हे युवराज आपल्या पत्नीसह इ. स. १९०५ सालीं हिंदुस्तान देश पाहण्याकरितां आले होते. तेव्हां सर्व देशभर आपल्या लोकांनीं राजनिष्ठापूर्वक त्यांचें उत्तम स्वागत केलें. यांच्याशिवाय आलेक्झांड्रा राणीसाहेबांस तीन मुली आहेत.

आलेक्झांड्रा राणीसाहेब अत्यंत सुस्वरूप, सुशील व सदाचरणी आहेत. त्यांच्यावर लोकांची फार भक्ति आहे. त्यांची पतिनिष्ठा लोकविश्रुत आहे. हें परस्पर अनुरूप दंपत्य होतें. असें सुखी दंपत्य पृथ्वीवर फार क्वचित् आढळतें.

## प्रकरण ६ वें.

## युरोपांतील प्रवास, आजार वगैरे.

युरोपांतील प्रवासाचें वर्णन करण्यापूर्वीं कांहीं किरकोळ गोष्टी राहिल्या त्या लिहून मग प्रवासवर्णनास सुरुवात करूं. ता० ३० अक्टोबर इ. स. १८४९ या दिवशीं लंडन शहरांत एक कोळशाचा बाजार उघडण्याचा समारंभ महाराणी व्हिक्टोरिया यांच्या हस्तें व्हावयाचा असें ठरलें होतें. परंतु महाराणी व्हिक्टोरिया यांस आयत्या वेळीं कांहीं अडचण आल्यामुळें तो समारंभ युवराजांच्या हस्तेंच साजरा करण्यांत आला. या वेळीं युवराजांचें वय आठ नऊ वर्षांचेंच होतें. युवराजांना पाहण्यासाठीं लंडन शहरांतील लोकांची फार दाटी झाली होती. युवराजांचे वडील प्रिन्स आल्बर्ट यांनीं एक मोठें प्रदर्शन भरविलें होतें. तें उघडण्याचा समारंभ इ. स. १८९१ सालीं झाला. त्या वेळींही युवराजांनीं त्या समारंभास हजर राहून आपल्या प्रजेला दर्शन दिलें.

रशिया आणि इंग्लंड यांच्यामध्यें इ. स. १८९९ त क्रिमियाची लढाई झाली. त्या लढाईंत मारले गेलेले व घायाळ झालेले अशा लोकांच्या कुटुंबांतील माणसांस मदत करण्याकरितां म्हणून एक धर्मार्थ फंड उभारला होता. त्या फंडास युवराजांनीं चांगली मदत केली व शिवाय स्वहस्तानें एक सुंदर चित्र काढून तें त्या फंडास अर्पण केलें होतें. तें चित्र विक्रीकरितां मांडिलें, तेव्हां त्या चित्राची किंमत सुमारें ८९० रुपये उत्पन्न झाली.

इ. स. १८६२ त एके दिवशीं पार्लमेंटांतील लार्डांच्या सभेंत




एडवर्ड बादशहा–उमर वर्षे २६. (पृष्ठ ३३)

एक लार्ड या नात्यानें ते एकदां येऊन बसले होते. याच साली आक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें युवराजांस डी. सी. एल्. ( डाक्टर आफ सिव्हिल लाज—म्हणजे रोमन कायद्यांत पंडित ) ही पदवी दिली. इ. स. १८६४ साली लंडन शहरांत एका दवाखान्याच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ युवराजांच्या हस्तें करण्यांत आला. या दवाखान्याच्या व्यवस्थेवर शेवटपर्यंत त्यांचें पूर्ण लक्ष होतें.

त्यांच्या वेळीं पृथ्वीवर जे राजेमहाराजे होते, त्यांत ह्या बादशाहांइतका प्रवास दुसऱ्या कोणींही केलेला नव्हता. लग्न झाल्यानंतर सुमारें एक वर्षानें आपल्या पुत्राला बरोबर घेऊन प्रियपत्नीसह ते डेन्मार्कमध्यें गेले. तेथें त्यांचा फार चांगला सत्कार झाला. तेथून ते स्वीडन देशांत जाऊन पुढें जर्मनी व बेलजम या देशांतून लंडनास परत आले. कांहीं महिन्यांनीं त्यांस आपल्या मेहुणीचे लग्नाकरितां रशियाची राजधानी सेंट-पीटर्सबर्ग एथें जावें लागलें. तेथें रशियाच्या झार महाराजांकडून त्यांचा फांर चांगला सत्कार झाला. तिकडून आल्यावर देशां-तल्या देशांत त्यांनीं थोडासा प्रवास केला, व कांहीं विश्रांति घेतल्यावर इ. स. १८६८ सालीं पुनः दूरच्या प्रवासाची त्यांनीं तयारी केली. फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया हे देश पाहून ट्रिएस्ट बंदरांत ते आगबोटींत बसले व थेट मिसर देशांतील अलेक्झां-ड्रिया बंदरास उतरले. तेथून ते मिसर देशाची राजधानी कायरो येथें गेले. तेथें त्यांचा चांगला सत्कार झाला. नाईल नदींत कांहीं सहल करून ते सुवेज येथें सुरू असलेलें कालव्याचें काम पाहण्या-करितां आले. कालव्याचें काम बहुतेक पुरें होत आलें होतें. हा

कालवा म्हणजे मनुष्य आपल्या ज्ञानबलानें केवढीं अजस्त्र कामें करूं शकतो याचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. हें कालव्याचें काम करणारा फ्रेंच इंजिनियर लेसेप्स हा होता. ह्या कालव्यानें तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र यांचा संबंध जोडला जाऊन पूर्वेकडील देशाशीं दळणवळण ठेवण्याला जवळचा जलमार्ग झाल्यामुळें व्यापारवृद्धीस फारच मदत होणार होती. इंजिनियर लेसेप्स यानें युवराजांना सर्व काम दाखवून कालव्याचा एक बंधारा फोडण्याचा समारंभ यांच्या हस्तें करवून यांचा सन्मान केला. तेथून युवराज आगबोटींत बसून तुर्कस्तानच्या सुलतानाचा पाहुणचार घेण्याकरितां कान्स्टांटिनोपल शहरास आले. युरोप खंडांत हें एकच मुसलमानी राज्य आहे. मुसलमान लोक पाहुण्याचा सत्कार करण्यांत फार खर्चिक असतात. ह्या त्यांच्या स्वभावाप्रमाणें सुलतानानें युवराजांचा बादशाही थाटानें सत्कार केला. युवराज्ञी अलेक्झांड्रा यांस जनानखाना दाखविण्यासाठीं सुलतान स्वतः घेऊन गेले. तेथें दोन तासपर्यंत सुलतान साहेबांबरोबर त्यांची मुलाखत झाली. सुलतानाकडून युवराजांस एक थाटाची मेजवानी देण्यांत आली. सुलतानाचा पाहुणचार घेतल्यावर युवराजांची स्वारी क्रिमिया येथें जाऊन तेथील इतिहासप्रसिद्ध कांहीं स्थळें पाहिल्यावर परत सुलतानाची भेट घेऊन ग्रीस देशांत आली व तेथून इटाली देशांत जाऊन लंडनास स्वारी दाखल झाली.

हा प्रवास आटपून आल्यावर कांहीं दिवसांनीं युवराजांवर एक फार मोठें संकट आलें. अपमृत्युच टळला म्हटलें तर विशेष शोभेल. इ. स. १८७१ सालच्या हिंवाळ्यांत काय कारणानें असेल तें असो, युवराजांस फारच सर्दी होऊन ताप भरला. ता. २२ नवंबर

रोजीं ही . चिंताकारक बातमी प्रसिद्ध झाली. त्या महिन्याच्या अखेरीस युवराजांचा आजार फार विकोपास गेला. सर्व प्रजाजन चिंताकारक झाले. जो तो राजपुत्रास आराम वाटण्यासाठीं परमेश्वराचा धांवा करूं लागला. सर्वांचें चित्त, क्षणोक्षणीं काय बातमी येतें, इकडे लागलें. सर्व ब्रिटिश साम्राज्यांत युवराजांस आराम पडावा म्हणून सर्व जातींच्या लोकांनीं अंतःकरणपूर्वक देवाची प्रार्थना चालविली. तारीख १ डिसेंबर रोजीं युवराज कांहीं शुद्धीवर आले. त्यांनीं पहिला प्रश्न केला तो " आज माझ्या प्रिय पत्नीचा वाढदिवस आहे ना? " हा होता. नंतर " मी आजारी आहें हें महाराणीस कळलें आहे काय? त्या येथें आल्या आहेत काय? " असे आणखी कांहीं प्रश्न विचारले. त्यावरून आतां त्यांची प्रकृति सुधारत जाणार असें सर्वांस वाटूं लागलें. परंतु कांहीं वेळानें युवराज पुनः बेशुद्ध झाले. सर्व मंडळी निराश होऊन त्यांच्या बिछान्याशीं जमली. डिसेंबर ता. ९ रोजीं ताप नाहींसा झाला. पण त्यांच्या आंगीं शक्ति मुळींच राहिली नाहीं. जरी थोडासा उतार पडलासा वाटला तरी खात्रीची आशा धरण्यास अद्यापि जागा नव्हती. तशांत युवराजांचे वडील प्रिन्स आल्बर्ट हे अशाच दुखण्यानें ता. १४ डिसेंबर रोजीं मरण पावले होते. त्यामुळें सदर तारखेस काय होतें कोणास ठाऊक, असें वाटून सर्वांचा जीव धागधूग करीत होता. तो दिवस आला आणि त्या दिवशीं युवराजांचें दुखणेंही वाढलें. तराजूचें पारडें कोणत्या बाजूस कलतें हें कोणासच समजेना. घरोघर युवराजांस आराम पडावा म्हणून अनन्यभावानें प्रार्थना सुरू झाल्या. जे दिवशीं वडील मरण पावले तेच दिवशीं मुलाचा पुनर्जन्म झाला.

युवराजांस आराम पडत चालला आणि लौकरच त्यांची प्रकृति चांगली सुधारली. नंतर सर्व प्रजाजनांनीं मिळून या संकटांतून युवराजांस वांचविल्याबद्दल एकेच दिवशीं परमेश्वराची प्रार्थना करावी असा ठराव होऊन ता० २७ फेब्रुवारी १८७२ हा दिवस प्रार्थनेसाठीं नेमला गेला. या दिवशीं जिकडे तिकडे—ज्या ज्या ठिकाणीं म्हणून ब्रिटिश साम्राज्याचें निशाण फडकत होतें त्या त्या ठिकाणीं—हा परमेश्वर प्रार्थनेचा समारंभ झाला. लंडन येथें सेंटपाल नांवाच्या मुख्य देवालयांत सर्व दर्जाचे १२ हजार लोक जमा झाले होते, खुद्द महाराणीही कुटुंबांतील मंडळीसह हजर होत्या. सर्वांनीं मिळून एकनिष्ठेनें परमेश्वराची प्रार्थना केली. हिंदुस्तानांतही, पारशी आपल्या अग्यारींत, मुसलमान आपल्या मशिदींत, हिंदु आपल्या देवालयांत, यहुदी आपल्या सायन्यगागमध्यें, येणेंप्रमाणें सर्व जातींचे लोक आपापल्या प्रार्थना मंदिरांत जमून सर्वांनीं एकभावानें प्रार्थना केली.

वरील संकटप्रसंगीं लोकांनीं युवराजांविषयीं जें प्रेम दाखविलें त्याबद्दल महाराणींनीं मुख्य प्रधान मि० ग्लाडस्टन यांस पत्र लिहून सर्व लोकांचे आभार मानिले. डा० जेनर यांस K. C. B. हा किताब* दिला व डा० गल यांस बारोनेटची पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. तसेंच या दिवसाच्या स्मर-

---

***टीपः**—K. C. B. नाइट कमांडर आफ धि बाथ. ही एक बहुमानाची पदवी आहे. चौथा हेनरी यांचा राज्यारोहण समारंभ इ.स. १३९९ त झाला, त्या वेळीं ही पदवी प्रथम उपयोगांत आली, आणि पहिला जार्ज यांनीं इ.स. १७२५ त हिचा उपयोग पुनः सुरू केला.

णार्थ म्हणून लंडन शहरांत एक फंड उभारला गेला. त्या फंडास महाराणींनीं १५ हजार व युवराजांनीं ७॥ हजार रुपये दिले व या फंडांतूनच सेंटपालें देवालयाचें काम पुरें करण्यांत आलें. प्रसिद्ध राजकवि लार्ड टॉनिसन यांनीं आपल्या काव्यांत या प्रसंगाचें वर्णन फार चटकदार भाषेंत केलें आहे.

# प्रकरण ७ वें.

## हिंदुस्तानचा प्रवास व मातृवियोग.

युवराजांचे कनिष्ठ बंधु ड्यूक आफ एडिन्बरो हे इ. स. १८७० सालीं हिंदुस्तानांत येऊन गेले. त्यांचा हिंदुस्तानांतील प्रजेनें चांगला सत्कार केला. ते परत गेल्यावर त्यांनीं हिंदुस्तानसंबंधीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या ऐकून युवराजांच्या मनांत आपणही एकदां हिंदुस्तान देश पहावा अशी इच्छा उत्पन्न झाली. महाराणी व्हिक्टोरिया यांच्याही मनांत युवराजांस हिंदुस्तानांत पाठवावें असें आलें. या प्रवासाच्या हिताहिताबद्दल इंग्लंडांत पुष्कळ चर्चा झाली. पुष्कळ मुत्सद्यांनीं आपापले विचार प्रसिद्ध केले होते. त्यांत मि० जान ब्राईट यांनीं जे विचार प्रगट केले होते, त्यांचा भावार्थ असाः—" युवराज आपल्या चांगल्या वर्तनानें, विनयानें, ममताळूपणानें, आणि ज्या प्रचंड लोक समुदायावर भविष्यकाळीं राज्य चालविण्याची महत्त्वाची जोखीमदारी त्यांच्यावर येणार आहे त्या हिंदुस्तानवासी लोकांशीं सहानुभूतिपूर्वक व स्नेहभावानें वागल्यानें, हिंदी प्रजेच्या मना-

वर जितका महत्त्वाचा परिणाम होईल तितका कोणतेंही सरकार आपल्या उत्तमोत्तम राजनीतीनें करूं शकणार नाहीं." अशा रीतीनें बरीच चर्चा झाल्यावर शेवटीं मंत्रिमंडळाच्या विचारानें इ० स० १८७५ सालीं युवराज यांनीं हिंदुस्तानास जावें व आपल्या राज्यांतील मुकुटमणि असा तो देश एक वेळां प्रत्यक्ष पहावा, असा ब्रिटिश सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला व हिंदुस्तानांत पाऊल ठेवल्यापासून पुनः तेथून निघेपर्यंत होणारा सर्व खर्च हिंदुस्तानच्या तिजोरींतूनच द्यावा, असें ठरविलें. ( समुद्रप्रवासाचा सर्व खर्च मात्र इंग्लंडनें सोसावा असें ठरलें. ) अमेरिकेंतील कानडा वसाहत पाहण्याकरितां युवराज गेले त्या वेळीं केलेली खर्चाची व्यवस्था या वेळीं तुलनेस घेणें बरें नव्हे, कारण, हिंदुस्तानांत व त्या वसाहतींत फार मोठें अंतर; दोहोंची परिस्थिति अगदीं निराळी. हिंदुस्तानांत परस्परांनीं परस्परांस नजर नजराणे करण्याची वहिवाट फार प्राचीन काळापासून चालत आलेली. तेव्हां त्या वहिवाटीप्रमाणें युवराजांसही तेथील संस्थानिकांस देण्यासाठीं कांहीं नजराणे नेणें जरूर. असा विचार करून ४००८० चाळीस हजार ऐशीं पौंड म्हणजे सुमारें ६०१२०० रुपये किंमतीच्या चिजा युवराजांनीं बरोबर न्याव्या असें ठरलें. हिंदुस्तानांत युवराज असत तोंपर्यंत ते व्हाइसरायांचे पाहुणे म्हणून मानले जावे व त्याबद्दल त्यांच्या स्वागतास साडेचार लक्ष रुपये लागतील असा अंदाज केला. सात लक्ष ऐशीं हजार रुपये प्रवासाकरितां लागणारा खर्च आरमार वगैरे सुद्धां व नऊ लक्ष रुपये खानगी खर्चास मंजूर करावे अशी सूचना पार्लमेंट पुढें आली.

इतका खर्च करण्याचें कांहीं एक प्रयोजन नाहीं व हिंदुस्तानावर इतका प्रचंड खर्च लादूंही नये; असें म्हणणारेही कांहीं सभासद निघाले. परंतु शेवटीं बहुमतानें हा खर्च करण्याचें ठरलें. प्रिन्स एडवर्ड हे महाराणीचे प्रतिनिधि म्हणून नव्हे, तर ब्रिटिश राज्याचे भावी राजे म्हणून त्यांनीं हिंदुस्तानांत जावें असा ठराव झाला. याप्रमाणें खर्चाची व्यवस्था ठरल्यावर प्रवासाची तयारी होऊं लागली. युवराजांनीं हिंदुस्तानसंबंधी व तेथील लोकासंबंधी मिळेल तितकी माहिती मिळविली. थोडे दिवस स्वस्थपणांत घालवून मातोश्री महाराणी व्हिक्टोरिया यांचा निरोप त्यांनीं घेतला व ता० ११ आक्टोबर इ. स. १८७५ या दिवशीं आगगाडींत बसून डोव्हर बंदरास जाण्यासाठीं स्वारी निघाली. योग्यतेनुरूप इतमामही बरोबर घेतला. बरोबरच्या सैन्याचे मुख्य अधिकारी म्हणून ड्यूक आफ संडरलंड, धर्माधिकारी क्यानन डकवर्थ, डाक्तर फेरर, लार्ड शेफील्ड, कर्नल एलिस, मुंबईचे माजी गव्हर्नर सर बार्टल फ्रियर, प्रसिद्ध चित्रकार हाल, आनररी प्रायव्हेट सेक्रेटरी डाक्टर रसेल वगैरे सरदार व गृहस्थ युवराजांबरोबर निघाले. युवराज्ञी अलेक्झांड्रा यासुद्धां फ्रान्स देशांतील क्याले बंदरापर्यंत आपल्या प्रियपतीस पोंचविण्यासाठीं आल्या होत्या. स्वारी मोठ्या थाटानें निघाली. ता० ११ आक्टोबर रोजीं लंडन शहर सोडलें, त्या वेळीं इंग्लंडांतील लोकांनीं युवराजांस मोठ्या उत्साहानें निरोप दिला; व प्रवास सुखावह होऊन त्यांनीं सुखरूप परत यावें अशी सदिच्छा दर्शविली.

डोव्हरला स्वारी आल्यावर क्यास्टेलिया नांवाच्या आग-

बोटींत बसून स्वारी क्याले बंदरास जाऊन पोंचली. तेथून पुढें रेलवे रस्त्यानें पारीस, ट्युरीन, बोलोना वगैरे शहरांवरून ता० १६ रोजीं ब्रिन्डिसी बंदरांत स्वारीचा मुक्काम झाला. एथपर्यंतचा हा प्रवास खासगी नात्यानें झाला. त्या बंदरांत युवराजांकरितां म्हणून सिरापिस नांवाची आगबोट तयार ठेविली होती. त्या आगबोटींत बसून स्वारी पुढें निघाली. संरक्षणाकरितां म्हणून आरमाराकडील तीन जहाजें बरोबर होतीं. ता० १८ रोजीं आथेन्स येथें जाऊन ता० २३ रोजीं पोर्टसय्यद बंदरास स्वारी पोंचली. तेथून इस्मालिया शहरास जाऊन मिसर देशच्या खेदिवाची केरो राजधानींत त्यांनीं मुलाखत घेतली. या प्रसंगीं खेदिवाच्या मुलास त्यांनीं एक बहुमानाचा किताब दिला. पुनः परत फिरून सिरापिस आगबोटीवरून प्रवास पुढें सुरू झाला. ता० १ नवंबर रोजीं प्रातःकाळीं एडन बंदरांत स्वारीचा मुक्काम झाला. एडन येथें तेथील रहिवाशांनीं युवराजांस मानपत्र अर्पण केलें, व लेव्हीचा ( धुळभेटीचा ) समारंभ करून लाहेज येथील सुलतानास युवराजांनीं एक किताब दिला. रात्रीं पुनः आगबोटींत बसून स्वारी मुंबईस जाण्याकरितां निघाली.

मोहमयी मुंबापुरी युवराजांचें स्वागत करण्याकरितां आपल्या नागरिक परिवारासह अत्यंत उत्सुकतेनें तयारच होती. पुष्कळ राजेरजवाडे युवराजांची भेट घेण्याकरितां आले होते. मोठेमोठे सरकारी अम्मलदारही स्वागत समारंभ साजरा करण्याकरितां मुंबानगरींत जमा झाले होते. ता० ८ नवंबर इ. स. १८७५ रोजीं रात्रीं २ वाजतां सिरापिस आगबोटीवरून मुंबईच्या कुलाबदांडीवरील दिवा दिसूं लागला. तेव्हां आगबोटीचा वेग कमी

करण्यांत आला. उजाडतां उजाडतां मुंबईचा किनारा स्पष्ट दिसूं लागला. युवराजांना सामोरें जाण्याकरितां म्हणून बंदरांत ज्या आरमारी बोटी जमा झाल्या होत्या त्या सर्व त्यांस सामोऱ्या जाऊन एका रांगेनें उभ्या राहिल्या व युवराजांबरोबर आलेल्या संरक्षक बोटी दुसऱ्या रांगेनें उभ्या राहिल्या. त्या दोन रांगांमधून सिरापिस आगबोट पुढें जाऊन मुंबई बंदरांत दाखल झाली. आगबोट दाखल होतांच सलामीच्या तोफांचे आवाज काढण्यांत आले. ते आवाज ऐकतांच मुंबईतील सर्व लोकांस युवराजांची स्वारी येऊन दाखल झाल्याचें वृत्त समजलें. युवराजांची स्वारी संध्याकाळीं चार वाजतां किनाऱ्यावर येण्याचें ठरलें होतें. तथापि युवराजांचें दर्शन व्हावें म्हणून दुपारीं बारा वाजल्यापासूनच लोक जमूं लागले. हिंदुस्तानचे व्हाइसराय व गव्हर्नर जनरल लार्ड नार्थब्रुक हे युवराजांस सामोरे जाण्याकरितां मुंबईस आले होते, ते ३ वाजतां सिरापिस आगबोटीवर गेले. त्यांची मुलाखत होऊन ते परत आल्यावर युवराजांची स्वारी बरोबर ४ वाजतां बंदरावर येऊन उतरली. त्याबरोबर सलामीच्या तोफा पुनः सुरू झाल्या; व पूर्व संकेताप्रमाणें हिंदुस्तानांतील सर्व लष्करी छावणींत तारेनें वर्दी दिल्यावर हिंदुस्तानभर प्रत्येक लष्करी छावणींत सलामीच्या तोफा सुटून सर्व देश गजबजून गेला व त्याच वेळीं सर्व लोकांस युवराजांचें आगमन हिंदुस्तानांत झाल्याचें आनंददायक वृत्त समजलें.

जमिनीवर उतरतांच नामदार व्हाइसराय लार्ड नार्थब्रुक व मुंबईचे गव्हर्नर हे दोघे पुढें होऊन त्यांनीं युवराजांचा सत्कार केला. निजाम सरकारचे प्रतिनिधि म्हणून सर सालरजंग यांची

प्रथम मुलाखत झाली. नंतर बडोदें व म्हैसूर येथील बालराजांची मुलाखत झाली. त्यांच्या मागून सर जमशेटजी जिजीभाई यांची चौकशी करून युवराजांनीं त्यांच्याबरोबर हस्तस्पर्श केला. याच ठिकाणीं मुंबई म्युनिसिपालिटीकडून युवराजांस मानपत्र देण्यांत आलें. त्यास योग्य उत्तर दिल्यावर युवराजांची स्वारी मोठ्या इतमामानें परळ येथील सरकारी महालांत जाऊन उतरली. स्वारी ज्या रस्त्यानें गेली तो सर्व रस्ता उत्तम प्रकारें शृंगारला होता.

दुसरे दिवशीं म्हणजे ता० ९ नवंबर रोजीं युवराजांचा ३४ वा वाढ दिवस असल्या कारणानें उत्सव करण्यांत आला. तन्निमित्त एक दरबार भरविण्यांत आला. तो दरबार फारच मोठ्या थाटाचा झाला. युवराज एका रौप्यसिंहासनावर बसले होते. त्या सिंहासनाच्या पाठीमागें महाराणीची तसबीर लाविली होती. हिंदुस्तानांतील पुष्कळ संस्थानिक व राजे आपापल्या परीनें आपल्या भावी सार्वभौम बादशहांचें स्वागत करण्यासाठीं तेथें आले होते प्रथमतः कोल्हापूरचे छत्रपति महाराज यांची मुलाखत झाली. त्या वेळीं महाराजांचें वय फक्त १२ वर्षांचें होतें. त्यांचा पोषाख तांबड्या व पांढऱ्या मखमलीचा होता; अंगावर रत्नजडित अलंकार होते, व बहुमोल मोत्यांचा तुरा त्यांचे पगडींत खोवलेला होता. महाराजांचें इतकें अल्प वय, पण मनाची अस्वस्थता न होतां ते मोठ्या ऐटीनें त्या समारंभांत वागले. वरील मुलाखत झाल्यानंतर बडोदें व म्हैसूर येथील राजे, मेवाडचे महाराणे, कच्छचे राव, जुनागडचे नबाबसाहेब, नवानगरचे जामसाहेब, खैरपूरचे मीरसाहेब वगैरे दुसरे राजेरजवाडे यांची मुलाखत झाली.

त्याच दिवशीं संध्याकाळीं दुसरा एक दरबार झाला. या दरबारांत विशेषतः इंग्रज अधिकारी होते. या दरबारानंतर त्यांच्या नांवची एक गोदी स्थापन करण्याचा अर्थात् तिचा पाया घालण्याचा समारंभ झाला. रात्रीं मुंबई शहरांत दीपोत्सव केला होता. सर्व हिंदुस्तान देशांत आजचा दिवस उत्सवाचा मानून सर्वत्र सुटी दिली होती. त्या वेळीं मुंबईचे गव्हर्नर सर फिलिप वुडहाऊस हे होते. त्यांनीं रात्रौ युवराजांस थाटाची मेजवानी दिली. मुंबईस मुक्काम असतां युवराज पुणें येथें जाऊन आले. तेथें त्यांचा चांगला सत्कार झाला. तेथें त्यांनीं सर्व सैन्याची परेड घेतली. पुण्याहून परत आल्यावर ते बडोद्यास गेले. तेथें त्यांनीं हिंदुस्तानांतील शिकार कशी असते याचा पहिल्या प्रथम अनुभव घेतला. त्यांनीं एक हरिण मारला, एका रानडुकराची शिकार केली, व बडोद्यास बरेच आनंदानें दिवस घालविले. नंतर पुनः मुंबईस परत येऊन गोव्याकडे जाण्याचा बेत केला. निघण्यापूर्वीं हिंदु लोकांची विवाहपद्धति पाहण्याच्या हेतूनें सर मंगळदास नथूभाई यांचे घरीं विवाह समारंभ पाहण्याकरितां ते गेले होते. युवराज मुंबईस असतां पोलिस कमिशनर मि० सौटरसाहेब यांनीं त्यांची उत्तम व्यवस्था ठेविली होती. त्यावरून खुष होऊन युवराजांनीं त्यांस “ सर ” हा किताब दिला. मुंबईहून निघतांना त्यांस पोंचविण्याकरितां पुष्कळ राजेरजवाडे मुंबईस आले होते.

गोव्यास गेल्यावर तेथील पोर्टुगीज गव्हर्नर जनरल यांनीं त्यांचा चांगला सत्कार केला. तेथील प्रेक्षणीय स्थळें पाहून आपल्या आरमारासह स्वारी ता० १ डिसेंबर रोजीं सिलोनास

दाखल झाली. तेथें त्यांनीं क्यांडी शहर पाहिलें; तेथें त्यांनीं हत्तींची शिकार केली व कित्येक सरदारांची मुलाखत घेऊन स्वारी मद्रासेस गेली. तेथें मुंबई प्रमाणेंच त्यांचा थाटानें सत्कार झाला. मद्रास इलाक्यांतील सर्व राजेरजवाडे त्यांस सामोरे आले होते. म्हैसूर वगैरे स्थळें पाहण्यांत कांहीं दिवस घालवून युवराज हिंदुस्तानची राजधानी कलकत्ता येथें गेले. तेथें व्हाइसरायांकडून त्यांचा चांगला सत्कार झाला. तेथें ग्वाल्हेर, इंदूर, जयपूर, पत्याळा, काश्मीर, पन्ना येथील महाराजे युवराजांच्या स्वागतार्थ सामोरे आले होते. भोपाळच्या बेगमसाहेबही आल्या होत्या. त्या सर्वांची मुलाखत झाल्यावर युवराज चंद्रनगरास जाऊन आले. परत आल्यावर त्यांनीं नेपाळच्या राजाकडून आलेल्या वकिलाची भेट घेतली.

महाराणी व्हिक्टोरिया यांच्या आज्ञेप्रमाणें ता० १ जानेवारी इ. स. १८७६ रोजीं कलकत्ता येथें मोठा दरबार भरविण्यांत आला, व जोधपूर वगैरे ठिकाणच्या महाराजांना जी. सी. एस्. आय् ( ग्रँड कमँडर आफ धी स्टार आफ इंडिया ) वगैरे मानाचे किताब दिले. त्याच दिवशीं, व्हाइसराय व गव्हर्नर जनरल लार्ड मेयो यांचा आंदमान बेटांत खून झाला होता, त्यांचा पुतळा अनावृत करण्याचा समारंभ युवराजांचे हस्तें करविण्यांत आला. युवराज कलकत्ता येथें असतां तेथील युनिव्हर्सिटीनें त्यांस “एल्. एल्. डी.” ( डाक्टर आफ लाज– कायदेपंडित ) ही विद्वत्तासूचक पदवी अर्पण केली. कलकत्त्यास त्यांचा बरेच दिवस मुक्काम झाला. या ठिकाणीं त्यांस पुष्कळच समारंभ आपल्या आगमनानें सुशोभित करावे लागले.



आग्रा एथील हत्तीवरील मिरवणूक. (पृष्ठ ४५)

The Bombay Art Printing Works, Fort.

तेथून स्वारी काशीस गेली, व काशीहून लखनौस गेल्यावर त्यांनीं सन १८५७ सालीं ज्या एतद्देशीय शिपायांनीं इंग्रज सरकारच्या रेसिडेन्सीचें संरक्षण उत्तम प्रकारें केलें त्यांच्या नांवाचें एक स्मारक स्थापन करण्याचा विधि त्यांनीं उरकला. या समयीं त्यांनीं जें भाषण केलें तें फारच उत्तम होतें. त्यांत आमच्या एतद्देशीय शिपायांचा त्यांनीं मोठा गौरव केला होता. या समारंभाचे वेळीं हृदयद्रावक अशी एक गोष्ट घडून आली. लढाईंतील जखमेमुळें बहुतेक आंधळा झालेला असा एक बहादुर वृद्ध शिपाई आपल्या मुलाचा हात धरून तेथें आला व मोठ्यानें ओरडून म्हणाला; " मला युवराजांना पहावयाचें आहे, माझी भेट करवा. " युवराज त्याचा आशय समजले व त्या म्हाताऱ्याला आपल्याजवळ घेऊन येण्यास जवळच्या अंमलदारांस त्यांनीं परवानगी दिली. त्या म्हाताऱ्यानें आपली पगडी काढून युवराजांना सलाम केला व अगदीं जवळ जाऊन युवराजांना त्यानें निरखून पाहिलें व मोठ्यानें म्हणाला, " युवराजांना पाहण्याला मी अद्याप जिवंत राहिलों, हे ईश्वराचे मजवर मोठे उपकार आहेत!" ज्या वेळीं हस्तस्पर्श करण्याकरितां युवराजांनीं त्याचा हात आपल्या हातांत घेतला त्या वेळीं त्या म्हाताऱ्यास गहिंवर येऊन तो हुंदके देत रडूं लागला.

पुढें लखनौ येथून स्वारी कानपुरास गेली. तेथून दिल्ली येथें गेल्यावर मोठा थोरला धुळभेट समारंभ करून व आपल्या हिंदुस्तानांतील सैन्याचें एकवार निरीक्षण करून ते आग्र्याकडे गेले. आग्र्यास ताजमहाल ही इमारत पाहून स्वारी फारच आनंद पावली. दीपप्रकाशांत ताजमहालाची शोभा कशी काय दिसते

हें पाहण्याची इच्छा झाल्यामुळें तेथें दीपोत्सव करून पाहून व चंद्रप्रकाशांतीलही सौंदर्य पाहून स्वारी तेथून जयपुराकडे गेली. जयपुरास वाघाची शिकार करून स्वारी अलाहाबाद, जबलपूर वगैरे ठिकाणीं गेली. जबलपुरच्या तुरुंगांत सात ठग लोकांशीं त्यांनीं बराच वेळ भाषण केलें. या ठगांपैकीं एकानें अशी विलक्षण बढाई मिरविली कीं, आपण एकंदर सदुसष्ट खून केले!

मार्चच्या १३ व्या तारखेस हिंदुस्तानचा प्रवास पुरा झाला व मुंबईहून परत जाण्यास युवराजांची आगबोट हाकारली गेली. हिंदुस्तान व सिलोन मिळून एकंदर सतरा आठवडे स्वारी हिंदुस्तानांत होती. तितक्या मुदतींत युवराजांचा प्रवास जलमार्गानें २३०० आणि स्थलमार्गानें ७६०० मैल झाला. सिरापिस गलबत हाकारण्यापूर्वीं हिंदुस्तानवासी लोकांस आभारप्रदर्शक असें एक पत्र व्हाइसराय लार्ड नार्थब्रुक यांचे मार्फत युवराजांनीं पाठविलें. त्यांतील मतलब असा होता. " मातोश्री महाराणी व्हिक्टोरिया यांच्या कृपेनें एक अद्भुत देश मला पाहण्यास मिळाला. हा अद्भुत देश स्वतः एकवार पहावा व त्यांतील लोकांचें प्रेम संपादन करावें अशी माझी बरेच दिवसांची इच्छा होती ती आज सफळ झाली. इकडे येण्यापूर्वीं जो माझा अजमास होता त्या अजमासापेक्षां कितीतरी पटीनें माझी इच्छा तृप्त झाली. मी येथें असतां जें पाहिलें व ऐकिलें आहे त्याचा विसर मला कधीं होणार नाहीं. या देशांत मला जो अनुभव आला त्याचा पुढें फार उपयोग होणार आहे. येथील राजेरजवाडे व प्रजाजन यांनीं अत्यंत प्रेमानें माझा जो सत्कार केला त्यामुळें मी फार आनंदित झालों आहें. त्यांच्या राजभक्तीचें हें खरें लक्षण आहे.

इंग्रजी राज्यापासून आपला फायदा काय आहे याचा अनुभव जसा जसा येत जाईल तसतशी, हिंदुस्तानांतील लोकांची उन्नति व्हावी असाच ब्रिटिश लोकांचा हेतु आहे, अशी त्यांची खात्री होणार आहे. हिंदुस्तानांतील देशी सैन्य पाहून मला मोठा अभिमान वाटतो. सिव्हिल सर्व्हंट लोकांच्या संबंधानें माझा अनुकूल ग्रह झाला आहे. ते आपल्या कर्तव्यांत दक्ष असून त्यामुळें प्रजेची उन्नति व समाधान हीं वाढत आहेत. आपल्या हाताखालच्या नोकरांसह आपण माझी जी बरदास्त ठेविली, तिचें स्मरण मला नेहमीं राहील. इ० इ०."

युवराज इकडे यावयास निघाले त्या वेळीं हिंदुस्तानांतील संस्थानिकांस देणग्या देण्यासाठीं सुमारें ४० हजार पौंड म्हणजे आजच्या मानानें सहा लक्ष रुपये किमतीच्या चिजा युवराजांनीं आपल्या बरोबर आणिल्या होत्या. परंतु त्यांना नजराणे मिळाले त्यांची किंमत करूं गेल्यास वरील किमतीची कमींत कमी पंधरापट तरी करावी लागेल. या सर्व चिजांचें व इकडून नेलेल्या जनावरांचें एक जंगी प्रदर्शनच त्यांनीं इंग्लंडांत केलें. राजकीय दृष्ट्या काय किंवा दुसऱ्या कोणत्याही दृष्टीनें काय, ही हिंदुस्तानची सफर त्यांस व हिंदुस्तानवासी लोकांस फार हितावह झाली. ज्या लोकांनीं ह्या सफरीविरुद्ध आक्षेप घेतले होते त्यांचीं तोंडें बंद झालीं. युवराज इंग्लंडांत परत गेल्यावर त्यांचें लंडन शहरच्या लोकांनीं फारच उत्तम प्रकारें स्वागत केलें. या वेळीं एक मेजवानी व एक नाच शहरच्या खर्चानें देण्यांत आला. या समारंभाची सर्व व्यवस्था व शृंगार हीं हिंदुस्तानच्या धर्तीवर

केलीं होतीं. निमंत्रण चिठ्या काढल्या होत्या त्याही आग्र्याच्या ताजमहालाच्या सुंदर चित्रानें सुशोभित केल्या होत्या.

अमेरिका, युरोप, हिंदुस्तान वगैरे देशांत प्रवास केल्यानें युवराजांना ब्रिटिश साम्राज्यांतील निरनिराळ्या प्रजेच्या समागमापासून जो अनुभव मिळाला तो फार महत्त्वाचा आहे. देशाटन केल्यानें सामान्य मनुष्यही हुशार होतो, मग युवराजांसारखे सुशिक्षित देशाटनापासून किती फायदा करून घेत असतील याची कल्पनाच केली पाहिजे. हिंदुस्तान प्रत्यक्ष पाहिल्यानें तर त्यांचा फारच फायदा झाला असला पाहिजे. हा आमचा हिंदुस्तान देश म्हणजे सृष्टिवैभवाचें एक संग्रहस्थानच आहे. कोणताही देश सृष्टिवैभवांत हिंदुस्तानची बरोबरी करूं शकेल असें नाहीं. कोणत्याही कटिबंधांतील हवामानाचा अनुभव आपल्या देशांत घेतां येतो. हिमालय पर्वतानें तर पृथ्वीवरील सर्व पर्वतांचा गर्वपरिहारच केला आहे! कोहिनूर सारखें रत्न प्रसवणारी हिऱ्याची खाण, काश्मीर सारखें स्वर्गभुवन, सिंधु, गंगा यांसारख्या महानद्या, गंगायमुनांच्या संगमासारखें हिंदुमुसलमान या दोन जातींचें संमेलन, पारशी लोकांसारखे हुशार लोक, पातिव्रत्यधर्माचें परिपालन करणारा हिंदुस्तानांतील पवित्र महिला—समाज, हिंदुस्तानची शांतचित्त, अल्पसंतुष्ट व राजनिष्ठ प्रजा हिंदुस्तानांतील प्रामाणिक राजेरजवाडे, हीं सर्व कोणत्या देशांत बरें पहावयास सांपडतील? हळदीघाट, पानिपत वगैरे सारखीं रणक्षेत्रें, निरनिराळ्या जातींचें कल्पनातीत संमिश्रण, दहा दहा बारा बारा कोशांवर बदलत जाणाऱ्या हजारों भाषा, धर्ममतें विरुद्ध असतांही एकमेकांशीं सलोख्यानें वागणारे भिन्न भिन्न धर्मांचे लोक, हीं सर्व दुसऱ्या

कोणत्या देशांत एकत्र पहायला मिळणार आहेत? तसेंच ताज-महालासारखी सुंदर इमारत, शीख लोकांचें सुवर्णमंदिर, बौद्ध धर्मीयांचे विहार व गुंफा, आबू पर्वतावरील जैन लोकांचीं पवित्र मंदिरें, निरनिराळ्या तऱ्हेच्या बांधणीचीं भव्य देवालयें व सती-स्त्रियांचीं स्मारकें, काळे पांढरे मदोन्मत्त हत्ती, सुगंधराज कस्तुरी-मृग, बहुमूल्य मोतीं, मोरासारखे सुंदर पक्षी, चंदन, आंबा वगैरे सारखे दुसरीकडे न आढळणारे वृक्ष, देशी राजांचीं निरनिराळ्या तऱ्हेचीं राजचिन्हें व थाटमाट, त्यांच्या दरबारी लोकांकडून त्यांचा होणारा निरनिराळ्या तऱ्हेचा सन्मान, पाहुण्यांचा सत्कार करण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा, हीं सर्व एक समवायानें दुसऱ्या कोणत्या देशांत आहेत बरें? अशा तऱ्हेचा अनुपम देश पाहून राजपुत्रांना खरोखरच आश्चर्य वाटून आपल्या राज्यांत हा देश सामील झाल्याबद्दल त्यांस खात्रीनें धन्यताही वाटली असेल.

हा प्रवास आटपून परत गेल्यावर लोकोपयोगी कामें करण्या-कडे युवराजांनीं लक्ष दिलें. शेतकीचीं प्रदर्शनें पहावीं; गुरांची सुधारणा कशी करावी, दूधदुभत्याचा धंदा किफायतशीर होण्यास काय केलें पाहिजे, या बद्दल विचारपूस करावी; दवाखाने स्थापन करावे; केव्हां केव्हां लष्कराची कवाईत पहावी; अशा रीतीनें ते नेहमीं कांहींना कांहींतरी कामांत गुंतलेले असत. इ.स. १९०१ मध्यें बादशहांच्या कार्य कर्तृत्वाविषयीं एकानें असा अजमास केला आहे कीं, त्यांनीं १०० पेक्षां जास्त वेळ जाहीरसभेंत भाषणें केलीं आहेत. इमारतींच्या पायांचे दगड बसविण्याचे समा-रंभ ८१ वेळां त्यांचे हातून करण्यांत आले. निरनिराळ्या ७९ प्रसंगीं ते धर्मपिते ( गॉड फादर ) झाले होते. युरोपांत सरदार

लोकांचे जे किताब आहेत ते सर्व यांना मिळाले होते. जाहीर समारंभांस हजर राहण्याचे प्रसंग यांना वरचेवर येत असत. आठ वेळां ते कर्नल होते. एक वेळ फिल्डमार्शल व एक वेळ ते अडमिरल होते. इंग्रजी भाषेशिवाय जर्मन, फ्रेंच, इटालियन आणि रशियन ह्या भाषा त्यांस येत होत्या. इ.स. १८७८ मध्यें पारीस येथें मोठें प्रदर्शन भरलें होतें त्या वेळीं ब्रिटिश कमिशनचे ते मुख्य होते. इ.स. १८८३ मध्यें माशांच्या निरनिराळ्या जातींचें प्रदर्शन भरलें त्यांतही हे पुढारी होते. इ.स. १८८७ मध्यें महाराणी व्हिक्टोरिया यांच्या जुबिली महोत्सव—प्रसंगीं यांनीं पुष्कळ मेहनत घेतली होती. अशा रीतीनें ते लोकांत मिळून मिसळून वागत होते.

इ० स० १९०० मध्यें ह्यांच्यावर एक संकट आलें होतें. प्रवासांत ब्रूसेल्स येथें एका स्टेशनावर गाडींत असतां एका माथेफिरूनें त्यांच्यावर बंदुक झाडली; परंतु ईश्वरीकृपेनें गोळी चुकून त्यांस कांहीं इजा झाली नाहीं.

यांच्या वयास ६० वर्षें होत पर्यंत हे प्रिन्स आफ वेल्स ( युवराज ) होते. पण महाराणी व्हिक्टोरिया यांच्या वृद्धपणामुळें त्यांस बादशहा या नात्यानेंच बहुतेक प्रसंगीं वागावें लागे. महाराणीच्या राज्यकारभारास ६० वर्षें झाल्याबद्दल हीरक ज्युबिली या नांवाचा महोत्सव इ. स. १८९७ च्या जून महिन्यांत करण्यांत आला. त्या प्रसंगाच्या स्मरणार्थ म्हणून त्यांनीं एक दवाखाना सुरू केला.

हा ज्युबिली समारंभ झाल्यावर महाराणी व्हिक्टोरिया फार वर्षें जिवंत राहिल्या नाहींत. त्रासष्ट वर्षांच्या सतत परिश्रमामुळें

६५८

व वृद्धावस्थेमुळें त्यांची प्रकृति क्षीण होत होत इ.स. १९०१ च्या जानेवारीच्या २२ व्या तारखेस सायंकाळीं ६॥ वाजतां शांत चित्तानें त्यांचें देहावसान झालें! या प्रसंगीं कुटुंबांतील सर्व मंडळी त्यांच्या जवळच होती, त्यांस फार दुःख झालें; व त्यांच्या प्रजेसच नव्हे तर इतर राज्यांतील लोकांसही फार दुःख झालें! त्यांच्या वैभवास शोभेल अशा थाटानें तारीख ७ फेब्रुवारी रोजीं त्यांचें और्ध्वदेहिक कृत्य करण्यांत आलें. त्यांचें शव एका पेटींत घालून त्यांच्या पतीच्या शेजारींच पुरलें आहे; आणि त्यावर समाधि बांधून त्या समाधीवर पुढील अर्थाचा लेख लाटिन भाषेंत लिहिला आहे.

> येथें परम पवित्र, सर्व समर्थ आणि सर्वश्रेष्ठ राणी व्हिक्टोरिया, धर्मसंरक्षक, ग्रेटब्रिटनची राणी व हिंदुस्थानची बादशाहीण यांचें शरीर ठेविलें आहे.

## प्रकरण ८ वें.

### राज्याभिषेक व दिल्लीदरबार.

महाराणी व्हिक्टोरिया स्वर्गवासी झाल्यामुळें ता० २२ जानेवारी इ.स. १९०१ या दिवशीं युवराज एडवर्ड हे इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशहा झाले; असें सर्वत्र प्रसिद्ध करण्यांत आलें.

दुसरे दिवशीं इंग्लंडच्या रिवाजाप्रमाणें प्रिव्ही कौन्सिलांत त्यांनीं शपथ घेतली व सातवे एडवर्ड या नांवानें राज्यकारभार चालविण्याचा जाहीरनामा ब्रिटिश राज्यांतील सर्व भागांत प्रसिद्ध करण्यांत आला. नंतर पार्लमेंट सभा भरून तींतील सर्व सभासदांनीं राजनिष्ठेच्या शपथा घेतल्या; आणि त्याच दिवशीं सातवे एडवर्ड बादशहांनीं सर्व राजकीय किताब धारण केले. ता. ४ फेब्रुवारी रोजीं हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व इतर प्रजाजन यांस उद्देशून आपल्या राजनीतीच्या धोरणासंबंधीं जाहीरनामा त्यांनीं प्रसिद्ध केला. पुढें थोडे दिवसांनीं म्हणजे ता० १४ फेब्रुवारी रोजीं राणी अलेक्झांड्रा ह्यांसहित एडवर्ड बादशहा ह्यांनीं पार्लमेंट सभेंत स्वतः जाऊन ती सुरू करण्याचा समारंभ केला.

कांहीं दिवसांनीं बादशहांनीं आपल्या पुत्रास आस्ट्रेलियाच्या प्रवासास पाठविलें. राजपुत्र ड्यूक ऑफ् यार्क ( सध्यांचे बादशहा ) हे आस्ट्रेलियास गेल्यावर मेलबोर्न येथें त्या वसाहतींचें संयुक्त पार्लमेंट सुरू करण्याचा विधि त्यांचे हस्तें करण्यांत आला. राजपुत्र तेथून निघून अमेरिकेच्या वाटेनें परत इंग्लंडास गेले. ते परत गेल्यावर त्यांस प्रिन्स ऑफ् वेलस हा किताब देण्यांत आला. महाराणी व्हिक्टोरिया परलोकवासी झाल्यावर लागलीच सातवे एडवर्ड हे इंग्लंडचे राजे झाल्याबद्दल जरी द्वाही फिरविण्यांत आली होती तरी खरा राज्याभिषेक म्हणून पुढें व्हावयाचा होता. राज्याभिषेकापूर्वीं आपल्या राज्यांत सर्वत्र सुखसमाधान व शांतता असावी असा बादशहांचा हेतु होता. व त्याप्रमाणें ट्रान्सवालांतील बोअर लोकांबरोबर

बरेच दिवस चाललेलें युद्ध बंद पाडून परस्पर सलोखा करण्याचा प्रयत्न करण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली. दक्षिण आफ्रिकेंत ट्रान्सवाल म्हणून एक प्रजासत्ताक राज्य होतें. त्या राज्यांत युरोपांतील लोकांनींच वसाहत केलेली होती. इतर देशांतील लोकांबरोबर इंग्लंडांतील लोकही त्या देशांत जाऊन राहिलेले आहेत. इंग्लिश लोक व इतर लोक यांच्यांत हक्कांसंबंधानें कांहीं लढा उत्पन्न होऊन अखेर लढाई करण्याचा प्रसंग आला. त्या प्रजासत्ताक राज्याचा प्रेसिडेंट क्रूगर यानें लढाईस सुरुवात केली. ट्रान्सवालच्या मदतीस त्याच्याच शेजारचे ऑरेंज फ्रीस्टेट मधील लोकही आले. आरंभीं आरंभीं त्यांनीं बरेंच शौर्य दाखविलें. परंतु आपल्या हिंदुस्थानचे माजी सेनाधिपति लॉर्ड राबर्ट्स व लॉर्ड किचनेर यांनीं या लढाईत अपूर्व बहाद्दुरी करून बोअर लोकांचा पराभव करून त्यांस शरण येण्यास लाविलें, व हे दोन्ही देश इंग्लंडच्या ताब्यांत आले. बोअर लोकांचे सरदार बोथा, डीवेट, जोबर्ट, प्रेसिडेंट क्रूगर व स्टीन यांनीं ही लढाई एकतीस महिने पर्यंत चालविली व शेवटीं इ. स. १९०२ मधील जून महिन्याच्या आरंभीं उभयतांत तह होऊन दोन्ही देशांत सलोखा झाला. या प्रकरणांत एडवर्ड बादशहा अतिशय शांतताप्रिय आहेत, असें दिसून आलें.

त्यानंतर राज्याभिषेकाचा विधि करण्याचा निश्चय होऊन जून महिन्याची २६ वी तारीख हा दिवस निश्चित करण्यांत आला. या राज्याभिषेकोत्सवाकरितां मोठ्या थाटमाटाची तयारी झाली. हिंदुस्थानांतील मोठमोठे राजेरजवाडे व प्रसिद्ध गृहस्थ या उत्सवाकरितां इंग्लंडास गेले. देशी लष्करांतील निवडक

शिपायांच्या तुकड्याही इंग्लंडांस जाण्याकरितां रवाना झाल्या. हिंदुस्थानांतील मोठमोठीं शहरें व निरनिराळ्या संस्था यांच्यावतीनें आपल्या दयाळू बादशहांस अर्पण करण्यासाठीं मानपत्रें तयार झालीं. पण नेमलेल्या दिवशीं राज्याभिषेक व्हावा अशी ईश्वरी इच्छा नव्हती. बादशहा एकाएकीं आजारी पडून राज्याभिषेकाच्या नेमलेल्या दिवशींच त्यांचें दुखणें विकोपास गेलें व त्यांच्या शरीरावर शस्त्रप्रयोग करावा लागला.

बादशहा आजारी पडल्याची हकीगत तारेनें सर्वत्र पसरतांच सर्वत्र प्रजेला फार वाईट वाटून त्यांना लवकर आरोग्य व्हावें म्हणून ठिकठिकाणीं सर्व धर्माच्या लोकांकडून देवाची प्रार्थना करण्यांत आली. बादशहा लवकर बरे होवोत अशी सर्व राजनिष्ठ प्रजेकडून होणारी प्रार्थना परमेश्वरानें ऐकिल्यामुळेंच कीं काय, बादशहांच्या प्रकृतीस हळू हळू आराम पडत चालला. प्रकृति बरीच सुधारली असें वाटल्यावर ता. ९ आगष्ट इ.स. १९०२ ह्या दिवशीं राज्याभिषेक करण्याचा पुनः निश्चय करण्यांत आला. तेथपर्यंत हिंदुस्थानांतून गेलेले संस्थानिक व इतर लोक यांस इंग्लंडांतच रहावें लागलें.

प्रजेच्या इच्छेप्रमाणें बादशहांची प्रकृति हळू हळू सुधारत जाऊन ता.९ आगष्ट इ.स. १९०२ हा नेमलेला दिवस आला. बादशहांची प्रकृति पूर्वीप्रमाणें चांगली निकोप झाली होती असें नाहीं. म्हणून राज्याभिषेकाच्या विधींत थोडी छाटाछाट करून अगदीं अवश्य अशाच गोष्टी करण्यांत आल्या. राज्याभिषेकविधीचें यथास्थित वर्णन केल्यास बरेंच लांबलचक होईल. म्हणून त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी थोडक्यांत सांगण्याचा हेतु आहे.

… अहमदा …
नं. ……



बादशहा सातवे एडवर्ड. (पृष्ठ ५४)

The Bombay Art Printing Work, Fort.

या प्रसंगीं निघालेली बादशहांची स्वारी, लंडनपुरीनें केलेला शृंगार, दीपोत्सव वगैरे पाहण्याकरितां असंख्य लोक जमले होते. त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येणारा आनंद अवर्णनीय होता. रस्त्यानें स्वारी निघाली असतां ठिकठिकाणीं कानठाळ्या बस-तील, अशा आनंदाच्या आरोळ्या लोकसमुदायांतून निघत होत्या. बादशहांचा जन्म ज्या वाड्यांत झाला, तो बकिंगहाम पॅलेस या सर्व समारंभाचा केंद्र होता. त्याच्या आसपास लो-कांची गर्दी इतकी झाली होती कीं, त्या ठिकाणीं लष्करी लो-कांकडून सक्त पाहरा ठेवणें जरूर झालें होतें. बादशहांचे बंधु ड्यूक ऑफ कॅनाट हे आपणास परिचित आहेतच. कारण हे मुंबई इलाख्यावर एकदां सेनापती होते. त्यांनीं या वेळीं लष्करी लोकांची योग्य रीतीनें वांटणी करून चांगला बंदोबस्त केला होता. हिंदीं लष्कराची एक तुकडी, स्वारीबरोबर बादशहांची शरीरसंरक्षक म्हणून चालली होती, आणि बाकीचें हिंदी लष्कर कॉनस्टिट्यूशन हिलपासून बकिंगहाम पॅलेसपर्यंत रस्त्यावर रांगेनें उभें केलें होतें. हिंदी लष्कराचा चित्रविचित्र पोषाख पाहून प्रेक्षकांना फार कौतुक वाटत होतें.

स्वारींत सर्वांच्या पुढें बादशहांच्या कुटुंबांतील मंडळी व पर-देशांतील राजपुत्र होते. त्यांच्यामागून युवराज (प्रिन्स ऑफ वेल्स) यांची स्वारी निघाली. या स्वारीबरोबर रॉयल हॉर्स गार्ड्स लोकांच्या तुकड्या रक्षक म्हणून होत्या. युवराज प्रिन्स ऑफ वेल्स म्हणजे सध्यांचे आपले बादशहा आपल्या पत्नीसह गाडींत बसले होते. त्यांच्यामागून बादशहांची खासा स्वारी चालली होती. या स्वारीचा लवाजमा व थाटमाट फारच भव्य

व प्रेक्षणीय होता. त्यांत प्रथम खाजगी कारभारी व इतर नोकर, त्यांच्या मागून बादशहांचे 'पेज' (हुजरे) व महाराणी अलेक्झांड्रा यांचें सखीमंडळ चाललें होतें. त्यांच्या मागच्या गाडींत बादशहांचे प्रायव्हेट सेक्रेटरी कित्येक नोकरांसह बसले होते. त्यांच्या मागच्या गाडींत लॉर्ड चेंबरलेन, लॉर्ड स्टुअर्ट व मिस्ट्रेस ऑफ धि रोब हीं होतीं. त्यांच्या मागून सेनापतीचे एडिकाँग चालले होते. नबाब अफसर उद्दवला बहादूर, कॅप्टन कुमार वीरविक्रम, तसेच कर्नल नबाब महम्मद इस्मालखान हेही चालले होते. त्यांच्या मागून सेनापतींच्या रिसाल्यावरील अंमलदार, युवराजांचे ऑनररी एडिकाँग मेजर कुमार श्री. दौलतसिंहजी ईडरवाले व बिकानेरचे महाराज गंगासिंह बहादूर हे होते. त्यांच्या मागून बादशहांचे एडिकाँग कुचबिहार, ईडर व ग्वाल्हेर, येथील महाराजे होते. त्यांच्यामागें देन्मार्कचे राजपुत्र व हिंदी घोडेस्वारांची तुकडी होती. त्यांच्या मागची गाडी खुद्द बादशहा व महाराणी अलेक्झांड्रा यांची होती. त्यांच्या मागच्या गाडींत ड्यूक ऑफ कॅनाट कित्येक राजपुत्रांसह बसले होते. त्यांच्या मागून बादशाही निशाण संभाळणारे कित्येक लोक चालले होते, व सर्वांच्या मागून लॉर्ड राबर्ट्स व लॉर्ड किचनेर यांच्या गाड्या होत्या. ही बादशाही स्वारी वेस्ट मिनिस्टर ॲबे या देवालयांत जात होती. तें देवालय अति उत्तम रीतीनें शृंगारलें होतें. देवालयाच्या आसपासचा प्रदेशही गुढ्या—तोरणांनीं सुशोभित केला होता. नऊ वाजतांच सर्व धर्माधिकारी आपापल्या नेमलेल्या कामावर तयार होऊन दहा वाजतां सर्व राजचिन्हें पवित्र करण्याचा विधि सुरू झाला होता. देवालयांत

प्रथम युवराजांची स्वारी दाखल झाली. त्यांचा धर्माधिकाऱ्यांकडून योग्य रीतीनें सत्कार करण्यांत आला. बरोबर सव्वा अकरा वाजतां बादशहा व महाराणी अलेक्झांड्रा यांची स्वारी दाखल झाली. तेव्हां देवालयांतील मुलांकडून आनंद प्रदर्शक संगीत सुरू झालें.

थोड्या वेळानें राज्याभिषेकाच्या विधीस आरंभ झाला. हा सर्व विधि क्यांटर्बरीचे आर्चबिशप यांचेकडून व्हावयाचा होता. इंग्लंडचे राजे म्हणून एडवर्ड महराज यांचें नांव पुकारतांच चड-घमाच्या आवाजानें सर्व देवालय दुमदुमून गेलें. नंतर आर्च-बिशपांनीं देवाची प्रार्थना केली; व प्रश्नोत्तर रूपानें पुढील शपथ-विधि करण्यांत आला.

**प्रश्नः**—महाराज, आपण शपथ घेण्याला तयार आहां काय ?

**उत्तरः**—होय, मी तयार आहें.

**प्रश्नः**—या देशांतील वहिवाटी व पार्लमेंटानें केलेले कायदे यांस अनुसरून राज्य चालविण्याला आपण कबूल आहां ना ?

**उत्तरः**—होय, मी अंतःकरणपूर्वक कबुली देतों.

**प्रश्नः**—आपण आपल्या शक्त्यनुसार दयार्द्र बुद्धीनें व काय-द्यास अनुसरून सर्व प्रजेला न्याय द्याल काय ?

**उत्तरः**—होय, मी त्याप्रमाणें करीन.

**प्रश्नः**—आपण प्रॉटेस्टंट मताच्या लोकांना हक्क द्याल काय ?

**उत्तरः**—होय.

इतकीं प्रश्नोत्तरें झाल्यावर बादशहांनीं देवालयांतील पवित्र बायबलावर हात ठेवून व गुडघे टेकून शपथ घेतली; तेव्हां त्यांच्या

मस्तकावर कांहीं नव्हतें. ती शपथ अशी:—

" परमेश्वर स्मरण करून मी अशी शपथ घेतों कीं, परमेश्वराचे जे नियम आहेत त्यांप्रमाणें व त्यानें दिलेल्या शास्त्राप्रमाणें आणि इंग्लंडच्या प्रॉटेस्टंट धर्मतत्त्वांप्रमाणें मी राज्य करीन, व इंग्लंड, आयर्लंड आणि या संयुक्त राज्यास जोडलेले जे प्रदेश आहेत, त्यांतील धर्मतत्त्वांप्रमाणें मी राज्य करीन. "

वरीलप्रमाणें शपथविधि झाल्यावर बादशहांस अभ्यंगस्नान घालण्याचा विधि करण्यांत आला.

हें अभ्यंगस्नान पूर्वीं सर्व शरीराला घालीत असतील; पण त्या पद्धतीचा बराच संक्षेप होत होत आतां बादशहांच्या मस्तकावर, खांद्यावर, छातीवर आणि तळहातांवर तेल लावावयाचें एवढाच विधि राहिलेला आहे. शरिराच्या या भागांवर तेल लावतां यावें म्हणून या वेळचा पोषाक तशाच सोईचा केलेला होता. खांद्यावरील भाग व छाती लवकर उघडी करतां यावी व अशा रीतीनें त्या वेळीं घालण्याचा आंगरखा खराब होऊं नये म्हणून तें लावल्याबरोबर पुसून काढण्याचीही तजवीज केलेली असते. राजाच्या आंगरख्याचे बंद सोडून ते भाग उघडे करून देणें, हें काम एका सरदाराचें असतें. तेल लावणें हें काम क्यांटरबरीच्या आर्चबिशपांचें असतें. तेल लावल्यावर तें पुसून काढण्याचें काम दुसऱ्या एका सरदाराचें असतें; व आंगरख्याचे बंद फिरून बांधणें हें तिसऱ्या एका सरदाराकडे असतें. हा विधि करण्यासाठीं बादशहाला देवालयांतील स्थंडिलासमोर जाऊन उभें रहावें लागतें. स्थंडिलाकडे जातेवेळीं बादशहांबरोबर लॉर्ड चंबरलेन अभावे लागतात, व बादशहांची मुख्य तरवार घेऊन

दुसरा एक सरदार पुढें जातो. याप्रमाणें स्वारी जाऊन पोंचली म्हणजे त्यांच्या आंगांत किरमिजी रंगाचा झगा असतो तो काढून घेतात; व मग बादशहा सिंहासनावर आरूढ होतात. हें सिंहासन किंग एडवर्ड ( पहिले ) यांच्या वेळीं बनविलेलें आहे. या वेळीं बादशहांच्या मस्तकावर एक चतुष्कोणी छत धरलेलें असतें. हें धरण्याचें काम चार उमरावांकडे दिलेलें असतें. याप्रमाणें स्वारी बसली म्हणजे वेस्ट मिन्स्टरचा डीन ( धर्माध्यक्षांची एक पदवी ) सोन्याचा चमचा हातीं घेऊन तो क्यांटरबरीच्या आर्चबिशपांकडे देतो, व त्यावर एका गरुडाकार पात्रांतून तेल ओततात. तें तेल घेऊन क्यांटरबरीचे आर्चबिशप, बादशहांच्या मस्तकाला, खांद्याला, छातीला व तळहाताला लावितात आणि तोंडानें पुढील भावार्थाचा मंत्र म्हणतात. " आजपर्यंत ज्याप्रमाणें राजांना, धर्माधिकाऱ्यांना व देवदूतांना अभ्यंग घातलें, त्याप्रमाणेंच तुला मी हें अभ्यंग घालीत आहें. तें तुला सुखदायक होवो. " तैलाभ्यंग झाल्यावर आंगावर त्या त्या ठिकाणीं आर्चबिशप क्रुसाच्या खुणा करितो, व नंतर बादशहांला दरबारी पोषाख चढवितात. नंतर मुख्य धर्माध्यक्ष, बादशहांला ते सर्व लोकांस दिसतील असे उभे करितो व आपण सर्व बाजूंस वळून पाहून सर्व लोकांस उद्देशून " हा तुमचा राजा आहे ही गोष्ट तुम्हांला कबूल आहे काय ? " असा प्रश्न करितो व सर्वांकडून " होय, होय. " असें उत्तर येतें. तें आल्याबरोबर टाळ्यांचा गजर सुरू होऊन बादशहांवर पुष्पवृष्टि करण्यांत आली. मंगलदायक गाणीं, मंगलकारक वाद्यें व तोफांची सरबत्ती यांची गर्दी याच वेळीं झाली. नंतर राजाच्या

मस्तकावर धर्माध्यक्षांनीं बारीक वस्त्राची टोपी घालून अंगांत एक झगा घातला व त्यावर भरजरी कमरबंद बांधिला. नंतर लार्ड चेंबरलेन हे पुढें झाले व त्यांनीं आणखी एक झगा बादशहांचे अंगांत घातला व दरबारी तरवार त्यांस नजर केली. नंतर सोन्याचे भरींव मुंब्रेज ( Spurs ) बादशहांच्या टांचेस लावून ते काढून ठेविले. या सर्व पोषाखावर राज्यारोहणानिमित्त मुद्दाम तयार केलेला पोषाक चढवून त्यांच्या हातांत क्रूस देण्यांत आला. नंतर बादशहांचे उजवे हाताचे करंगळीजवळील बोटांत एक आंगठी * घालण्यांत आली; व डाव्या हातांत राजदंड दिला. हा राजदंड देतांना आर्चबिशप यांनीं उपदेश केला कीं, "या राजदंडाच्या योगानें उन्मत्त पुरुषांना शिरें नम्र करण्यास लावा; व दीन मनुष्यांस साहाय्य करा."

इतकें झाल्यावर राज्यारोहण समारंभांतील मुख्य कृत्य जो मुकुटधारणविधि त्यास सुरवात झाली. मुख्य धर्माध्यक्षांनीं

---

* या आंगठीविषयीं अशी एक आख्यायिका सांगतात कीं, ती आंगठी राजाच्या बोटाला जर सैल झाली, तर तो राजा फार दिवस राज्य करणार नाहीं, व जर ती त्या बोटांत घट्ट बसली, तर तो दीर्घकालपावेतों राज्यसुखोपभोग घेईल. महाराणी व्हिक्टोरिया यांचे बोटांत ती आंगठी जाईना. करंगळींत ती चांगली बसूं लागली, पण ती करंगळीजवळच्या बोटांतच घातली पाहिजे, असा शास्त्रार्थ असल्यामुळें त्या वेळच्या धर्माध्यक्षांनीं ती राणीसाहेबांच्या बोटांत जोरानें घातली, व त्यामुळें बोट सुजून राणीसाहेबांच्या बोटांतून ती निघेना. आंगठीचा व राणीसाहेबांचे बोटाचा इतका दृढसंबंध झालेला होता व त्यांनीं राज्यही फार वर्षें केलें. यावरून जुन्या आख्यायिकेला जास्तच जोर या खपला आला असेल, असें मानण्यास हरकत नाहीं.

आपल्या हातांनीं मुकुट उचलून तो बादशहांच्या मस्तकावर ठेविला; व बायबलाचें एक पुस्तक हातांत दिलें. नंतर क्यांटरबरीचे आर्चबिशप व आणखी कांहीं बडे लोक यांनीं बादशहांस धरून सिंहासनावर बसविलें. बादशहा सिंहासनारूढ झाल्याबरोबर त्यांचे सभोंवतीं त्यांचे कांहीं सरदार नियमित प्रकारचीं शस्त्रास्त्रें घेऊन उभे राहिले व धर्माध्यक्षांनीं बादशहास उपदेश केला; नंतर बादशहांकडून धर्माध्यक्षाला मोठी दक्षणा देण्यांत आली.

या प्रमाणें बादशहांचा राज्याभिषेकविधि आटोपल्यावर महाराणी अलेक्झांड्रा यांस पट्टाभिषेक करण्यांत आला. हा अभिषेकविधि करण्याचें काम यार्कच्या आर्चबिशपांचें आहे.

इतकें काम झाल्यावर बादशहा व राणी यांनीं राजचिन्हें एका बाजूस ठेवून एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणें देवाची प्रार्थना केली; प्रार्थना आटोपल्यावर पुनः राजचिन्हें धारण करून बादशहा व राणी हीं सिंहासनावर बसलीं, व त्यांनीं सर्व मानकऱ्यांचे मुजरे घेतले; नंतर हा राज्याभिषेक विधि पुरा झाला; आणि स्वारी देवालयांतून बकिंगहाम पॅलेस या महालांत जाण्याकरितां परत फिरली. रस्त्यावर पहिल्याप्रमाणेंच मनुष्यांची अतोनात गर्दी झाली होती. त्या सर्वांकडून एकसारखे आनंदोद्गार निघत होते. ठिकठिकाणीं लष्करी बँड उभे होते त्यांजकडून आनंदप्रदर्शक गाणीं गाइलीं जात होतीं. रात्रौ सर्व शहरभर प्रेक्षणीय दीपोत्सव केला होता.

या मंगल प्रसंगाच्या स्मरणार्थ बादशहांनीं आपला आस्बोर्न महाल सार्वजानिक उपयोगाकरितां बक्षिस दिला. ता. ११ रोजीं

प्रजेकडून १,१९,००० पौंडांची रक्कम बादशहांस नजर करण्यांत आली. तिचा योग्य शब्दांनीं स्वीकार करून ती सर्व रक्कम बादशहांनीं किंग एडवर्ड हॉस्पिटलच्या फंडास देऊन टाकिली.

या राज्यारोहण समारंभाचें वर्णन कितीही केलें, तरी तें अपुरेंच होणार. असो. इ. स. १८७७ सालीं लॉर्ड लिटन हे हिंदुस्थानचे व्हॉइसराय असतां परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांनीं "एंप्रेस ऑफ इंडिया" (हिंदुस्थानची बादशाहिण) हा किताब धारण केला. त्या प्रसंगीं दिल्ली येथें मोठा दरबार भरविण्यांत आला होता. त्यास अनुसरून एडवर्ड बादशहांचा राज्यारोहण समारंभ इंग्लंडांत लंडन राजधानींत झाल्यावर हिंदुस्थानची राजधानी असें मानिलेलें शहर जें दिल्ली येथेंही असा समारंभ करावा म्हणजे हिंदुस्थानच्या लोकांस चिरकाल स्मरण राहील व त्यांसही आनंदोत्सव करण्यास संधि सांपडेल, अशा हेतूनें हिंदुस्थानांत दिल्ली येथें तशा प्रकारचा समारंभ करावा असें ब्रिटिश मुत्सद्यांनीं ठरविलें.

या वेळीं हिंदुस्थानचे व्हॉइसराय लॉर्ड कर्झन हे होते. त्यांनीं ता. १ जानेवारी इ. स. १९०३ रोजीं दिल्लीस अपूर्व व भव्य असा समारंभ करून सातवे एडवर्ड बादशहांकडून आलेला जाहिरनामा प्रसिद्ध केला. या समारंभाकरितां बारा हजार माणसांचा समावेश होईल एवढा मोठा वर्तुलाकार मंडप उभारला होता. राजेरजवाडे यांस बसण्याकरितां उंच उंच आसनें बनविलीं होतीं; व त्या आसनांच्या केंद्रस्थानीं मुख्य सिंहासन ठेविलें होतें. व्यवस्था ठेवण्याकरितां स्वागतकमिटी, इंजिनियर

वगैरे कामगारांची योजना केली असून नाच, गायन, लष्करी कवाईत, रेल्वे, तार, पोस्ट, विजेचे दिवे, मोटार, वगैरे सर्व जरूरीच्या व करमणुकीच्या सोई केल्या होत्या. हत्तीवरून स्वारीही निघाली होती. अशा रीतीनें हा समारंभ सर्व तऱ्हेनें भपकेदार, भव्य, ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाला साजेसा करण्याकडे लॉर्ड कर्झन यांनीं पूर्ण लक्ष दिलें होतें. या समारंभाप्रीत्यर्थ सर्व मिळून पांच कोटी रुपये खर्च झाला असेल असा अजमास आहे. दिल्लीच्या बाहेर जें विस्तृत मैदान आहे, तें हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांकरितां उभारलेल्या छावण्यांनीं गजबजून गेलें होतें. बादशहा स्वतः हजर नव्हते; पण त्यांचे प्रतिनिधि म्हणून लॉर्ड कर्झन मुख्य सिंहासनावर विराजमान झाले होते. या समारंभाकरितां बादशहांचे बंधु ड्यूक ऑफ कॅनाट यांस त्यांनीं मुद्दाम पाठविलें होतें, ते लॉर्ड कर्झन यांच्या डाव्या बाजूस बसले होते. लॉर्ड कर्झन यांच्याकरितां जो तंबू उभारला होता, तो शृंगारण्याकरितां ९० हजार रुपये किंमतीचें सामान खुद्द विलायतेहून मागविलें होतें. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तूंचें प्रदर्शनही या समारंभाबरोबर भरविलें होतें. त्यांत देशी राजेरजवाड्यांकडून पुष्कळ अमोलिक वस्तु आल्या होत्या. हिंदुस्थानांतील एकशें सात राजे या समारंभास हजर होते. त्यांचा इतमामही त्यांच्या बरोबरच असल्यामुळें एकंदर देखावा भव्य, गंभीर व आश्चर्यचकित करण्याजोगा दिसत होता.

पुष्कळ राजेरजवाडे व परराष्ट्रांचे वकील दिल्लीस जमा झाल्यावर ता. २९ डिसेंबर रोजीं लॉर्ड कर्झन यांची स्वारी दि-

ह्लीस येऊन दाखल झाली. दुसरे दिवशीं प्रदर्शन खुलें करण्यांत आलें, व ता. १ जानेवारी इ. स. १९०३ रोजीं दरबार भरविण्यांत आला. त्यांत निजाम, गायकवाड, जयपूरचे महाराज वगैरे मोठमोठे संस्थानिक हजर होते. या दरबारांत इंग्लंडचे राजे सातवे एडवर्ड हे हिंदुस्थानचे बादशहा आहेत अशाबद्दल जाहिरनामा व्हॉइसराय लॉर्ड कर्झन यांनीं वाचून दाखविला. हा दिवस मोठा गर्दीचा गेला. ता. १० जानेवारीपर्यंत सर्व मंडळी दिल्लीस होती. तेथपर्यंत नाचरंग, गाणेंबजावणें, मेजवान्या, बॉल, क्रिकेट, पोलो, कवाईत, दारूकाम वगैरे करमणुकीचीं साधनें सुरू होतीं. ता. १० रोजीं लॉर्ड कर्झन यांची स्वारी रवाना झाल्यावर बाकीची मंडळीही हळू हळू स्वस्थानीं गेली.

हा दरबार होऊन गेल्यावर कांहीं महिन्यांनीं ह्या मंगलप्रसंगाच्या स्मरणार्थ म्हणून हिंदुस्थानच्या प्रजेस दोन देणग्या देण्यांत आल्या. मिठावरील कर कांहीं कमी केला, व प्राप्तीवरील कर पूर्वीं पांचशें रुपये वार्षिक प्राप्तीवर घेत असत तो हजार रुपये प्राप्तीवर घ्यावा असें ठरविलें; ह्यामुळें गरीब लोकांचा फायदा होऊन त्यांस आनंद झाला.

वरील समारंभ दिल्लीस झाला त्याच दिवशीं हिंदुस्थानांत प्रत्येक खेड्यांत लहान लहान समारंभ झाले. त्या समारंभप्रसंगीं महाराष्ट्रांत सर्वत्र गाइलेलें मंगलगीत लिहून हें प्रकरण पुरें करूं.

**दिल्लीदरबारच्या प्रसंगीं महाराष्ट्रांत गाइलेलें गीत.**

[ राग—मांड, ताल—दादरा. ]

भो राजन्, एडवर्ड, धन्य धन्य विबुधमान्य
सार्वभौम भूवरा ॥ अलोकसुंदरा, ऐश्वर्यें नटविशि

भुवनमंदिरा ॥ ध्रु० ॥ भो राजन् ॥
जलधिपति, विमलमति, धीरमंदरा ॥ १ ॥ अलोक० ॥
संतत ती कांत शांत वैभव श्री
राजमंत्र, यंत्र तंत्र शास्त्रकला बहु सुफला,
सुखविवर्धिनी, नयनिरूपिणी ॥ २ ॥ अलोक० ॥
राजवृद्धि, समृद्धि, ऋद्धि, सिद्धि द्वारिं तिष्ठती
सदा द्वारिं तिष्ठती ॥
चक्रवर्ति, धर्ममूर्ति, धवलकीर्ति, वस्तु संतती,
चिरायु हो स्थिती ॥ ३ ॥ अलोक० ॥
अखंड राज्यवैभवास भोग योग हा असो ॥
सुपुत्र-पौत्र-मित्र-वृंदिं वैर तें नसो ॥
देवकृपा तुजवरतीं सतत ती असो ॥४॥ अलोक० ॥
नरवंरा, वासुदेविं प्रेमभाव नम्रदास ॥
त्यास देशि आसरा ॥५॥ भो राजन्०॥

---

## प्रकरण ९ वें.

## कारकीर्द व मृत्यु.

### ता. २२ जानेवारी १९०१ पासून ता. ६ मे १९१० पर्यंत.

महाराणी व्हिक्टोरिया मरण पावल्यापासून म्हणजे ता. २२ जानेवारी १९०१ पासून बादशहा सातवे एडवर्ड यांच्या कारकिर्दीस सुरवात झाली. ह्या कारकीर्दीस सुरुवात होण्याच्या पूर्वीपासून दक्षिण आफ्रिकेंतील ट्रून्सवाल प्रांतांतील बोअर लोकांबरो-

जतांच पूर्वीचा सर्व द्वेष विसरून जाऊन फ्रान्सच्या प्रजासत्ताक राज्याचे प्रेसिडेंट लोबे व त्यांचें प्रधानमंडळ बादशहांस सामोरें जाऊन स्टेशनापासून मुक्कामापर्यंत त्यांस पोंचविण्यास गेलें. फ्रेंच लोकांकडून बादशहांचा जो सन्मान झाला तो केवळ औपचारिक नसून मनःपूर्वक होता. तेथें झालेल्या भाषणांत खरा स्नेहभाव दिसत होता. बादशहांनीं भाषण केलें कीं, "परमेश्वराच्या इच्छेनें फ्रान्स आमचा शेजारी ठरला आहे. हें शेजारीपणाचें नातें लक्षांत ठेवून फ्रेंच लोक इंग्लंडशीं स्नेहभाव ठेवतील अशी मला आशा आहे. ह्या दोन देशांचा उत्कर्ष व्हावयाचा तो त्यांच्या शेजारीपणामुळेंच होणार. भूतकाळीं उभयतांमध्यें पुष्कळ गैरसमज व कलहाचीं कारणें उत्पन्न झालीं होतीं. पण आतां तीं पार नाहींतशीं होऊन त्यांचें स्मरणही राहिलें नाहीं. फ्रेंच लोक व त्यांचा इतिहास यांविषयीं माझ्या मनांत पुष्कळ आदर वाटतो व त्यावरून भविष्यकाळीं या दोन्ही देशांतील स्नेहसंबंध जास्त दृढ होत जाईल, अशी मला उमेद वाटते." यावर प्रेसिडेंट लोबे यांनीं जें भाषण केलें त्यांतही उभय देशांचा स्नेह वृद्धिंगत होत जावा अशी इच्छा त्यांनीं दर्शविली. ता. ९ मे रोजीं पारीसहून बादशहांची स्वारी लंडनास आली. ह्या भेटीचा परिणाम लोकांच्या मनावर चांगला झाला. फ्रेंच व इंग्लिश या उभयतांच्या मनांत आजपर्यंत असलेलें काळेंबेरें नाहींसें होऊन उभय राष्ट्रांत स्नेह झाला. बादशहांच्या या प्रवासामुळें एकंदर युरोपखंडाचें हित झाल्याचें दिसून आलें. पोर्तुगाल आणि इटाली यांचा जास्त निकट संबंध जडला आणि फ्रान्साशीं स्नेह झाल्यामुळें इतर देशांच्या राजनीतीवर चांगला दाब बसला. उन्हाळ्यांत फ्रान्सचे

प्रेसिडेंट लोबे हे इंग्लंडास गेले, व कांहीं दिवसांनीं इटालीचे राजे-ही बादशहांच्या भेटीस गेले. थोडे दिवसांनीं बादशहा व्हियेन्ना येथें जाऊन तेथील बादशहांची त्यांनीं भेट घेतली. या भेटीचाही परिणाम चांगला झाला. तिकडून आल्यावर थोडे दिवस विश्रांति घेऊन बादशहा आपल्या राणीसह आयर्लंडांत फिरतीवर गेले. स्वतः बादशहा आपल्या देशांत आलेले पाहून आयरिश लोकांस फार आनंद झाला, व ठिकठिकाणीं बादशहांस मानपत्रें देऊन त्यांचा त्यांनीं चांगला आदरसत्कार केला. बादशहांनींही मान-पत्रांच्या उत्तरांत आयरिश लोकांचे आभार मानिले. या प्रवासा-मुळें आयारिश लोकांस फार समाधान वाटलें.

इ.स. १९०४ सालींही पुनः आयर्लंडांत त्यांनीं प्रवास केला. नंतर वसंतऋतूंत ते डेन्मार्क देशांत जाऊन राहिले होते. त्या मुदतींत जर्मनीच्या बादशहांनीं त्यांची भेट घेतली. आस्ट्रियाच्या बादशहांकडून फील्ड मार्शलची पदवी त्यांस अर्पण करण्यांत आली.

इ.स. १९०५ सालीं फ्रान्सशीं झालेला स्नेहसंबंध जास्त दृढ झाला; परंतु जर्मनीबरोबर कांहीं भानगड उत्पन्न झाली. इ.स. १९०४ सालीं फ्रान्सबरोबर करार मदार होऊन मोरोक्को मधील इंग्रजांचा व्यापारी हितसंबंध दृढ करण्यांत आला होता; परंतु हें जर्मनी-च्या बादशहांस न आवडून त्यांनीं हरकत घेतली. त्यामुळें फ्रेंच लोकांच्या हितास धोका उत्पन्न होऊन जर्मनी व फ्रान्स यांमध्यें लढाई सुरू होते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. परंतु बरेच दिवस पत्रव्यवहार चालून लढाईचा प्रसंग टळला व उभयतांत एकी झाली. पुढील वर्षीं एडवर्ड बादशहा व जर्मनीचे बादशहा यांची

समक्ष भेट होऊन उभयतांतील गैरसमज दूर झाला व पहिल्या-प्रमाणें सख्य झालें.

याप्रमाणें युरोपखंडांत वरचेवर प्रवास करून व प्रत्येक देशाच्या राजाची भेट घेऊन सर्व देशांत शांतता व सख्य स्थापित करण्याचें श्रेय बादशहांनीं मिळविलें. रशियाच्या झारच्या सूचनेवरून हेग येथें सर्व राष्ट्रांची परिषद होऊन त्यांत आपले बादशहा सातवे एडवर्ड यांच्या इच्छेस अनुसरून ठराव झाले.

यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतही पुष्कळ सुधारणा झाली. कैलासवासी महाराणी व्हिक्टोरिया यांनीं ईस्ट इंडिया कंपनीकडून हिंदुस्थानचा राज्यकारभार आपले हातीं घेतला त्यावेळीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. तो जाहिरनामा म्हणजे हिंदुस्थानांतील लोक इंग्रज सरकाराकडून मिळालेली महत्त्वाची सनदच आहे असें मानितात. त्या जाहिरनाम्यास पन्नास वर्षें पुरीं झाल्याबद्दल ता. २ नोवेंबर इ.स. १९०८ रोजीं हिंदुस्थानांत उत्सव करण्यांत आला. त्या प्रसंगीं बादशहा सातवे एडवर्ड यांजकडून आलेला एक निरोप सर्वत्र वाचण्यांत आला. तो पुढें लिहिल्याप्रमाणें:–

" १–पार्लमेंट सभेच्या सल्ल्यानें व संमतीनें आणि अनेक महत्त्वाच्या कारणास्तव, आमच्या प्रिय मातोश्री व या साम्राज्याचे सिंहासनाची आमच्या पूर्वींची परमपूज्य मालकीण महाराणी व्हिक्टोरिया यांनीं, ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत असलेल्या हिंदुस्थान देशाचा राज्यकारभार स्वतःचे हातीं घेतला, त्या गोष्टीस आज बरोबर पन्नास वर्षें झालीं. अत्यंत गंभीरपणानें त्या वेळीं हातीं घेतलेल्या या उच्च महत्कार्याच्या संस्मरणार्थ हिंदु-

स्थानचे राजेरजवाडे व प्रजाजन यांस अभिनंदनपर निरोप पाठविण्यास ह्या दिवसाची संधि उत्तम आहे, असें आम्हांस वाटतें. तुमच्या हजारों वर्षांच्या विस्तीर्ण इतिहासांत अर्धशतकाचा काळ फार थोडा आहे; परंतु तुमच्या इतिहासाच्या प्रचंड महासागरांत आज संपलेलें अर्ध शतक म्हणजे फार दूरवर दिसणारा असा एक तेजस्वी व उन्नत भूभाग होऊन बसेल. प्रत्यक्ष बादशाही सत्तेखालीं हिंदुस्थान देश घेतल्याचा जो जाहिरनामा लागला, त्यानें हिंदुस्थान सरकारच्या एकछत्री राज्यावर कायमपणाचा शिक्का बसून नव्या युगास सुरवात झाली. त्या वेळेपासून आमचा आजपर्यंतचा प्रवास कष्टप्रद होता. केव्हां केव्हां पावलांची गतीही मंद दिसली असेल; परंतु एकमेकांपासून विलक्षणपणें भिन्न असलेल्या अनेक समाजांचा व मानव जातींतील सुमारें तीस कोटी लोकांचा ब्रिटिश लोकांचे मार्गदर्शकत्वाखालीं व हुकमतीखालीं, एकजीव होण्याचें कार्य संथपणें व अव्याहत चाललें आहे. गेल्या अर्धशतकांतील आमच्या या उद्योगाकडे पहात असतांना आमच्या दृष्टीला सर्व स्वच्छ दिसत आहे, आणि आमचें वर्तन निष्कलंक आहे असें अंतःकरण सांगतें.

२—सर्वकालीं व सर्वस्थळीं मानवी राजसत्तेमध्यें उत्पन्न होतात, तशाच प्रकारच्या अडचणी वारंवार उद्भवत आल्या आहेत. परंतु ब्रिटिश बादशाहीच्या नोकरांनीं मोठ्या परिश्रमानें, धैर्यानें, सहनशीलतेनें, पूर्ण विचारानें आणि स्थिर व दृढ अशा निश्चयानें या अडचणींशीं तोंड दिलें आहे. या कामीं चुकाही झाल्या आहेत; पण आमच्या राज्याच्या अधिकाऱ्यांनीं त्या दुरुस्त करण्यांत अवश्य तितके परिश्रम किंवा स्वार्थत्याग करण्यास

केव्हांही कसूर केलेली नाहीं. तसेंच जेथें जेथें दोष असल्याचें सिद्ध झालें तेथून तेथून ते काढून टाकण्याचे उपाय योजण्याचाही आम्हीं आपल्या समर्थ हातानें जोराचा प्रयत्न केलेला आहे.

३–दुष्काळ व प्लेग यांसारख्या विपत्तींचें निवारण करण्याचें सामर्थ्य कोणत्याही साम्राज्यनीतीच्या रहस्यांत नाहीं. पण या आधिभौतिक आपत्तींची तीव्रता कमी करण्याचा शक्य तितका प्रयत्न अनुभविक अधिकाऱ्यांनीं, कुशलतेनें व एकनिष्ठेनें केला आहे. अंतर्गत शांतता अव्याहत कायम आहे, हिंदुस्थान देशाच्या चतुःसीमेमध्यें निरंतरच्या युद्धाच्या भयंकर अरिष्टांपासून तुमचा बचाव झाला आहे, व असा प्रकार इतका दीर्घकाळपर्यंत पूर्वीं कधींही झालेला नव्हता.

४–हिंदुस्थानांतील शांततामूलक उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याची, सार्वजनिक उपयोगाचीं व सुधारणांचीं कामें करण्याची, व देशांतील सर्व रहिवाशांस हितावह होईल अशा प्रकारें राज्यकारभार चालविण्याची आपली उत्कट इच्छा असल्याचें अभिवचन व्हिक्टोरिया महाराणींनीं इ. स. १८५८ च्या मोठ्या सनदेंत उदारपणानें दिलें आहे. तुमच्या आधिभौतिक सुखसोई व प्रगति यांची वाढ करण्याच्या हेतूनें ज्या अनेक योजना मोठ्या दक्षतेनें अमलांत आणल्या आहेत, त्यांच्या प्रचंड व अवाढव्य स्वरूपावर कोणी कोठेंही वरचढ केलेली नाहीं; आणि महाराणींचें सदरहू उदारपणाचें अभिवचन किती उत्साहानें पाळण्यांत आलें आहे, याची साक्ष तीं कामेंच सर्व जगास देत आहेत.

५–मांडलिक राजे व राज्यकर्ते संस्थानिक यांचे हक्क व मानमरातब कायम राखून त्यांचा सन्मान व संरक्षणही आम्हीं केलें

आहे; आणि या गादीविषयींची त्यांची राजनिष्ठा व स्वामिभक्तिही आजपर्यंत अचल राहिली आहे. केवळ भिन्न समजुती किंवा भिन्न धर्मविधि यांमुळें आमच्या प्रजाजनांपैकीं कोणा एकावरही आम्हीं विशेष मेहेरबानी केली नाहीं, किंवा आम्हीं कोणाचा छळ केला नाहीं, अगर त्यास त्रासही दिला नाहीं, सर्वांचें कायद्यानें सारखेंच संरक्षण केलेलें आहे. तुमचे धर्म व जाती आणि तुमचे देशांत दृढमूल झालेले रीतरिवाज व कल्पना यांचा अपमान न करितां या कायद्यांची अम्मल बजावणी झालेली आहे. कायद्याचें स्वरूपही सुगम व साधें केलें असून जुन्यापुराण्या पण नव्या जगांत हळू हळू येऊं लागलेल्या समाजांच्या परिस्थितीस अनुरूप अशी हे कायदे अमलांत आणणाऱ्या साधनांची रचना केली आहे.

६—असंख्य लोकांच्या भवितव्यतेचीं अनेक युगांपर्यंतचीं सूत्रें आम्हां राज्यकर्त्यांच्या हातीं आलेलीं आहेत; आणि ज्यांचे मुळाशीं कोणतेंही न्याय्य कारण नाहीं, व ज्यांचा उद्देशही गंभीर नाहीं, असले गुन्हेगारांचे कट निष्ठुर हातानें दडपून टाकणें, हें आमचें अत्यंत श्रेष्ठ कर्तव्य आहे. आमचे असंख्य राजनिष्ठ व इमानी प्रजाजन या कटाचा धिःकार करीत आहेत, हें आम्हांस माहीत आहे; आणि सुरक्षितता व सुव्यवस्था यांची मनोहर इमारत उभारण्याच्या आमच्या कामांत आम्हीं आमच्या कोणत्याही प्रजाजनास कदापिही व्यत्यय आणूं देणार नाहीं.

७—विशेष प्रकारची बादशाही दया व औदार्य न दाखवितां हा ऐतिहासिक महत्त्वाचा दिवस सुना जाऊं देण्याची आमची इच्छा नाहीं; यासाठीं इ. स. १९०३ च्या राज्यारोहणाचे वेळे-

प्रमाणें याही प्रसंगीं कायद्याविरुद्ध गुन्हे केल्याबद्दल अलीकडे ज्या इसमांस आमच्या कोर्टांनीं न्यायानें शासन केलें आहे, त्यांच्या शिक्षा सर्व माफ कराव्या किंवा कांहीं अंशानें कमी कराव्या अशी आम्हीं आज्ञा केली आहे. ह्या गुन्हेगार लोकांनीं हें दयेचें कृत्य ध्यानांत ठेवून यापुढें अपराध न घडेल असें आपलें वर्तन ठेवावें, अशी आमची इच्छा आहे.

८—सरकारी अधिकाराच्या व सत्तेच्या जागीं प्रवेश होण्याचे पात्रतेसंबंधानें जो वर्णभेदाचा प्रकार आहे, तो नाहींसा करण्याचे उपाय आम्हीं एकसारखे अमलांत आणीत आहों. हिंदुस्थानांतील कुशाग्रबुद्धीच्या हुषार आणि दक्ष लोकांत जसजसा शिक्षणाचा प्रसार होईल, अनुभव परिपक्व होत जाईल, व जबाबदारीचे धडे चोख रीतीनें शिकले जातील, तसतशी या मार्गानें अधिक आणि खात्रीची सुधारणा होत जाईल, अशी आम्हांस उमेद आहे व तसा आमचा हेतुही आहे.

९—आरंभापासूनच लोकनियुक्त राज्यसंस्थांचीं मूलतत्त्वें आम्हीं हळू हळू अमलांत आणिलेलीं आहेत; या तत्त्वांचा सांप्रत विस्तार करणें शहाणपणाचें असून त्याची योग्य वेळही आली आहे, असें व्हाइसराय व गव्हर्नर जनरल आणि आमचे इतर सल्लागार यांचें मत आहे. तुम्हांपैकीं महत्त्वाच्या लोकवर्गामध्यें इंग्रजी राज्यामुळेंच अनेक नवीन कल्पना निर्माण झाल्या आहेत, व त्यांस त्यानें उत्तेजनही मिळालें आहे; या वर्गाचे लोक नागरिकत्वाचे समान हक्क आणि कायदेकानू व राज्यकारभार यांचा अधिक वांटा मागूं लागले आहेत. ही मागणी, आपलें धोरण संभाळून मान्य केल्यास त्यापासून सांप्रतचा अधिकार व सत्ता यांस

बाध न येतां तीं उलट जास्त मजबूतच होतील. ज्या प्रजाजनांच्या हिताहिताशीं राज्यकारभाराचा संबंध आहे, त्या प्रजाजनांशीं व त्या राज्यकारभारासंबंधाचें सामान्य लोकमत जे बनवितात, त्यास वळण देतात आणि तें बिनचूक रीतीनें प्रदर्शित करितात, अशा लोकांशीं, नेहमीं व निकट संबंध ठेवण्याची जर राज्यकारभार करणाऱ्या लोकांस अधिक संधि मिळाली, तर आमचा राज्यकारभार अर्थात् अधिक कार्यक्षम होईल. ह्याच हेतूनें हल्लीं मोठ्या दक्षतेनें व काळजीपूर्वक ज्या योजना तयार होत आहेत, त्यांबद्दल तूर्त आम्हीं कांहींएक बोलत नाहीं. त्या लवकरच तुम्हांस जाहिर करण्यांत येतील; व त्यांपासून तुमच्या हितकारक प्रगतींचें पाऊल बरेंच पुढें पडेल, असा आम्हांस भरंवसा आहे.

१०–आमच्या हिंदी लष्कराचें शौर्य व इमान हीं आम्हीं जाणून आहों; आणि त्यांचा लष्करी बाणा, त्यांची उत्कृष्ट शिस्त आणि इमानीपणाची व तत्पर नोकरी यांबद्दल आम्ही त्यांचा गौरव करतों; हें त्यांना दिसून येईल, असलें भरपूर बक्षिस देण्याची संधि नव्या वर्षाचे आरंभीं साधावी असें आम्हीं फर्माविलें आहे.

११–हिंदुस्थानचें कल्याण ही एक महाराणी व्हिक्टोरियांच्या अंतःकरणास अत्यंत प्रिय गोष्टींपैकीं एक होती. आम्हीं इ. स. १८७५ सालीं हिंदुस्थान देश पाहिल्यापासून त्या देशाच्या आणि तेथील राजेरजवाडे व प्रजाजन यांच्या हिताची आम्हीं प्रेमपूर्वक इतकी काळजी वहात आलों आहों कीं, तेव्हांपासून इतका काळ लोटला, तरी ती कमी झालेली नाहीं. आमचे प्रिय राजपुत्र युवराज व युवराज्ञी हिंदुस्थानांतून परत आल्यापासून

त्यांचेंही तुमच्या देशावर उत्कट प्रेम बसलें असून हिंदुस्थानचें हित व समाधान यांबद्दल त्यांस खरी व मनापासूनची कळकळ वाटावयास लागली आहे. हिंदुस्थानाविषयींची आमच्या बादशाही घराण्याची व वंशाची ही अकृत्रिम व प्रत्यक्ष सहानुभूति आणि सदिच्छा, आमच्या ब्रिटनमधील सर्व लोकांची दृढ व एकवटलेली सदिच्छा व सद्धेतु यांचें खरें व तंतोतंत द्योतकच आहे.

१२–जगाच्या ज्ञात इतिहासांत कोणत्याही राज्यांतील अगर साम्राज्यांतील राज्यकर्ते व प्रजाजन यांजकडे सोंपविलेल्या उज्वल महत्कार्याच्या तोडीचें श्रेष्ठ व उच्च कार्य आम्ही राज्यकर्ते व तुम्हीं प्रजाजन यांचे हातीं आलें आहे. हें कार्य यशस्वी होण्यास शहाणपण व परस्पर विश्वास यांची आपणा दोघांसही अवश्यकता असून ईश्वरीकृपेनें व प्रेरणेनें हे सद्गुण आपणा उभयतांमध्येंही अधिक दृढमूल होवोत, अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे."

वरील नवव्या कलमांत आश्वासन दिल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांची जास्त प्रगति व्हावी, त्यांची महत्त्वाकांक्षा थोडीशी तरी पूर्ण व्हावी, राज्यकारभारांत त्यांचा जास्त प्रवेश व्हावा म्हणून सध्यांचे स्टेट सेक्रेटरी लॉर्ड मोर्ले व हिंदुस्थानचे व्हाइसराय व गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांनीं अनेक मुत्सद्यांसह विचार करून एक योजना ठरविली आहे, व ती अमलांत आणण्याचें काम सुरू आहे. या योजनेनें हिंदुस्थानच्या प्रजेस बरेच हक्क मिळून त्यांचें कल्याण होणार आहे.

ब्रिटिश सामाज्य सर्व पृथ्वीवर ठिकठिकाणीं पसरलें आहे. पृथ्वीवर जीं जीं लहान मोठीं राज्यें आहेत, त्या प्रत्येकाशीं या

राज्याचा कांहींना कांहीं संबंध पोहोंचतोच. तेव्हां बादशहांच्या कारकीर्दीबद्दल लिहावयाचें म्हणजे ब्रिटिश राज्यापुरतेंच लिहून भागण्यासारखें नाहीं. बादशहा गादीवर बसले त्या वेळेस दक्षिण आफ्रिकेंत ट्रान्सवालबरोबर इंग्रज सरकारचें युद्ध सुरू होतें. रशिया मांचुरिया देशांत किल्लेबंदी वगैरे करून आपली बळकटी करीत होता. लहानसा जपान देश, रशियाचें राज्य आपल्या सीमेस भिडलें आहे, असें जाणून त्याच्याबरोबर लढाईचा प्रसंग आल्यास अडचण पडूं नये म्हणून आपली आरमाराची व जमिनीवरील सैन्याची गुप्तपणें तयारी करीत होता. बिचारा चीन देश, रशियानें घेतलेल्या मांचुरिया देशाकडे नजर लावून आपल्या प्राचीन काळच्या सुधारणेच्या व वैभवाच्या डौलांत आफिणीच्या अमलामुळें झोंके खात पडला होता. इराण आणि तुर्कस्थान या देशांत कांहीं जागृति नव्हती; फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यांत खरा स्नेह नव्हता; नॉर्वेजियन लोकांच्या मनांत स्वीडनपासून विभक्त होण्याचा विचारही उत्पन्न झाला नव्हता; पण हें सर्व या दहा वर्षांच्या कारकिर्दींत बदलून गेलें आहे. ट्रान्सवालबरोबर इंग्रजांचा तह झाला व त्याप्रमाणें कांहीं दिवस ट्रान्सवाल आपल्या ताब्यांत ठेवून आतां उदारपणानें त्याला इंग्रजांनीं स्वराज्य दिलें आहे. रशियासारख्या अति बलाढ्य राज्याबरोबर लढाईस उभें राहून त्या लढाईत त्याच्या किल्लेबंदीची वगैरे नासधूस करून व मोठमोठ्या लढायांत त्याचा पराभव करून जपाननें मोठ्या प्रबळ राष्ट्रांत आपली गणना करून घेतली; इतकेंच नव्हे तर मांचुरियांतून रशियास घालवून देऊन व पुनः डोकें वर काढण्यास पुष्कळ काळ लागेल अशी त्याची स्थिति करून सुधारणेच्या महाप्रतापी सूर्या-

चा उदय आशियाखंडाच्या पूर्व दिशेस जपान देशांत झाला आहे, अशी सर्व जगाची खात्री करून दिली आहे. म्हातारा चीन देश जागृत होऊन आपल्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याची व पार्लमेंट सभा स्थापन करण्याची पूर्व तयारी करीत आहे. तुर्कस्थान व इराण या देशांत जागृति होऊन त्या दोन्ही देशांत पार्लमेंट सभा स्थापन झाल्या आहेत. हिंदुस्थान व अफगाणिस्थान हे देश रशियाच्या भीतीपासून मुक्त झाले आहेत. रशिया व इंग्लंड यांचे इराण व अफगाणिस्थान या देशांशीं काय हक्क संबंध आहेत हें नक्की ठरवून उभयतांची दोस्ती झाली आहे. फ्रान्सही हाताला हात लावून इंग्लंडचा प्रिय दोस्त झाला आहे. रशिया, फ्रान्स व इंग्लंड या तिघांच्या दोस्तीमुळें सर्व पृथ्वीवर शांतता राहण्याचा फार संभव दिसत आहे. नार्वे देशानें स्वीडनपासून वेगळें होऊन आपल्या नव्या राज्यव्यवस्थेच्या धोरणानें नवी राजगादी स्थापन केली आहे. अशा प्रकारें निरनिराळ्या राज्यांची स्थिति व इंग्लंडशीं त्यांचा असलेला संबंध यांत एडवर्ड बादशहांच्या कारकीर्दींत मोठें परिवर्तन घडून आलें आहे. या परिवर्तनांत इंग्रजी साम्राज्याचा मान वाढविण्याकरितां व दुसऱ्या देशांबरोबर असलेला स्नेहसंबंध दृढ करण्याकरितां बादशहांनीं पुष्कळ मेहनत घेतली. सर्व देशांत शांतता राखण्याची बादशहांनीं जणूं काय जामीनगिरीच पत्करिली होती, अशी त्यांची कारकीर्द दिसते. नीतिनियमांविरुद्ध न जातां व शांततेचा भंग न होऊं देतां आपल्या पोक्त प्रधानांच्या मदतीनें त्यांनीं राज्यकारभार चालविला. ह्याचें सर्व श्रेय त्यांनीं संपादन केलेली विद्या, जगाचा प्रवास करून मिळविलेला अनुभव, राजनीतिनिपुणता,

त्यांचा शांत व उदार स्वभाव या गुणांना आहे.

अशा रीतीनें सर्वांस सुखप्रद असलेली कारकीर्द दहा वर्षांतच पुरी झाली ह्याबद्दल सर्वांना वाईट वाटत आहे. इ.स. १९१० च्या एप्रिल महिन्यांत बादशहा फ्रान्स देशांतील बिआरिट्झ येथें आपल्या नेहमींच्या हवा खाण्याच्या ठिकाणीं हवाफेर करण्यासाठीं जाऊन राहिले होते. तेथून ता. २७ एप्रिल रोजीं ते लंडन येथें येऊन दाखल झाले. फ्रान्सांत असतांनाच त्यांची प्रकृति शैत्याच्या विकारानें बिघडली होती, परंतु तें दुखणें विशेष काळजी वाटण्यासारखें किंवा विकोपास जाण्यासारखें आहे, अशी कोणासही कल्पना नव्हती. ता. १ मे रोजीं पुन: त्या दुखण्याचा जोर होऊन प्रकृति जास्त बिघडली. कांहीं काम न करितां स्वस्थ पडून रहावें अशी त्यांच्या डाक्टरांनीं त्यांस सल्ला दिली होती; परंतु शेवटपर्यंत त्यांनीं काम करण्याचें सोडिलें नाहीं. शेवटीं त्याच विकारानें कफ वगैरे होऊन त्यानें ता. ६ मे शुक्रवार रोजीं रात्रौ त्यांचा अंत झाला. त्या वेळीं त्यांच्या कुटुंबांतील सर्व मंडळी त्यांच्याजवळ होती. त्यांत जो आकांत झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. ही दु:खकारक बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरून सर्व लोक अगदीं शोकग्रस्त होऊन गेले. जेथें जेथें ही बातमी पोहोंचली, त्या त्या ठिकाणीं बाजार बंद ठेवून सर्वांनीं आपला शोक व्यक्त केला. प्रत्येक वसाहत व इतर युरोपियन राज्यें यांतून बादशहांच्या मृत्यूबद्दल दु:खप्रदर्शक निरोप राजकुटुंबाकडे गेले. जर्मनी देशांत तर विशेषच दु:खप्रदर्शन झालें. प्रेसिडेंट रुजवेल्ट हे बर्लिन येथें जाणार होते, तो बेत त्यांनीं मृत्यूच्या दु:खकारक बातमीमुळें बंद ठेविला. जर्मनीचे केसरनीं

आपल्या राज्यांत पूर्वी ठरलेले आनंदाचे सर्व प्रकार बंद ठेविले. आयर्लंडांतही दुःखप्रदर्शन होऊन तेथील पत्रें एडवर्ड बादशहा थोर मनाचे व आयर्लंडचे हितकर्ते अशी त्यांची स्तुति करीत होतीं. मरणसमयीं बादशहांस अडुसष्टावें वर्ष सुरू होतें. म्हणून सर्व बंदरांतील लष्करी बोटींवर अडुसष्ट तोफा उडविण्यांत आल्या. अमेरिकेंतही सर्व बाजार बंद ठेवण्यांत आले होते. इंग्लंडांतील प्रत्येक चर्चमध्यें मंडळी जमून परलोकवासी बादशहांचें गुणवर्णन करण्यांत आलें व त्यांच्या आत्म्यास शांति मिळावी म्हणून ईश्वराची प्रार्थना झाली. लंडन गॅझेटचा जादा अंक निघून एक वर्षपर्यंत दुःखसूचक चिन्हें धारण करण्याबद्दल दरबारी मंडळीस हुकूम झाला होता. ता. १२ रोजीं लंडन येथें कामन्स सभेची बैठक होऊन राजकुटुंबांतील मंडळीबद्दल सहानुभूतिपर व नवीन पांचवे जार्ज यांच्या राज्यारोहणाबद्दल अभिनंदनपर असा ठराव पास झाला. सदरहू ठराव सभेपुढें मांडतांना मुख्य प्रधान मि० ऑस्क्विथ हे एडवर्ड राजांच्या कारकीर्दीतील दहा वर्षांत झालेल्या मुख्य मुख्य गोष्टींचा उल्लेख करून म्हणाले: " या मुदतींत परराष्ट्रांशीं स्नेहभाव वाढला आहे, आणि त्या योगानें शांततेचा पाया आतां पहिल्यापेक्षां भक्कम घातला गेला आहे. तसेंच साम्राज्यांतील वेगळाल्या भागांत समान हितसंबंधाची, समान संकटाची आणि परस्परावलंबित्वाची जाणीव पूर्वीपेक्षां अधिक झाली आहे. एडवर्ड राजांना सर्व जगांत शांतता राखणारे अशी पदवी मिळाली आहे, ती यथायोग्य आहे; आणि भविष्यकाळीं त्यांची स्मृति याच त्यांच्या कामगिरीमुळें राहील. "

आपल्या हिंदुस्थानांतही बादशहांच्या मृत्यूची बातमी पसर-

तांच लहान मोठ्या शहरांत व लहान सहान खेडेगांवांतही बाजार वगैरे बंद होऊन दुःख प्रदर्शन करण्यांत आलें. ठिकठिकाणीं सभा होऊन राजकुटुंबाबद्दल सहानुभूति प्रकट करण्यांत आली. हिंदुस्थानचे व्हॉइसराय व गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांनीं हिंदुस्थानांतील लोकांच्या व संस्थानिकांच्या वतीनें नवीन बादशहांस जो सहानुभूतीचा निरोप पाठविला होता, त्यास स्टेट सेक्रेटरीमार्फत नवीन बादशहांकडून पुढील आशयाचें उत्तर आलें आहे.— " माझ्या प्रिय पित्याच्या निधनाबद्दल हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांनीं जें दुःख प्रदर्शित केलें आहे, त्यानें माझें मन अत्यंत सद्गदित झालें आहे, व मजबद्दल त्यांनीं जी सहानुभूति व राजनिष्ठा व्यक्त केली आहे, तिजबद्दल मी फार आभारी आहें. एडवर्ड बादशहा हिंदुस्थानांतील आपला प्रवास मोठ्या प्रेमानें आठवीत आणि हिंदी लोकांचें हित करण्याची बुद्धि सदैव त्यांच्या अंतःकरणांत जागृत असे. मला स्वतःला हिंदी लोकांसंबंधीं जो अनुभव आला आहे, त्यावरून इंग्लंडच्या राजाबद्दल हिंदी प्रजेच्या अंतःकरणांत परम स्वामिभक्ति वसत आहे, हें मी जाणून आहें. त्यांनीं व्यक्त केलेली राजनिष्ठा आपणास पावल्याचें त्यांना कळवावें. हिंदी साम्राज्याचें कल्याण व त्याची उत्तरोत्तर भरभराट होईल, असें करण्याबद्दल व्हिक्टोरिया महाराणी व एडवर्ड बादशहा सदैव दक्ष असत, तसाच मीही राहीन."

एडवर्ड बादशहांच्या अंत्यविधीचा शेवटचा दिवस ता. २० मे शुक्रवार हा ठरविला होता. ता. १७ रोजीं त्यांचें शव बकिंगहाम राजवाड्यांतून वेस्ट मिनिस्टर हॉलमध्यें नेऊन ठेवण्यांत

आलें. त्यावेळीं त्यांच्या वैभवाला शोभेल अशा रीतीनें व्यवस्था ठेविली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस बारा हजार लष्करी शिपाई रांगेनें उभे केले होते. राजेरजवाडे, अमीर उमराव वगैरे सर्व बड्या दर्जाचे लोक राजवाड्यांत जमा झाल्यावर दुपारीं साडे अकरा वाजतां ही प्रेतयात्रा राजवाड्यांतून निघाली. हा व या पुढील सर्व समारंभ अत्यंत गंभीर व साध्या स्वरूपाचा होता. सर्वत्र दुःखाचीं चिन्हें दिसत होतीं. सर्वांच्या पुढें लॉर्ड राबर्टस् व लॉर्ड किचनेर आदीकरून सैन्याचे व आरमाराचे प्रमुख अंमलदार होते. त्यांच्यामागून बादशहांचे एडिकाँग वगैरे लोक चालले असून त्यांच्या मागें बादशहांचें शव घातलेली तोफांची गाडी चालली होती. शवावर एक रेशमी वस्त्र आच्छादिलें होतें; आणि त्यावर मुकुट, राजदंड व इतर राजचिन्हें ठेविलीं होतीं. त्या गाडीच्या मागून राजपुत्र चालले होते. त्यावेळीं त्यांनीं ॲडमिरलचा पोषाक केला होता. त्यांच्यामागून इतर देशचे राजे आणि दरबारचे बडे लोक चालले होते. ही सर्व मंडळी पायीं चालली होती. सर्वांच्या पाठीमागून अलेक्झांड्रा राणीसाहेब, मेरी राणीसाहेब आणि राजघराण्यांतील इतर स्त्रीमंडळ यांच्या पडदा सोडलेल्या ९ गाड्या चालल्या होत्या. रस्त्यांतून जातांना अनेक शोकव्यंजक गीतें म्हटलीं जात होतीं. ही प्रेतयात्रा चालली असतां सर्व लोक आदरपूर्वक तेथील चालीप्रमाणें डोक्यावरील टोपी काढून शोक करणाऱ्यांबद्दल सहानुभूति दाखवीत. वेस्ट मिनिस्टर हालच्या दरवाज्यांत आल्यावर शवावरील रेशमी वस्त्र काढून टाकून ग्रेनेडियर पलटणीच्या लोकांनीं तें शव हॉलमध्यें नेलें. नंतर लॉर्ड वगैरे बडे लोक आपापल्या ठिकाणीं जाऊन उभे राहिले. सर्वांच्या

पुढें लॉर्ड चान्सेलर होते. शवाभोंवतालीं राजघराण्यांतील सर्व मंडळी जमली होती. पुढील रांगेंत मि. आस्किथ व मि. बाल्फर हे एकमेकांच्या शेजारीं होते. बिशप लोकांनीं तांबडे व लार्डांनीं काळे पोषाख केले होते. या सर्व हॉलमध्यें फक्त एक खुर्ची होती. तिजवर अलेक्झांड्रा राणीसाहेब बसल्या होत्या.

नंतर निवडक स्तोत्रांनीं ईश्वराची उपासना झाली. त्यावेळीं अलेक्झांड्रा राणीसाहेब राजेसाहेबांच्या अगदीं शवाजवळ बसल्या होत्या. शेवटचें स्तोत्र म्हणण्यापूर्वीं क्यांटरबरीच्या बिशपनीं लहानसें भाषण करून एडवर्ड बादशहांनीं आपल्या कारकीर्दींत साम्राज्याची कोणती कामगिरी केली तें सांगितलें. त्यावेळीं त्यांचा कंठ अगदीं सद्गदित झाला होता. नंतर शेवटचें स्तोत्र म्हणण्यांत येऊन हा विधि आटोपला. हा विधि आटोपल्यावर अलेक्झांड्रा राणी यांनीं गुडघे टेकून मनांतल्या मनांत ईश्वराची प्रार्थना केली. शेवटीं जार्ज राजांनीं आपल्या मातोश्रीस वर उठविलें, व हात धरून बाहेर नेलें. नंतर अलेक्झांड्रा राणी आपल्या बहिणीसह राजवाड्यांत निघून गेल्या. त्यानंतर जार्ज राजे, मेरी राणी, व इतर मंडळी राजवाड्यांत परत गेली.

ता. १८व१९ बुधवार व गुरुवार ह्या दोन दिवशीं युरोपांतील इतर राजे बादशहांच्या अंत्यविधीकरितां एकसारखे येत होते. आलेल्या पाहुण्यांची ऊठबस करण्यांत बादशहा पांचवे जार्ज व राणी मेरी हीं अगदीं गढून गेलीं होतीं. डेन्मार्क, नॉर्वे, ग्रीस, स्पेन, पोर्टुगाल बेलजियम, बलगेरिया, जर्मनी वगैरे परदेशचे राजे एकसारखे येत होते. २० व्या तारखेच्या अंत्यविधीकरितां एकंदर वीस राजे हजर होते. हिंदुस्थानांतील होळकर महाराज व भरत-

पूरचे महाराज, व नामदार आगाखान हेही त्या प्रसंगीं हजर होते. परदेशच्या राजांकडून बहुमूल्य असे पुष्पहार शवावर घालण्याकरितां आले होते. नामदार आगाखान यांनींही एक बहुमूल्य पुष्पहार पाठविला होता. या शेवटच्या तीन चार दिवसांत वेस्ट मिनिस्टर हॉलमध्यें बादशहांच्या शवाचें दर्शन घेण्याकरितां लक्षावधि लोकांचे थवेच्या थवे एकसारखे लोटत होते. सुमारें २०. लक्ष लोक तरी गेले असावे, असा अजमास आहे. ता.२० शुक्रवार रोजीं खिस्ती धर्माच्या रीतीप्रमाणें शेवटचा भव्य व गंभीर असा विधि करण्यांत आला. त्या दिवशीं इंग्रजी साम्राज्यांत दुपारीं १२ वाजतां आगगाड्या, आगबोटी, गिरण्या, ट्राम वगैरे कारखाने १५ मिनिटेंपर्यंत बंद ठेविले होते. हिंदुस्थानांतही हा दिवस अशौचपालनाचा मानून नेहमींचे व्यवहार बंद ठेवण्यांत आले, व पुष्कळ ठिकाणीं ईश्वराची प्रार्थना करण्यांत आली.

## प्रकरण १० वें.

## कार्यक्षमता, स्वभाव, वगैरे.

### कार्यक्षमता.

ह्यांची बादशाही कारकीर्द फक्त दहा वर्षांचीच झाली, पण युवराज पद त्यांनीं सुमारें अठ्ठावन वर्षें भोगिलें. इंग्लंडच्या युवराजांस प्रिन्स ऑफ वेल्स असें म्हणतात. त्यांचे हातीं वास्तविक अधिकार कांहीं नसतो. केवळ समाजाचा मुकुटमणि म्हणूनच त्यांस लोक मोठा मान देतात. त्यांस कांहीं करतां येण्याजोगें नसतें असें नव्हे; परंतु अधिकार पाहिला असतां त्यांचे हातीं मु-

ळींच नसतो. समाजांत जे दुर्गुण असतील, ते नष्ट करण्याचें पुष्कळ अंशीं त्यांचे हातीं असतें. श्रीमंतांनीं आपल्या संपत्तीचा सद्व्यय कसा करावा, हेंही त्यांस कित्ता घालून दाखविणें त्यांचे हातीं असतें. परंतु सरकारी अधिकार पाहतां त्यांचे हातीं कांहीं नसतो. युवराज एडवर्ड हे आपले हातून कांहींतरी व्हावें अशाबद्दल फार उत्सुक असत. एक दोन वेळां प्रसंग मिळाला तेव्हां त्यांनीं आपल्या आंगची कार्यक्षमता व राजकीय गोष्टींचें ज्ञान स्पष्टपणें लोकांच्या निदर्शनास आणूनही दिलें. इ. स. १८९३ सालीं गरीब लोकांचीं घरें कशीं असावीं, याबद्दल चवकशी करण्यासाठीं कमिशन नेमण्यांत आलें. त्यावेळीं त्या कमिशनवर यांची नेमणूक झाली होती. तेव्हां कमिशनांतील सर्व सभासदांत यांनींच अतिशय परिश्रम केले. त्या विषयाची त्यांस उत्तम प्रकारची माहिती होती, व लॉर्ड लोकांच्या सभेंत त्यांनीं त्या प्रमाणें एकवार बोलूनही दाखविलें. इतकेंच नाहीं, तर आपल्या स्वतःच्या खाजगी इस्टेटीवर राहणाऱ्या गरीबगुरीब लोकांचीं निवासगृहें किती उत्तम तऱ्हेनें आपण बांधून दिलीं आहेत, हें प्रत्यक्ष पाहण्याकरितां कमिशनच्या सभासदांस आमंत्रण करून, प्रत्यक्ष काय केलें होतें, तें त्यांस दाखविलें. त्यासंबंधानें पार्लमेंट सभेंत त्यांनीं भाषण केलें तें फार कळकळीचें होतें. राजा स्वतः आपल्या जमिनीवरील गरीबगुरीब लोकांची अशी उत्तम व्यवस्था करूं लागल्यावर लोकांस आणखी उत्तम उदाहरण तें कोणतें पाहिजे? ३० वर्षेपर्यंत विचार करून व अनुभव घेऊन त्यांनीं आपल्या इस्टेटीची उत्तम व्यवस्था लाविली आहे. आपल्या इस्टेटीवर राहणाऱ्या गरीबगुरीब लोकांस संध्याकाळचे वेळीं मौजेनें बसण्या-

उठण्यास जागा असावी म्हणून एक विश्रांतिगृह बांधिलें आहे. परंतु दारूचें दुकान इस्टेटीवर कोठेंही नाहीं. मद्यपाननिषेधाच्या व्याख्यानांपेक्षां प्रत्यक्ष कृतीच फार चांगली असें कोण म्हणणार नाहीं? इस्टेटीवर मुलांसाठीं औद्योगिक शाळा आहेत. प्रत्येक घरांत स्वस्थपणें बसून अभ्यास करण्याकरितां सुंदर ऊबदार अशा खोल्या व पुस्तकालयें आहेत. आजारी लोकांकरितां दवाखाने आहेत, व एक नमुनेदार पाकशाळा असून तेथें पाकशास्त्राचें शिक्षणही दिलें जातें. नाजूक प्रकृतीच्या मुलींस घरच्या घरीं बसून होतील असे उद्योग शिकविले जातात. युवराजांच्या स्वभावाची ही बाजू लोकांच्या निदर्शनास फारशी आलेली नाहीं. याचें कारण त्यांचे आंगचा विनयच होय. कांहीं वर्षांपूर्वीं त्यांचे मनांत लेबर कमिशनचे ( मजुरांच्या स्थितीसंबंधानें चौकशी करण्याकरितां नेमलेलें कमिशन ) मेंबर व्हावें असें फार होतें. परंतु राजकीय कारणामुळें तें साधलें नाहीं. यामुळें व राजकीय गोष्टींत त्यांस पडतां येत नसल्यामुळें त्यांस सामाजिक गोष्टींतच काय करावयाचें तें करावें लागे. परंतु या संबंधांत त्यांनीं जें काय केलें तें उत्तम प्रकारें सिद्धीस गेलें आहे. इंग्लंडांत नांव घेण्याजोगी संगीतशाळा नव्हती, ती त्यांनीं अस्तित्वांत आणिली. त्याचप्रमाणें “ इंपिरियल इन्स्टिटयूट ” या नांवाची साम्राज्यसंस्था स्थापन केली. संगीतशाळा स्थापन करण्यांत त्यांस पुष्कळ अडचणी आल्या. त्या सर्व अडचणी दूर करून त्यांनीं आपला मनोदय पूर्ण केला. इंग्लंडांत संगीतासंबंधानें कांहीं तरी विशेष असावा, संगीताच्या अभ्यासास राष्ट्रीयत्व प्राप्त व्हावें, आणि इतर देशांप्रमाणें आपल्याही देशांत संगीत विद्येस एक प्रकारचें

श्रेष्ठ असें वळण मिळावें, अशी त्यांची इच्छा होती, व ही इच्छा सफल करण्याकरितां त्यांनीं वर्गणी जमा केली. लोकांकडूनही चांगली मदत होऊन संगीत विद्येचें कॉलेज स्थापन झालें. आतां ती संस्था इंग्लंडच्या राष्ट्रीय संस्थांपैकीं एक होऊन बसली आहे. इंग्लंडांत दोनचार मोठीं प्रदर्शनेंही यांचेचमुळें झालीं. इ.स. १८८६ सालीं हिंदुस्थान व इतर वसाहती या सर्वांचें मिळून एक मोठें थोरलें प्रदर्शन झालें. त्या प्रदर्शनांत ब्रिटिश साम्राज्यांतील कलाकौशल्याच्या सर्व चिजा नेऊन ठेविल्या होत्या, व त्या प्रदर्शनाचें आणि महाराणी व्हिक्टोरिया यांच्या जुबिलीचें स्मारक म्हणून एक मोठी थोरली संस्था अस्तित्वांत आणण्याचा त्यांनीं विचार केला. हा विचार लोकांपुढें मांडतांना त्यांनीं भाषण केलें, तें असें:—"माझी सूचना अशी आहे कीं, इंपीरियल इन्स्टिटच्यूट ही संस्था ब्रिटिश साम्राज्याच्या ऐक्याची निदर्शक व्हावी. महाराणीच्या राज्यांतर्गत सर्व भागांतील वस्तूंचें व कारागिरीचें ज्ञान करून घेण्याला कोणासही ही संस्था उपयोगी पडावी. या संस्थेच्या योगानें महाराणीचें वसाहतींतील व हिंदुस्थानांतील राज्य कारागिरीच्या कामांत इंग्लंडची बरोबरी करण्यास एकेक पाऊल पुढें कसें सरसावत आहे, हें स्पष्ट समजणार आहे." या त्यांच्या हेतूप्रमाणें ती संस्था तर अस्तित्वांत आली. परंतु ज्या हेतूसाठीं ती संस्था अस्तित्वांत आली, तो हेतु मात्र तिच्या हातून सफल होत नाहीं. याचें कारण काय असेल तें असो !

---

## स्वभाव.

एखादा मनुष्य दिसण्यांत सुंदर असेल, श्रीमंत असेल, चां-

गला वक्ता असेल, चांगला कवि असेल, परंतु इतके सगळे गुण असूनही जर तो अंतःकरणाचा चांगला नसेल, म्हणजे त्याचें शील चांगलें नसेल, तर त्या मनुष्यास चांगला म्हणतां येणार नाहीं. शेक्सपीयरनें आपल्या एका नाटकांतील पात्राच्या तोंडून असें वदविलें आहे कीं, "सगळे गुण कालांतरानें कमी होतात, परंतु चांगलें अंतःकरण हें सूर्यचंद्रांसारखें—विशेषेंकरून सूर्यासारखें आहे. कारण, तो सदोदित सारखा प्रकाशतो व आपला क्रम कधीं सोडीत नाहीं." अंतःकरण चांगलें पाहिजे, म्हणजे त्याच्या योगानें पुष्कळ उणिवा भरून येतात, व पुष्कळ सद्गुणांची भरपाई होते. तेव्हां जो मनुष्य अंतःकरणाचा चांगला तोच खरा चांगला होय. एडवर्ड बादशहा स्वभावानें किती चांगले होते, हें पुढील गोष्टींवरून दिसून येईल.

हे युवराज असतां त्यांस एकदां एके ठिकाणीं आमंत्रण आलें होतें. त्या ठिकाणीं निरनिराळ्या धंद्यांचे लोक जमले होते. युवराजांस पाहून ते लोक चपापले, परंतु युवराजांच्या मनमिळाऊपणामुळें सर्व करमणुकीचे प्रकार यथास्थित रीतीनें झाले. त्याच दिवशीं संध्याकाळीं एका फ्रेंच बाईनें पिआनोवर एक गाणें गाइलें. त्यामध्यें युवराजांची निंदा केली होती. तें ऐकून सर्वांना वाईट वाटलें. त्या बाईची लोकांनीं छी थू केली. परंतु युवराजांनीं तिकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. त्या बाईचें त्याच रात्रीं एका नाटकगृहांत गाणें होतें युवराज युवराज्ञीस बरोबर घेऊन त्या नाटकगृहांत गेले, त्यांनीं त्या गाणारणीची टाळ्यांच्या गजरानें स्तुति केली, व तिला आपल्याजवळ बोलावूनही आपली

पसंती व्यक्त केली. युवराजांस पाहून त्या बाईला अगदीं मेल्यासारखें झालें.

युवराज रोम येथील रोमन क्याथोलिक जोगिणींचा मठ पहावयास एकदां गेले होते. त्या मठाबद्दल त्यांच्या मनांत सहानुभूति असण्याचा संभव कमी, असें कोणासही वाटेल; कारण, त्यांचा पंथ निराळा, व जरी त्यांचा गरीब स्वभाव व गुप्त रीतीनें सत्कृत्यें करण्याची तऱ्हा हीं कोणाही प्रासंगिक प्रवाशाच्या लक्षांत यावयाचीं नव्हेत; तरी त्या वेळीं युवराजांनीं दाखविलेली सहानुभूति व सुजनता यांविषयीं त्या जोगिणींनीं त्यांची फार प्रशंसा केली.

ज्यांना आपल्या मित्रमंडळीमध्यें यांनीं एक वेळां सामील केलें त्यांच्याशीं त्यांची वागणुक अगदीं साधेपणाची असे. ह्या मित्रमंडळींत एक गृहस्थ असे, त्याची सर्व जण नेहमीं थट्टा करीत. एकदां हें मित्रमंडळ चैनीखातर बाहेरगांवीं गेलें होतें. तेव्हां सदरहू गृहस्थाची थट्टा करण्याला मंडळीनें आरंभ केला. पुढें तो गृहस्थ चिडला, व तेथून निघून लंडन शहरीं आला. तें पाहून युवराजांस फार वाईट वाटलें. दुसऱ्याच दिवशींच्या टाईम्स पत्रांत प्रिन्स ऑफ वेलसच्या सहीनें एक जाहिरात आली कीं, "अमुक अमुक गृहस्थ आपल्या दु:खी कष्टी मित्रमंडळींत परत आल्यास मागलें सर्व विसरल्यासारखें होईल." ही जाहिरात वाचून तो स्नेही लागलाच परत आला.

या सर्व गोष्टी बरोबरीच्या मंडळीविषयीं झाल्या. माणसाची खरी सुजनता आपल्या हाताखालच्या नोकर लोकांशीं व गरीबगुरिबांशीं चांगल्या रीतीनें वागण्यांतच आहे. अशी सुजनता

आपल्या बादशहांचे ठायीं पूर्णपणें वास करीत होती. सांड्रिंग-हाम राजवाड्यांत कांहीं विशेष उत्सवप्रसंग असल्यास आस-पासच्या शेतकऱ्यांस सहकुटुंब आमंत्रण यावयाचेंच. हें त्या शेत-करी लोकांस आमंत्रण दिलेलें पाहून शेजारच्या बडे बडे लोकांनीं व स्त्रियांनीं प्रथम प्रथम असले प्रसंगीं हजर राहण्याचें नाकारलें. तेव्हां युवराजांनीं प्रत्यक्ष रीतीनें त्यांच्या कानीं असें जाऊं दिलें कीं, शेजारी या नात्यानें मला सर्व सारखे आहांत; तुम्हांस एवढें महत्त्व वाटत असल्यास तुम्ही आलां नाहीं तरी चालेल.

वृद्ध स्त्रियांबद्दल त्यांची पूज्यबुद्धि अनेक प्रसंगीं व्यक्त झाली आहे. हे कांहींही कामांत—खेळांत असोत, वृद्ध स्त्रीस पाहिल्या-बरोबर आपल्या हातचें काम किंवा खेळ टाकून ते तिचा पुस-तपास केल्याशिवाय कधींही रहात नसत.

त्यांच्या बोटीवरील एखाद्या खलाशास कांहीं इजा वगैरे झा-ल्यास त्यांस आपल्या कुटुंबांतील माणसांस इजा झाल्याप्रमाणें दुःख होई, व अपघातानें एखादा मेल्यास ती गोष्ट त्यांच्या म-नाला कित्येक दिवस डांचत असे.

पूर्व वयांत हे केंब्रीज येथील विश्वविद्यालयांत अभ्यासाकरितां जाऊन राहिले होते. एके दिवशीं कांहीं मित्रांसह सहल करण्या-करितां शहरांत गेले असतां पाऊस पडण्यास सुरवात झाली. तेव्हां त्यांनीं तेथल्या एका माळणीपाशीं छत्री मागितली. त्या माळणीनें त्यांस ओळखलें नसल्यामुळें सांगितलें कीं, माझी जुनी छत्री आहे ती पाहिजे तर देईन. माझी नवी छत्री मी कोणास-हीं देणार नाहीं. प्रत्यक्ष प्रिन्स ऑफ वेल्स हे जरी आले, तरी ती मी देणार नाहीं. दुसरे दिवशीं म्हातारी आपली जुनी छत्री



एडवर्ड बादशहा व त्यांच्या कुटुंबांतील मुख्य मंडळी. ( पृष्ठ ९१ )

परत आलेली पाहून चकित व शरमिंदी होऊन गेली. कारण त्या छत्रीवर एक फीत बांधून त्या फितीवर " प्रिन्स ऑफ वेल्स यांचे सलाम " असें लिहिलें होतें.

वर थोड्याच गोष्टी लिहिल्या आहेत. पण त्यांवरून बादशहांची सुजनता कोणासही कळून येणार आहे. राजाचे ठायीं सुजनतां असली, म्हणजे आसपासचे लोक, तसेच अधिकारी लोकही त्यांचा कित्ता उचलतात. राजेसाहेब लहान मोठ्या नोकरांशीं व सर्व मित्रमंडळीशीं आपण सुजनतेनें वागत, इतकेंच नाहीं, तर आपल्या सभोंवतालच्या लोकांस तसें वागण्यास भाग पाडीत. तेव्हां असे हे सुजन बादशहा प्रजेस प्रिय झाले, यांत काय आश्चर्य ?

---

## कुटुंबसौख्य.

कुटुंबसौख्य म्हटलें म्हणजे केवळ पत्नी आणि अपत्यें यांचेंच सुख नव्हे; तर बंधु, भगिनी, चुलते, मामा व इतर सर्व नातेवाईक यांच्यांत कोणतीच फूट नसतां, सर्वांनीं एकमेकांशीं आदर व प्रेमबुद्धि ठेवून परस्परांच्या हिताबद्दल झटणें, असा अर्थ धरावयाचा. बादशहा सातवे एडवर्ड यांस कुटुंबसौख्य अगदीं भरपूर होतें. त्यांच्या स्त्रीसौख्यांत कधींच कांहीं उणेपणा आलेला नाहीं. डेन्मार्कच्या राजकन्येशीं विवाह लावण्यांत अडचणी आल्या असतांही त्या सर्व दूर करून त्यांनीं तिजशीं विवाह करून आपलें प्रेम व्यक्त केलें. हा त्यांचा विवाह विशी एकविशी उलटते न उलटते तोंच झाला; व तेव्हांपासून त्यांचें तें प्रेम आमरण होतें. इ. स. १८६७–६८ च्या सुमारास त्यांची पत्नी अत्यंत आ-

जारी असतां कित्येक महिनेपर्यंत त्यांना आंथरूण सोडतां आलें नाहीं. त्या वेळीं अहोरात्र काळजीपूर्वक त्यांच्या शेजारीं बसून बादशहांनीं ज्या यातना भोगिल्या, त्यांची प्रत्येक इच्छा प्रदर्शित होतां क्षणींच ती तृप्त करण्याकरितां जी तत्परता दाखविली, व त्यांना आराम पडतां क्षणींच जो त्यांस आनंद झाला, त्यावरून त्या उभयतांचें किती निस्सीम प्रेम होतें, हें स्पष्ट दिसून आलें. त्यांना आराम वाटण्याबरोबर हवापालट करण्यासाठीं इजिप्ट, पालेस्टाइन, तुर्कस्थान, ग्रीस वगैरे देशांतून त्यांनीं सफर केली. त्या वेळीं त्यांनीं आपल्या पत्नीबद्दल जी काळजी वाहिली, तीही त्यांच्या निस्सीम प्रेमाची साक्ष आहे. तें त्यांचें निस्सीम प्रेम आणखी पुष्कळ उदाहरणांवरून दाखवितां येईल. इ. स. १८६४ च्या जानेवारीच्या आठव्या तारखेस त्यांस प्रथम पुत्ररत्न झालें. या मुलाचें नांव एडवर्ड असें ठेविलें. सर्व मंडळी त्यास लडिवाळपणानें " एडी " असें म्हणूं लागली. हा मुलगा प्रकृतीनें अगदीं निकोप व सशक्त असल्यामुळें सर्वांस सारखा आवडता झाला व तो आपल्या आईबापांस तर अभिमानाचें व कौतुकाचें स्थानच होऊन बसला. हळू हळू कांहीं वर्षांनीं एकंदर पांच अपत्यें त्यांच्या वाड्यांत नांदूं लागलीं. त्यांच्या शिक्षणाच्या बाबतींत बादशहा स्वतः काळजी घेत असत. मुलांस मोठेपणाचा भलताच अभिमान होऊं नये म्हणून नोकरचाकरांस त्यांस मोठमोठीं विशेषणें देऊन संबोधण्याची मनाई असे. कोठें खेळतांना वगैरे लागल्यासवरल्यास त्याचा मुळींसुद्धां बाऊ केला जात नसे. एके वेळीं प्रिन्स एडी एका खुर्चीवरून खालीं पडला. त्या वेळीं त्याचीं आईबापें जवळच होतीं. मुलास बरेंच लागलें, चांगलें टेंगूळ आलें. परंतु

आईनें अगर बापानें कोणीही त्यास उचलून घेतलें नाहीं, किंवा कोणास उचलूं दिलें नाहीं. केवळ त्यास " रडूं नको, लागलें तर लागलें, रडणें हें केवळ भितरेपणाचें काम आहे. " एवढेंच म्हटलें आणि धीर दिला. तेव्हां त्याचा तोच उठला, आणि कांहीं वेळ डोकें बिकें चोळून स्वस्थ बसला. वर सांगितलेंच आहे कीं, या राजदंपत्यास एकंदर सहा मुलें झालीं. पहिला प्रिन्स एडी (अल्बर्ट. व्हिक्टर), दुसरा जॉर्ज फ्रेडरिक अल्बर्ट, तिसरी प्रिन्सेस लुईस अलेक्झांड्रा, चवथी प्रिन्सेस व्हिक्टोरिया, पांचवी प्रिन्सेस मॉड्, व सहावा मुलगा झाला होता, परंतु तो एक दिवसाचा झाला न झाला तोंच मरण पावला. याप्रमाणें अपत्यसुख या राजदंपत्यास होतें. बरेच दिवसपर्यंत त्यांस अपत्यसंबंधीं शोक झाला नव्हता. परंतु कोणत्याही बाबतींत काय, एकताननेनें सुख मनुष्यप्राण्यास —मग तो राजवैभवारूढ असो, किंवा अत्यंत दरिद्री असो—कोठून असणार ? कांहीं वर्षांनीं त्यांजवर सगळ्यांत वडील पुत्राच्या मरणाचा दुर्धर प्रसंग येऊन गुदरला. राष्ट्राच्या भावी आशेचा तंतु नष्ट झाल्याकारणानें त्यांस किती दुःख झालें असेल, याची कल्पनासुद्धां साधारण लोकांस करतां येणें शक्य नाहीं. इ. स. १८९२ सालीं त्या राजपुत्राचा विवाहही होण्याचें ठरलें, परंतु सर्व राष्ट्रांस ही सुवार्ता पुरतेपणीं कळते न कळते तोंच त्याच्या मृत्यूची दुःखद वार्ता जिकडे तिकडे पसरली. जानेवारीच्या ९ वे तारखेस त्याला ताप भरला व मनुष्यास जितके उपाय करणें शक्य व जितकी काळजी घेणें शक्य, तितके सगळे उपाय केले व तितकी काळजी घेतली, तथापि त्या उपायांचा व काळजीचा कांहींसुद्धां उपयोग झाला नाहीं; व शेवटीं तो मरण पा-

वला! यावेळीं त्याचें वय २८ वर्षांचें असून हाउस ऑफ लॉर्डस्-मध्यें बसण्याची त्याची नुकतीच सुरवात झाली होती. असा हा कर्ता सवरता मुलगा मृत्यु पावल्यामुळें साहजिकपणेंच कांहीं दिवस बादशहांस कांहींएक सुचेनासें झालें; व कोणत्याही सार्वजनिक समारंभांत किंवा लौकिक कर्तव्यांत ते दिसले नाहींत. इ. स. १८८३ त या शोकांतच त्यांचे आंगावर महाराणी व्हिक्टोरियांनीं एक जबाबदारीचें काम सोंपविलें. तें कोणतें म्हणाल तर गरीब-गुरीब लोकांचीं राहण्याचीं घरें अधिक सोईचीं व सुखकर होण्यास काय करावें, याबद्दल चौकशी करण्यास नेमलेल्या कमिशनमध्यें यांची नेमणूक त्यांनीं केली. यावेळीं त्यांनीं किती काळजीपूर्वक काम केलें व या कामास आपण किती योग्य आहों हें त्या वेळच्या अधिकाऱ्यांच्या प्रत्ययास कसें आणून दिलें, ह्याबद्दलची हकीकत याच प्रकरणांत वर एकदां आली आहे.

असो, एवढें एक दुःख खेरीज करून या राजदंपत्याचें बहुतेक आयुष्य सुखांत गेलें. मनुष्यमात्रास दुःख आहेच; त्याप्रमाणें यांसही कांहीं कौटुंबिक दुःखें अनुभवावीं लागलीं.

---

## वैभव.

संपत्तिमान् कोण आणि दरिद्री कोण, हें ठरविणें आपल्या दृष्टीवर अवलंबून आहे. तथापि साधारणतः ज्याचा आदा अवाढव्य व खर्चही अवाढव्य त्यांस आपण श्रीमान् म्हणतों. एडवर्ड बादशहा यांची खाजगी संपत्ति अतिशय अवाढव्य होती असें नाहीं. त्यांचें दरसालचें खाजगी उत्पन्न सत्तावन लक्ष पंचाहत्तर हजार रुपयांचें होतें. म्हणजे सरासरीनें रोज पंधरा हजार रुपये

त्यांचा आदा होता. जन्मापासूनच त्यांचें उत्पन्न दरसाल नऊ लक्ष रुपये होतें; व पुढें विवाहाचे वेळीं दरसाल सहा लक्ष रुपयांनीं तें वाढलें; व त्यानंतर इ. स. १८८९ सालीं दरसाल आणखी पांच लक्ष चाळीस हजार रुपये पार्लमेंटानें त्यांस दिले. मिळून राजपद मिळण्यापूर्वीं एडवर्ड बादशहांस सरासरी वीस लक्ष रुपये दरसाल उत्पन्न होतें. हें सगळें उत्पन्न त्यांच्या खाजगी खर्चाकरितांच होतें. त्यांच्या संपत्तीची गणना अनेक प्रकारांनीं करून वाचकांचे मनावर त्यांच्या संपत्तीची कल्पना ठसवितां येईल; परंतु एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, अशा श्रीमंत पुरुषांस जसा आदा असतो, तसाच त्यांना खर्चही असतो. जेथें साधारण माणसास एखादा पैसा खर्च करून काम भागतें, तेथें अशा पुरुषास एक रुपया खर्च करावा लागतो. या मानानें पाहतां त्यांच्या पदवीला योग्य असा खर्चही होता. त्यांच्या देणग्याही तशाच प्रकारच्या असत. फार मोठ्या देणग्या असल्या म्हणजे त्या लोकांच्या नजरेसमोर दिसतात. परंतु बारीक सारीक देणग्या, कीं ज्यामुळें कित्येक गरीब कुटुंबें सुखांत राहतात, त्या देणग्या लक्षांत घेतल्या असतां बादशहांच्या देणग्यांची रक्कम किती होईल याची कल्पनासुद्धां होत नाहीं. आजपर्यंत सरासरीच्या मानानें ४७ लक्ष रुपयांच्या तरी त्यांनीं देणग्या दिल्या असाव्या असा अजमास आहे. हें खाजगी उत्पन्न व धर्मादाय जसा त्यांचा मोठा होता, तसेंच त्यांचें राजकीय वैभवही फारच मोठें होतें. ते ब्रिटिश साम्राज्याचे अधिपति होते. ब्रिटिश साम्राज्य हें केवढें मोठें आहे, ह्याचा थोडासा विचार केला म्हणजे ह्यांचें राजकीय वैभव केवढें विशाळ होतें, ह्याची कल्पना होईल.

ह्या पृथ्वीवर प्राचीनकाळीं जीं मोठमोठीं प्रबल राज्यें होऊन गेलीं व सध्यां जीं प्रबल, स्वतंत्र व सत्ताधीश म्हणून प्रसिद्ध आहेत, त्या सर्वांत ब्रिटिश साम्राज्याची बरोबरी करणारें एकही राज्य नाहीं. ब्रिटिशांची राज्यव्यवस्था, त्यांचा अवाढव्य व्यापार, त्यांचें आरमाराचें सामर्थ्य, त्यांचें राजकीय धोरण, त्यांचे राज्याचा विस्तार, वगैरे कोणत्याही बाबतींत हें राज्य इतर राष्ट्रांपेक्षां श्रेष्ठ आहे. प्राचीन काळचें रोमन राज्य ह्या राज्यापेक्षां फार लहान होतें. विस्ताराच्या मानानें सध्यां मोठीं अशीं रशिया व चीन हीं राज्यें आहेत. तरी त्यांच्यापेक्षांही यांचें राज्य मोठें आहे. एकंदर पृथ्वीचा १/५ भाग ह्या राज्यानें व्यापिलेला आहे. रशियानें १/६ भाग व चीननें १/१२ भाग व्यापिलेला आहे; असा सरासरी अजमास आहे. ह्यांचें आरमारी सामर्थ्यही फार मोठें आहे. इतर कोणत्याही दोन प्रबल राज्यांचीं सर्व गलबतें एकत्र केलीं, तरी त्या सर्वांकडून ह्यांच्या गलबतांची बरोबरी होणार नाहीं. ह्या साम्राज्याचा मुख्य भाग ग्रेटब्रिटन व आयर्लंड हें संयुक्त राज्य आहे. पण त्यांचें इतर ठिकाणचें राज्य ह्या देशांच्या क्षेत्रफळाच्या शंभर पटीजवळ आहे. ह्या राज्याचें एकंदर क्षेत्रफळ १ कोटी २० लक्ष चौरस मैल इतकें आहे. रशिया किंवा चीन ह्या राज्यांप्रमाणें हें राज्य अखंड नाहीं. पृथ्वीवरील सर्व कटिबंधांत तें पसरलेलें आहे. ह्याचा विस्तार फार मोठा असल्यामुळें, " ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधींही मावळत नाहीं, " असें सर्व लोक म्हणतात. ह्या म्हणण्याचा अर्थ इतकाच आहे कीं, ह्यांच्या राज्यांत कोठें ना कोठें सूर्य उगवलेला दिसतोच. वेब्स्टर नांवाच्या एका अमेरिकन पंडितानें ब्रिटिश साम्राज्यावर पुढीलप्रमाणें

लेख लिहिला आहे. " हें साम्राज्य एवढें मोठें आहे कीं, ह्यानें भूगोलाचा पृष्ठभाग आपल्या ताब्यांतील प्रदेशांनीं व लष्करी ठाण्यांनीं व्यापून टाकिला आहे; व ब्रिटिश लष्करी सत्तेचा दुंदुभिध्वनि जो एकदां सूर्योदयीं सुरू होतो तो सूर्याच्या गतीच्या अनुरोधानें क्रमशः पृथ्वीप्रदक्षिणा करितो ! "

ह्या राज्याची इतर राज्यांशीं तुलना दाखविणारें कोष्टकः—

| राज्य. | क्षेत्रफळ चौरस मैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|
| इंग्लंड. | १२०००००० | ३९०००००००० |
| रशिया. | ६४४४००० | १३००००००० |
| युनायटेडस्टेट्स. | ३६५०००० | ८७०००००० |
| फ्रान्स. | २८४०००० | ९६०००००० |
| जर्मनी. | १२३५००० | ७००००००० |

हे आंकडे दहा वर्षांपूर्वीचे आहेत. वरचें कोष्टक पाहिलें तर त्यांत सर्वांपेक्षां ब्रिटिश साम्राज्य श्रेष्ठ आहे असें दिसून येईल. चीनची लोकसंख्या कांहीं ज्यास्त आहे, परंतु इतर बाबतींत तें फार कमी आहे.

ह्या ब्रिटिश साम्राज्यांत पृथ्वीवरील सर्व महाद्वीपांतील व महासागरांतील प्रदेश समाविष्ट होतात. त्यामुळें सृष्टिसौंदर्याचीं अनेक चित्रविचित्र स्वरूपें, हवामानाचे नानाविध प्रकार,

भिन्न भिन्न प्रकारचे उत्पन्नाचे पदार्थ, ब्रिटिश साम्राज्यांत पहा-वयास व उपभोगावयास सांपडतात. तसेंच आकाशांत, जमिनी-वर व पाण्यांत संचार करणारे सर्व प्राणी ह्या साम्राज्यांत कोठेंना कोठें तरी मिळतात. त्याप्रमाणेंच अमुक एका देशाचे, अमुक वर्णाचे, अमुक समाजाचे, अमुक आचारविचारांचे, अमुक धर्म-पंथाचे लोक ह्या साम्राज्यांत नाहींत असें नाहीं. एकंदरींत सर्व प्रकारच्या उभ्दिज्ज, खनिज व प्राणिज वस्तूंचा संग्रह ब्रिटिश साम्राज्यांत फार मोठा झाला आहे.

एवढ्या मोठ्या साम्राज्यावर एडवर्ड बादशहा अधिकार चालवीत होते व ह्यांतील सुमारें चाळीस कोट प्रजा ह्यांना पूज्य मानीत होती; ह्यावरून त्यांचें वैभव केवढें मोठें होतें हें दिसून येईल.

---

## प्रकरण ११ वें.

### उपसंहार.

लहानपणापासूनच सद्वर्तनानें व नीतिनियमानुसार वाग-ण्याची संवय लागावी, तसेंच राजा झाल्यावर राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालविण्याचें आंगीं सामर्थ्य यावें, या हेतूनें शिक्षणाची कोणतीही लहानमोठी बाब न वगळतां उत्तम तऱ्हेचें शिक्षण देण्याची तजवीज महाराणी व्हिक्टोरिया यांनीं कशी केली होती ह्याचें संक्षिप्त वर्णन मागें केलें आहे. राजानें प्रजेचें पालन

करून न्यायानें राज्यकारभार चालविणें अगत्याचें असल्यामुळें राजाला लहानपणापासून योग्य रीतीनें शिक्षण मिळणें जरूर आहे, ही गोष्ट इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून त्यांच्या मेहनतीनें आपल्या देशांतील राजेरजवाडे व इतर लोक यांस अलीकडे समजूं लागली, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

आपल्या धर्माला ब्रिटिश राज्यांत केवढा मान दिला जातो हेंही या चरित्रावरून दिसून येईल. एडवर्ड बादशहांना ख्रिस्ती धर्मांत दाखल करण्याचा विधि ते लहान असतांच करण्यांत आला होता, परंतु योग्य वय झाल्यावर ख्रिस्ती धर्मांत कायम करण्याची वेळ आली, तेव्हां त्यांना खिस्तीधर्माबद्दल किती माहिती आहे हें पाहण्याकरितां रीतीप्रमाणें चांगल्या चांगल्या लोकांसमक्ष क्यांटर्बरीचे आर्चबिशप यांनीं त्यांची परीक्षा घेतली. आपल्या विवाहाच्या वेळीं त्यांनीं आपल्या गुरुजीला बायबलचें सुंदर पुस्तक भेट म्हणून पाठविलें होतें. इंग्लंडच्या गादीवर बसणारा राजा प्राटेस्टंट मताचाच असला पाहिजे व त्यानें प्राटेस्टंट मताच्याच वधूशीं लग्न केलें पाहिजे, असा इंग्लंडांत कायदा आहे. यावरून इंग्लंडांत राजा व प्रजा यांची आपल्या धर्मावर किती निष्ठा आहे हें दिसून येतें.

बादशहांचें आपल्या कुटुंबांतील मंडळीविषयीं असलेलें प्रेम व सर्वांशीं सलोख्यानें वागण्याचा स्वभाव यांकडे आपल्या इकडच्या लोकांनीं लक्ष देणें जरूर आहे. बाल्यावस्थेंत आपल्या भावंडांशीं असलेलें ममतेचें वर्तन, तरुण वयांत मातृपितृभक्ति व राज्यासनावर बसल्यानंतर बंधुप्रेम हीं ध्यानांत आणिलीं, तर

त्यांचें आपल्या कुटुंबांत कसें वर्तन होतें, हें समजून येईल. गुरुजनांविषयीं विनयबुद्धि व मातोश्री महाराणी व्हिक्टोरिया यांच्याविषयीं त्यांचा पूज्यभाव हे गुण अनुकरणीय होते.

हे बादशहा फार मायाळू स्वभावाचे होते. धरणीकंप, दुष्काळ वगैरे आपत्तींनीं विपद्ग्रस्त झालेल्या लोकांविषयीं त्यांच्या मनांत कळवळा उत्पन्न होई. अशी कोठें आपत्ति आलेली त्यांना समजली कीं, त्या ठिकाणच्या लोकांस पत्र वगैरे पाठवून त्यांच्या मदतीकरितां योग्य रक्कमही त्यांच्याकडून जात असे. राजानें गरीब प्रजेचा विशेष संभाळ करणें जरूर आहे. बादशहांचें नेहमींचें वर्तन पाहिलें म्हणजे गरीब लोकांविषयीं त्यांच्या मनांत अत्यंत काळजी होती असें दिसून येतें. क्रिमियाच्या लढाईंत घायाळ झालेल्या लोकांच्या संगोपनाकरितां किंवा अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या कामाकरितां फंड जमविण्यासाठीं ते फार मेहनत करीत. गरिबांना राहण्यास चांगलीं घरें मिळावीं म्हणून त्यांनीं पुष्कळ योजना केल्या होत्या. रशियन लोकांच्या गैरसमजुतीनें उत्तर समुद्रांत मारल्या गेलेल्या मच्छीमार लोकांच्या मदतीकरितां उभारलेल्या फंडास त्यांनीं चांगली मदत केली होती. राज्याभिषेकाच्या वेळीं लंडन शहराच्या तर्फेनें लार्ड मेयर यांनीं बरीच रक्कम बादशहांस नजर केली होती; पण ती त्यांनीं एका धर्मार्थ दवाखान्यास देऊन टाकिली. आपल्या हिंदुस्तान देशांतील प्रजेविषयींही त्यांच्या मनांत फार कळकळ होती. हिंदुस्तानच्या स्थितीकडे ते फार बारकाईनें लक्ष पुरवीत. हिंदी प्रजेवर कांहीं

संकट गुदरल्यास त्यांविषयीं पत्रद्वारा किंवा भाषणद्वारा आपली सहानुभूति ते प्रगट करीत. प्लेगच्या कहरामुळें हिंदी प्रजा फार त्रस्त झाली आहे हें ऐकून त्यांच्या मनाला फार दुःख झालें. तेव्हां त्यांनीं हिंदुस्तानचे व्हाइसराय लॉर्ड मिंटो यांस माहे आगष्ट इ०स० १९०७ मध्यें पत्र पाठवून हिंदी प्रजेविषयीं आस्था व्यक्त केली आहे. त्या पत्राचा सारांश असा:—" आज अकरा वर्षेपर्यंत ज्या भयंकर सांतीनें हिंदुस्तानाला ग्रासून टाकिलें आहे त्या सांतीच्या प्रसाराचें मीं सूक्ष्म अवलोकन केलें आहे. हिंदी प्रजेच्या कल्याणाविषयीं मला फार काळजी आहे, आणि ते लोक हें दुःख किती सहनशीलपणानें सोशीत असतील याचा विचार ज्या ज्या वेळीं माझे मनांत येतो त्या त्या वेळीं मला फार दुःख होतें. प्लेगचीं कारणें व तन्निवारणार्थ उपाय शोधून काढण्यास तुमच्या पूर्वीचे व्हाइसराय व तुम्हीं यांनीं किती अविश्रांत परिश्रम केले आहेत, हें आम्ही जाणून आहों. तुमच्या उत्साही आणि कर्तृत्ववान् अशा कामदारांच्या संमतीनें तुम्ही जे उपाय योजीत आहां ते ईश्वराच्या कृपेनें सिद्धीस जावोत अशी माझी मनापासूनची आशा व प्रार्थना आहे. माझ्या मनांत असलेली सहानुभूति माझ्या हिंदी प्रजेला तुम्ही कळवाल अशी मी आशा बाळगतों. "

विद्येला उत्तेजन देणें हें राजाचें अवश्य कर्तव्य आहे. त्यांनीं स्वतः निरनिराळ्या विद्यापीठांत राहून मोठ्या मेहनतीनें विद्यार्जन केलें होतें, निरनिराळ्या विषयांचें ज्ञान संपादन केलें होतें, व वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास केला होता; व हें करीत असतां

त्यांना स्वतः जो अनुभव आला होता तो लक्षांत घेऊन विद्येला उत्तेजन देण्याकडे त्यांचें लक्ष असे. बादशहांच्या चरित्रावरून त्यांच्या आंगीं निरभिमानता, नम्रता, विवेक, दया, अनुकंपा, मधुर भाषण, सुशीलता वगैरे अनुकरणीय गुण पुष्कळ होते असें दिसून येईल. त्यांच्या मित्रत्वामुळें जपान वगैरे देशांना फायदा मिळाला आहे. राशियाबरोबर इंग्लंडची मैत्री होईल असें कोणाच्या स्वप्नांतही आलें नव्हतें; पण त्यांनीं राशियाबरोबर स्नेह जोडला ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे.

हिंदुस्तानांतील लोकांच्या प्रगतीसंबंधानें एडवर्ड बादशहांस किती आस्था वाटत होती हें बादशहांच्या इ०स०१९०८ च्या जाहीरनाम्यावरून ( हा जाहीरनामा नवव्या प्रकरणांत संपूर्ण दिला आहे.) स्पष्टपणें दिसून येईल. हिंदुस्तानचें राज्य कसें चालवावें, याची दिशा इ०स०१८५८ सालच्या महाराणी साहेबांच्या प्रसिद्ध जाहीरनाम्यांत आंखून देण्यांत आली होती. परंतु त्या जाहीरनाम्यांतील आश्वासनांची क्रमाक्रमानें अम्मलबजावणी करण्यास वाजवीपेक्षां जास्त दिरंगाई झाल्यामुळें लोकांचीं मनें साशंक झालीं होतीं. म्हणून त्या जाहीरनाम्यांतील समतेच्या तत्त्वांचें पुनरुच्चारण एडवर्ड बादशहांनीं आपल्या अधिकारयुक्त वाणीनें आपल्या जाहीरनाम्यांत केलें. त्यामुळें लोकांचीं साशंक मनें स्वच्छ होण्यास फार मदत झाली. महाराणी व्हिक्टोरिया यांच्या कारकीर्दींत हिंदुस्तानचा राज्यकारभार विलायत सरकारच्या हातीं आला, आणि सर्व हिंदी लोकांस नागरिकत्वाचे हक्क मिळून जातीजातींमधील विषमता तात्विक

दृष्टया नाहींशी करण्यांत आली, म्हणून महाराणी व्हिक्टोरिया यांची कारकीर्द ज्याप्रमाणें हिंदुस्तानच्या इतिहासांत संस्मरणीय झाली आहे, त्याचप्रमाणें इ० स० १८५८ च्याजाहीरनाम्यांतील आश्वासनांस कृतीचें स्वरूप देण्यासाठीं एक मजल पुढें गेल्यामुळें एडवर्ड बादशहांची कारकीर्द या देशाच्या इतिहासांत फार महत्त्वाची गणिली जाईल यांत शंका नाहीं.

असो, सर्व लोकांकडून चांगलें म्हणवून घेऊन बादशहांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. त्यांच्या आत्म्यास सद्गति मिळून अक्षय्य सुख मिळो, अशी जगन्नियंत्याची प्रार्थना करून हें अल्पसें चरित्र पुरें करितों.

## परिशिष्ट पहिलें.

### परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांनीं ता. १ नवंबर इ० स० १८५८ रोजीं प्रसिद्ध केलेला जाहीरनामा.

१. व्हिक्टोरिया—ईश्वरकृपेनें ग्रेट ब्रिटन व ऐर्लंड या संयुक्त राज्याची व या राज्याच्या ताब्यांत युरोप, आशिया, आफ्रिका, अमेरिका आणि आस्ट्रेलेशिया या खंडांमध्यें ज्या वसाहती व उपराज्यें आहेत, त्या सर्वांची मालिका मा आझमा व धर्मसंरक्षक आहे.

२. आजपर्यंत हिंदुस्तानांतील मुलखांचा राज्यकारभार आमच्या वतीनें आनरेबल ईस्ट इंडिया कंपनी चालवीत होती,

तो आपणच चालवावा, असें कितीएक महत्त्वाच्या कारणांवरून पार्लमेंट सभेंत जमलेले स्पिरिच्युअल व टेंपोरल लार्ड आणि कॉमन्स यांच्या सल्लयानें, व अनुमतानें आम्हीं ठरविलें आहे.

३. यास्तव आम्ही आतां या जाहीरनाम्याच्या द्वारें कळवितों व प्रसिद्ध करितों कीं, वर लिहिल्याप्रमाणें सल्ला व अनुमत घेऊन सदर्हू राज्यकारभार आम्हीं आपल्या हातीं घेतला आहे; आणि सदर्हू मुलखांतील आमच्या सर्व रयतेस फर्मावितों कीं, आमच्याशीं, आमच्या वारसांशीं,आणि आमच्या जायनिशीनांशीं तुम्हीं इमानानें, व खरोखर रयतेच्या नात्यानें वागावें; आणि यापुढें सदर्हू मुलखांचा राज्यकारभार आमच्या नांवें व तर्फें चालविण्यासाठीं, ज्या ज्या वेळीं ज्यांची ज्यांची नेमणूक आम्हीं करूं त्या त्या अधिकाऱ्यांचा हुकूम तुम्हीं मानीत जावा.

४. आमचे मोठे विश्वासू आणि फार प्रीतींतले मंत्री नबाब चार्लस जान व्हायकौन्ट क्यानिंग साहेब यांचें इमान, व योग्यता, व शहाणपणा यांवर आम्हीं पूर्ण विश्वास आणि भरवंसा ठेवून, त्यांस म्हणजे मशारनिल्हे व्हायकौन्ट क्यानिंग साहेब यांस सदर्हू मुलखांत आमचे पहिले व्हाइसराय व गव्हर्नर जनरल ठरवितों व नेमितों; आणि आमच्या नांवें सदर्हू मुलखांचा राज्यकारभार चालविण्यास, तसेंच एका मुख्य स्टेट सेक्रेटरीच्या मार्फत जे जे हुकूम, व कायदे त्यांस वेळोवेळीं आम्हांकडून पोहोंचतील त्यांस अनुसरून, हरएक बाबतींत आमच्या नांवें व तर्फें वहिवाट करण्यास त्यांस अधिकार देतों.

५. आनरेबल ईस्ट इंडिया कंपनी यांणीं हल्लीं ज्या ज्या मुलकी व लष्करी कामांवर जे जे असामी नेमिलेले आहेत, त्या सर्वांस त्या त्या कामांवर आम्ही काईम करितों; पुढें जशी आमची मर्जी होईल, व जे कायदे व कानू आम्ही ठरवूं, त्याप्रमाणें फेरफार होतील.

६. हिंदुस्तानांतील राजेरजवाडे यांस आम्ही जाहीर करितों कीं, त्यांबरोबर आनरेबल ईस्ट इंडिया कंपनीनें जे तहनामे व करारनामे केले असतील, किंवा जे सदहू कंपनीच्या हुकुमानें झाले असतील, ते सर्व आम्हांस मान्य आहेत, व आम्ही ते लक्षपूर्वक पाळूं; याचप्रमाणें राजेरजवाडे यांणींही आपापले तर्फेनें ते तहनामे, व करारनामे पाळले पाहिजेत.

७. आमचें जें हल्लींचें राज्य आहे तें वाढविण्याची आम्हांस अगदीं इच्छा नाहीं; आमचें राज्य, व राजाधिकार यांस धक्का पोंचविण्यास कोणीं यत्न केला असतां आम्ही त्यास शिक्षा केल्यांवांचून राहणार नाहीं; आणि त्याचप्रमाणें इतरांच्या मुलखांस व हक्कांस धक्का पोंचेल अशी गोष्ट आम्ही कधीं मंजूर करणार नाहीं. ज्याप्रमाणें आम्ही आपला अधिकार, आपला दर्जा व आपला मर्तबा राखतों, त्याचप्रमाणें हिंदुस्तानांतील राजेरजवाडे यांचा अधिकार, व दर्जा व मर्तबा आम्ही राखूं. राजेरजवाड्यांची, तशीच आमच्या रयतेची आबादानी, व बढती असावी असें आम्ही इच्छितों; व हें देशांत स्वस्थता, व चांगल्या प्रकारची राज्यव्यवस्था असेल, तरच घडेल.

८. आमच्या सर्व रयतेविषयीं जे राजधर्म आम्ही अवश्य मानितों, तेच राजधर्म हिंदुस्तानांतील आमच्या मुलखांतल्या रयतेविषयीं आम्हांस पाळिले पाहिजेत, असें आम्ही समजतों; आणि ईश्वराच्या कृपेनें ते सर्व वास्तविक रीतीनें व मनःपूर्वक पाळूं.

९. ख्रिस्ती धर्माच्या खरेपणावर आमचा पूर्ण विश्वास आहे,व धर्माच्या योगानें जें समाधान होतें तें स्मरून आम्ही ईश्वराचे उपकार मानितों. असें आहे तरी, धर्मसंबंधी जे आमचे विचार आहेत ते आमच्या रयतेनें स्वीकारण्याविषयीं सक्ती करण्यास आम्हांस अधिकार नाहीं, व तशी इच्छाही नाहीं. धर्मसंबंधी विचाराच्या किंवा आचरणाच्या सबबीनें कोणाची तरफदारी होऊं नये, व कोणास इजा होऊं नये, व कोणास दुःख होऊं नये, तसेंच कायद्यांचा आश्रय सर्वांस समान रीतीनें, व निःपक्ष-पातानें मिळावा, अशी आमची आज्ञा आहे. आमच्या सर्व अधिकाऱ्यांस आमची सक्त ताकीद आहे कीं, आमच्या रयत लोकांची धर्मसंबंधी समजूत, किंवा भक्ति या प्रकरणीं त्यांणीं कोणतेही प्रकारें हात घालूं नये; घालतील तर त्यांवर आमची मोठी इतराजी होईल.

१०. आणखी आमची अशी आज्ञा आहे कीं, आमच्या रयत लोकांपैकीं जे कोणी विद्येनें, हुशारीनें, व प्रामाणिकपणानें जीं जीं सरकारी कामें यथास्थित चालविण्यास लायक असतील तीं तीं कामें, सवड असेल त्याप्रमाणें, बिनदिक्कत व निःपक्षपातानें त्या लोकांस ज्ञात किंवा धर्म मनांत न आणितां द्यावीं.

११. वडिलांपासून चालत आलेल्या जमिनींवर हिंदुस्तानांतील लोकांची आसक्ति आहे ती आम्हांस माहीत असून आमच्या लक्षांत आहे. सरकारचें वाजवी घेणें असेल तें घेऊन लोकांचे जमिनीसंबंधी जे जे हक्क असतील ते ते त्यांकडे सुरक्षित ठेवावे, व हरएक बाबतींत कायदे ठरवितांना व ते अमलांत आणितांना, हिंदुस्तानांत जे प्राचीन हक्क, व वहिवाटी, व रिवाज चालत आले असतील त्यांवर योग्य नजर द्यावी, अशी आमची आज्ञा आहे.

१२. राज्यलोभी मनुष्यांनीं स्वदेशीय लोकांस खोटे मजकूर समजावून फसविलें, आणि दंगा करण्यास प्रवृत्त केलें; अशा त्यांच्या कृत्यांनीं हिंदुस्तानांतील लोकांस इजा, आणि दुःखें प्राप्त झालीं; एणेंकरून आम्हांस फार दुःख झालें आहे. दंगा करणारांचा पराजय करून दंग्याचा मोड केला यावरून आमचें सामर्थ्य सर्वांस जाहीर झालें आहे.

१३. परंतु सदर्हूप्रमाणें फसलेल्या लोकांपैकीं जे पुनः योग्य रीतीनें चालूं इच्छितात त्यांवर दया करून, त्यांच्या अपराधांचीं क्षमा करावी अशी आमची मर्जी आहे.

१४. अधिक रक्तस्राव न व्हावा व हिंदुस्तानांतील आमच्या मुलखांत स्वस्थता लवकर व्हावी या उद्देशानें एका प्रांतांत तर आमचे व्हाइसराय व गव्हर्नर जनरल यांणीं मागें जे दुःखकारक दंगे झाले त्यांत ज्या लोकांनीं सरकारच्या विरुद्ध गुन्हे केले त्या बहुतेक लोकांस, कांहीं अटी ठरवून अपराधांची क्षमा होईल अशी आशा दाखविली आहे; आणि ज्यांचे अपराध

क्षमेस पात्र नाहींत, अशा गुन्हेगारांस काय काय शिक्षा होईल हेंही त्यांणीं ठरविलें आहे. सदर्हू तजवीज आमचे व्हाइसराय आणि गव्हर्नर जनरल यांणीं केली आहे ती आम्हांस मंजूर व कबूल आहे, व याशिवाय आम्ही आणखी जाहीर करतों तें येणेंप्रमाणें:—

१५. इंग्रज सरकारच्या रयतेचे खून करण्यांत प्रत्यक्ष संबंध असल्याची ज्यांवर शाबिती झाली असेल, किंवा होईल त्या गुन्हेगारांवर दया करणें न्यायाविरुद्ध आहे; परंतु त्यांखेरीज बाकीच्या सर्व गुन्हेगारांवर दया केली जाईल.

१६. खुनी गुन्हेगारांस ज्या लोकांनीं समजून उमजून आश्रय दिला असेल किंवा जे दंग्यास पुढारी अथवा प्रवर्तक झाले असतील त्यांस जीवदानाखेरीज दुसरें कांहीं आश्वासन देववत नाहीं. परंतु अशा मनुष्यांस शिक्षा ठरवितांना, ते सरकाराशीं बेइमान होण्यास कोणत्या कारणावरून प्रवृत्त झाले, याचा पूर्ण विचार केला जाईल; आणि मतलबी मनुष्यांनीं उठविलेल्या खोट्या बातम्या केवळ अविचारानें खऱ्या समजून ज्या लोकांनीं गुन्हे केले असें दिसून येईल त्या लोकांविषयीं पुष्कळ मेहेरबानीची नजर ठेविली जाईल.

१७. सदर्हू मनुष्यांखेरीज जे लोक दंग्यांत असून लढाई करीत असतील ते जर आपापल्या घरास परत येऊन स्वस्थ आपापले कामधंदे करूं लागतील तर त्यांनीं आमच्या विरुद्ध व आमच्या राज्याविरुद्ध, व आमच्या दर्जाविरुद्ध केलेले सर्व

गुन्हे विसरून कोणतीही अट न लावतां त्यांस माफी व क्षमा मिळेल असें आम्ही या जाहीरनाम्याच्या द्वारें आश्वासन देतों.

१८. अपराधांची क्षमा, व मेहेरबानी करण्याप्रकरणीं जे नियम वर लिहिले आहेत त्यांअन्वयें पुढील जान्युआरी महिन्याच्या १ ले तारखेपूर्वीं जे वर्तन करतील त्या सर्वांस माफीचे, व मेहेरबानीचे सदर्हू ठराव लागू करावे अशी आमची आज्ञा आहे.

१९. ईश्वरकृपेनें जेव्हां हिंदुस्तानांत स्वस्थता होईल, तेव्हां त्या देशांतील व्यापारधंद्यांस उत्तेजन द्यावें, लोकोपयोगी आणि लोककल्याणाच्या कृत्यांची वृद्धि करावी, व त्या देशांत राहणाऱ्या आमच्या सर्व रयतेचें हित होईल अशा रीतीनें राज्यकारभार चालवावा, अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या रयतेची आबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती, व त्यांची कृतज्ञता तेंच आम्हांस उत्तम फळ, असें आम्ही समजतों. रयतेच्या कल्याणाविषयीं आमच्या ज्या इच्छा आहेत त्या सिद्धीस नेण्यास सर्व शक्तिमान् जो परमेश्वर तो आम्हांस व आमच्या अधिकाऱ्यांस सामर्थ्य देवो अशी प्रार्थना आहे.

# परिशिष्ट दुसरें.

## बादशहा सातवे एडवर्ड यांनीं प्रसिद्ध केलेला जाहीरनामा.

" हिंदुस्तानांतले राजेरजवाडे आणि प्रजाजन ह्या सगळ्यांचें कल्याण व्हावें, अशी आमची फार इच्छा आहे. आमच्या मातुश्रींनींच हिंदुस्तानचा राज्यकारभार प्रत्यक्ष आपलेकडे घेतला, आणि त्या देशावर त्यांच्या विशेष असलेल्या प्रेमाच्या ओढ्यानें त्यांनीं आपणांस ' हिंदुस्तानची चक्रवर्तिनी ' म्हणविलें. हिंदुस्तानांतल्या राज्यकारभारांतल्या प्रत्येक बाबीकडे त्यांचें लक्ष फार असे हें आम्हांला ठाऊक आहे. त्याप्रमाणेंच त्यांच्या कारकीर्दीच्या शेवट शेवटच्या वर्षीं आफ्रिकेंतल्या लढाईच्या संबंधानें महाराणी साहेबांविषयीं जी राजनिष्ठा हिंदुस्तानांतल्या राजेरजवाड्यांनीं प्रकट केली ती, आणि आपल्या देशाच्या बाहेर हिंदुस्तानच्यां सैन्यानें जे पराक्रम केले, तेही आम्ही जाणत आहों. आम्ही हिंदुस्तानांत गेलों होतों तेव्हां तेथें जें काय आम्हीं पाहिलें आहे, तें आम्ही कधींही विसरणार नाहीं, आणि आमच्या मातोश्रींनीं कित्ता घालून दिल्याप्रमाणें आम्ही आमच्या हिंदुस्तानांतल्या सर्व प्रकारच्या प्रजाजनांच्या हितार्थ प्रयत्न करूं, आणि त्यांच्याप्रमाणें आम्ही त्यांची अचल राजनिष्ठा आणि प्रेम हीं आपणाकडे ओढून घेऊं. "



पांचवे जार्ज बादशहा, महाराज्ञी मेरी व मुले. (पृष्ठ १११)

# परिशिष्ट तिसरें.

## पांचवे जार्ज बादशहा.

लोकप्रिय सातवे एडवर्ड बादशहा यांचे मरणानंतर लगेच त्यांचे द्वितीय पुत्र शहाजादे जार्ज फ्रेडरिक अर्नेस्ट यांजकडे ब्रिटिश साम्राज्याचें अधिपतित्व आलें असून ते ग्रेटब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे व समुद्रापलीकडील ब्रिटिश मुलुखांचे राजे, धर्मसंरक्षक व हिंदुस्तानचे बादशहा झाल्याची द्वाही फिरविण्यांत आली व ते पांचवे जार्ज या नांवानें सिंहासनारूढ झाले. ता. ७ मे रोजीं पार्लमेंटची बैठक होऊन लार्ड चान्सेलर व आणखी पन्नास लार्ड यांनीं शिरस्त्याप्रमाणें राजनिष्ठेच्या शपथा घेतल्या. त्याच दिवशीं प्रिव्ही कौन्सिलची सभा सेंट जेम्स राजवाड्यांत झाली. त्या प्रसंगीं पांचवे जार्ज राजांनीं लहानसें भाषण करून वडिलांचा कित्ता आपण गिरवूं व प्रजेच्या सनदशीर हक्कांचें पालन करूं अशा आशयाचें आश्वासन दिलें. ह्या बादशहांचें पूर्ववृत्त संक्षेपतः पुढें लिहिलें आहे.

यांचा जन्म ता. ३ जून इसवी सन १८६५ रोजीं झाला. यांचे वडील बंधु आल्बर्ट व्हिक्टर—ड्यूक आफ् क्लारेन्स हे सन १८९२ सालीं अल्पवयी मरण पावल्यामुळें यांच्याकडे राज्याचा वारसा आला. इंग्लंडांतील राजपुत्रांना सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची वहिवाट आहे. नुसतें बौद्धिक शिक्षण देत नाहींत. अनेक राजपुत्र असतील तेव्हां एकास आरमाराचें व दुसऱ्यास

लष्करी शिक्षण दिलेंच पाहिजे अशी चाल आहे. ग्रेटब्रिटनची सुरक्षितता विशेषतः आरमारावर अवलंबून असल्यामुळें एक राजपुत्र ' आडमिरल ' झालाच पाहिजे असें साधारणतः समजतात. या व्यवस्थेला अनुसरून इ. स. १८७७ सालीं म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षींच हे आणि त्यांचे वडील बंधु प्रिन्स व्हिक्टर या दोघांनाही ब्रिटानिया या लढाऊ गलबतावर आरमार-संबंधाच्या शिक्षणासाठीं ठेवण्यांत आलें. येथें दोन वर्षें शिक्षण घेतल्यावर त्यांस पृथ्वीपर्यटनाकरितां पाठविलें. या पर्यटनास तीन वर्षें लागलीं. त्यानंतर प्रिन्स जार्ज यांना अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या ' क्यानाडा ' नामक लढाऊ गलबतावर मिडशिपमन म्हणजे लढाऊ खलाशी नेमिलें, व सन १८८५ सालीं त्यांस लेफ्टेनंट नेमिलें. ही नेमणूक झाल्यानंतर त्यांस क्याप्टन [ गलबतावरचा मुख्य अधिकारी ] होण्याच्या परीक्षा द्याव्या लागल्या. या परीक्षा चांगल्या प्रकारें पास झाल्यावर त्यांस इ. स. १८९० सालीं अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या ' थ्रश ' नांवाच्या लढाऊ गलबतावर त्यांस क्याप्टनचें काम करण्यास नेमिलें. परंतु क्याप्टन ही पदवी सन १८९१ सालीं मिळाली. याच सुमारास त्यांनीं जमेका बेटांत भरलेलें औद्योगिक प्रदर्शन उघडलें. यानंतर प्रिन्स जार्ज हे कांहीं दिवस स्वदेशीं आले व आपल्या वडील बंधुसहवर्तमान ग्रेटब्रिटन, ऐर्लंड व नजीकचीं बेटें यांमध्यें त्यांनीं प्रवास केला. पुढें इ. स. १८९२ सालीं त्यांचे वडील बंधु तापाचे आजारानें अकस्मात् मृत्यु पावले. या दोघा बंधूंचें परस्परांवर अप्रतिम प्रेम असल्यामुळें वडील बंधूच्या मरणानें त्यांस फार दुःख झालें. वडील

बंधूच्या मरणामुळें राज्याचा वारसा प्रिन्स जार्ज यांजकडे आला. तेव्हांपासून त्यांच्या शिक्षणाची दिशा बदलावी लागली. तथापि त्यांस रीतीप्रमाणें आरमारी अधिकाराचे हुद्दे योग्य मुदतीनें मिळत गेले. तसेंच ते रीतीप्रमाणें लार्डांच्या सभेंत प्रविष्ट झाले व त्यांना यार्कचे डयूक ही पदवी प्राप्त झाली.

इ. स. १८९३ सालीं राजपुत्र जार्ज यांचा राजकन्या व्हिक्टोरिया मेरी आफ् टेक हिच्याशीं विवाह ठरल्याचें प्रसिद्ध झालें. ह्या राजकन्येचा विवाह प्रथमतः राजपुत्र आल्बर्ट व्हिक्टर यांच्याशीं ठरला होता. परंतु ते अकालीं मृत्यु पावल्यामुळें पुढें तिचें लग्न प्रिन्स जार्ज यांच्याशीं होण्याचें ठरलें. हा विवाह त्याच सालीं झाला. राजकन्या व्हिक्टोरिया मेरी यांचा इंग्लंडच्या राजघराण्याशीं फार जवळच्या नात्याचा संबंध आहे. त्यांचें बाळपण इंग्लंडमध्येंच गेलेलें आहे. त्यामुळें त्या इंग्लंडांत अगोदरच लोकप्रिय होत्या, आणि यामुळें हा विवाह इंग्लंडांतील प्रजेस फार पसंत पडला.

या बादशाही दंपत्यास पांच मुलगे आणि एक मुलगी अशीं सहा अपत्यें आहेत. वडील राजपुत्र एडवर्ड म्हणजे सध्यांचे युवराज यांचा जन्म ता० २० जून सन १८९४ रोजीं झाला.

इ. स. १८९८ त प्रिन्स जार्ज यांनीं आपलें आरमारखात्यांतील काम पुनः चालू केलें, आणि इंग्लिश खाडींतील आरमारांतल्या 'क्रेसंट' नामक लढाऊ गलबतावर ते अधिपति झाले. इ. स. १९०१ मध्यें त्यांना आडमिरलचा हुद्दा मिळाला आणि त्यांस आरमारावरील सैन्यांतलाही एक हुद्दा देण्यांत आला.

इ. स. १९०१ सालीं महाराणी व्हिक्टोरिया मृत्यु पावल्यावर

राजपुत्र जार्ज हे प्रिन्स आफ वेल्स म्हणजे युवराज झाले. याच वेळीं आस्ट्रेलिया बेटांतील इंग्लिश लोकांच्या निरनिराळ्या वसाहतींचें एक राज्य करून त्याला एकच पार्लमेंट द्यावें आणि ब्रिटिश साम्राज्याखालीं स्वातंत्र्य द्यावें असें ठरलें. या गोष्टीची सांगता करण्याकरितां माजी बादशहांनीं त्यांस आस्ट्रेलियांत पाठविलें. तें काम आटोपल्यावर त्यांनीं तिकडच्या प्रदेशांत बराच प्रवास केला.

इ. स. १९०५ सालीं प्रिन्स जार्ज हे पत्नीसह हिंदुस्तानदेश पाहण्यासाठीं आले होते. त्या वेळीं त्यांचा सर्व देशभर सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांकडून उत्तम प्रकारें आदरसत्कार झाला. या प्रवासाच्या वेळीं त्यांचा हिंदुस्तानसंबंधाची सर्व प्रकारची माहिती आस्थापूर्वक मिळविण्याचा हेतु दिसून आला. त्यांनीं ठिकठिकाणीं जीं भाषणें केलीं तीं पूर्ण कळकळीचीं आणि सहानुभूतिपर होतीं. त्यांच्या भाषणानें विलायतेंत अधिकारी वर्गाचे मनांत हिंदुस्तानाविषयीं अधिक आस्था उत्पन्न झाली. हिंदुस्तानांतून परत गेल्यावर लंडन येथील लार्ड मेयरनीं त्यांस प्रवास करून सुखरूप परत आल्याच्या स्वागतार्थ मेजवानी दिली. त्या प्रसंगीं प्रिन्स जार्ज यांनीं हिंदुस्तान देशासंबंधानें पुढील प्रमाणें पूर्ण सहानुभूतिपर उद्गार काढले.—"हिंदुस्तानांतील लोक शांत स्वभावाचे आहेत; त्यांची राहणी अगदीं साधी आहे; ते पूर्ण राजनिष्ठ आहेत; आणि त्यांची स्वधर्मावर उत्तम निष्ठा आहे, असें मला त्यांच्या स्वभावावरून दिसून आलें. आमचें राज्य न्यायाला आणि सत्याला अनुसरून आहे अशी सर्व

प्रजेची पूर्ण विश्वासाची समजूत आहे अशीही माझी खात्री झाली. तेथें असतांना मीं ज्या गोष्टी पाहिल्या व ऐकिल्या, त्यांवरून मला असें खात्रीनें वाटतें कीं, त्यांच्यावर राज्य करितांना आमच्या बाजूनें आम्ही प्रजेविषयीं सहानुभूति राखिली असतां आमचें राज्य चालविण्याचें काम फारच सुलभ होऊन जाईल. आपण अशा प्रकारची सहानुभूति दाखविली असतां तिचें हिंदुस्तानांतील प्रजाजन मोठ्या आदरानें चीज करितील असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. तेव्हां हिंदुस्तानांतील सर्व प्रकारच्या प्रजेचें हित साधून त्यांचें कल्याण होईल अशा प्रकारच्या आपण आणखीही गोष्टी केल्या असतां प्रजाजनांना आपल्याविषयीं जास्त खातरजमा वाटून आपणांवर त्यांचा अधिक विश्वास बसेल अशी आशा आपण कां करूं नये ?" हे उद्गार किती कळकळीचे आणि मनापासून निघालेले आहेत. या भाषणास आज आठ वर्षें होऊन गेलीं आहेत. तेच राजपुत्र सांप्रत आपले बादशहा झाले आहेत. तेव्हां आमच्या संबंधानें त्यांच्या मनांत जे पूर्ण कळकळीचे हेतु वागत आहेत, त्यांची पूर्तता करण्याचे शक्य तेवढे प्रयत्न ते मनोभावानें करितील अशी हिंदुस्तानांतील राजनिष्ठ प्रजाजनांस पूर्ण खात्री वाटत आहे.

आपले नवीन बादशहा यांस सर्वांगपूर्ण आणि प्रस्तुतच्या काळास उचित असें उत्तम प्रकारचें राजकीय शिक्षण मिळालेलें आहे. यांच्या इतकें देशपर्यटन राजांपैकीं कोणींच केलेलें नाहीं. अफाट ब्रिटिश साम्राज्याच्या सर्व भागांत ते फिरून आले

आहेत, आणि सर्व प्रजाजनांचें त्यांनीं प्रत्यक्ष अवलोकन केलें आहे. स्वदेशांतील निरनिराळे पक्ष आणि मुत्सद्दी यांची त्यांना पूर्ण माहिती आहे. त्यांचे विचार प्रगतीला अनुकूल असे आहेत व ते प्रजाजनांमध्यें पहिल्यापासून अगदीं पूर्णपणें मिळून मिसळून वागत आले आहेत, यामुळें त्यांचेवर लोकांचें प्रेम फार आहे. या सर्व गोष्टींमुळें त्यांची कारकीर्द अत्यंत लोकप्रिय होईल अशी सर्वांची खात्री आहे.

आमच्या देशाच्या संबंधानें पाहिलें तर त्यांचे पूर्ण सहानुभूतीचे उद्गार मागें आलेच आहेत. राज्यारोहणानंतरही त्यांचा जो निरोप इकडे आला आहे, तो पूर्ण कळकळीचा आहे. सदहू संदेश येणेंप्रमाणें:—

"माझ्या अत्यंत प्रिय पित्याच्या शोचनीय व आकस्मिक मृत्यूमुळें मला, प्रतापशाली व प्राचीन राजघराण्याचा वारस या नात्यानें, राजा व बादशहा म्हणून सिंहासनारूढ व्हावें लागत आहे. मी माझ्या हिंदुस्तानच्या मुलखांतील राजेरजवाडे, राज्यकर्ते संस्थानिक आणि इतर सर्व रहिवाशी यांचें अभिनंदन करितों.

मी सिंहासनारूढ झाल्यावर हिंदुस्तानांतील सर्व निरनिराळ्या जातींच्या, दर्ज्यांच्या व धर्मांच्या लोकांकडून सार्वभौम तक्ताबद्दल जी कळवळ्याची व अतिशयित राजनिष्ठा आणि तक्तारूढ व्यक्तीबद्दल खास प्रेम दाखविण्यांत आलें त्याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक आभार मानितों.

महाराणी व्हिक्टोरिया, ज्यांचें स्मरण होतांच मनांत आदर

उत्पन्न होतो, त्यांनीं इ. स. १८५८ सालीं राज्यकारभार प्रत्यक्ष आपल्याकडे घेतला त्या वेळीं हिंदी प्रजाजनांना व मांडलिक संस्थानांच्या अधिपतींना एक जाहीरनामा पाठविला, आणि त्यांचे प्रतापशाली चिरंजीव, म्हणजे माझे पूज्य व प्रिय वडील, यांनीं तदनंतर पन्नास वर्षांनीं तुम्हांस पाठविलेल्या आपल्या जाहीरनाम्यांत त्या अत्यंत प्रसिद्ध गोष्टींचें स्मरण दिलें. हे जाहीरनामे म्हणजे बादशाही राज्यपद्धतीच्या उदार व हितकारक धोरणाच्या उदार सनदाच होत, आणि त्या धोरणाप्रमाणें मी माझ्या पुढील सर्व आयुष्यांत निष्ठापूर्वक चालेन.

मरहुम-मलिक माआझम यांच्या इच्छेवरून व त्यांचा स्वतःचाच कित्ता गिरवून मी पांच वर्षांपूर्वी माझ्या राणीसह हिंदुस्तानांत आलों होतों. त्या एकंदर विस्तीर्ण देशांतील इतिहासप्रसिद्ध अशा मोठाल्या राज्यांची, आमच्यापेक्षां देखील जास्त प्राचीन अशा सुधारणेच्या स्मारकांची, राहणीच्या प्राचीन रीतिरिवाजांची, देशी संस्थानिकांची, आणि लोक, शहरें, कसबे व गांव यांची आम्हांला प्रत्यक्ष ओळख झाली. त्या अपूर्व प्रवासाचा ठळक ठसा किंवा त्याचे प्रेमसंबंध हे कधींही नाहींसे होणार नाहींत किंवा अंधुक होणार नाहींत. माझ्यापुढें जीं मोठालीं व दुर्घट कामें पडलेलीं आहेत त्यांत तुम्ही कर्तव्यतत्परतेनें व उत्साहपूर्वक मला साहाय्य कराल असा मला दृढ विश्वास आहे. हिंदुस्तानच्या कल्याणाबद्दल मला कळकळीची सहानुभूति असून राज्य करण्याच्या कामीं तिनें मी सदैव प्रेरित होईन, व तशीच सहानुभूति तुम्ही तत्परतेनें दाखवाल असा मला दृढ भरंवसा आहे."

हिंदुस्तानचा प्रवास आटपून परत जातांना " हिंदुस्तानांतील प्रजेविषयीं अधिक वात्सल्य आणि सहानुभूति पाहिजे. " अशा प्रकारचा संदेश ते आपल्या वडिलांस सांगण्याकरितां घेऊन गेले होते. तो संदेश सांगून झाल्यावर थोड्याच वर्षांनीं त्याप्रमाणें वागण्याची संधि त्यांस प्राप्त झाली आहे. मधील काळांत माजी बादशहांच्या सद्धेतूंमुळें आणि लार्ड मोर्ले, लार्ड मिंटो यांसारख्या कळकळीच्या मुत्सद्यांच्या उद्योगामुळें अनेक हितकारक गोष्टींचा पाया पडला आहे, आणि शब्दाप्रमाणें वागणूक होण्यास पुष्कळसा आरंभ झाला आहे. तेव्हां नवीन बादशहा या गोष्टी अशाच पुढें चालवून आपल्या कारकीर्दींत हिंदुस्तान देशाचें राज्य हें आस्ट्रेलिया, कानडा आणि दक्षिण आफ्रिका या वसाहतींप्रमाणेंच थोरवीचें पूर्ण द्योतक आहे असें करून सोडतील अशी लोकांना फार फार आशा वाटत आहे. ही आशा पूर्ण होण्यास बादशहांना परमेश्वर पुष्कळ दिवस सुखी राखून उत्तम बुद्धि आणि सामर्थ्य देवो, असें प्रजाजन मनोभावानें चिंतन करीत आहेत.

महाराज पांचवे जार्ज हे हिंदुस्तानचे बादशहा झाले, ह्या गोष्टीचें अभिनंदन करण्याकरितां हिंदुस्तानांत सर्वत्र आनंदोत्सव करण्यांत आले. त्या प्रसंगीं महाराष्ट्रांत गाइलेल्या अनेक गीतांपैकीं ईश्वर प्रार्थनेचें एक गीत या खालीं लिहितों.

# ईश–प्रार्थना.

[ राग–मांड ( मिश्र ); ताल–एक्का. ]

परमात्मन्! परमवरद! रक्ष रक्ष परम वंद्य,
सार्वभौम राजया, सदैव दे जया!
सतत तुझी वितत असो ईश्वरा! दया. ॥ १ ॥
तव दया अपार, शुद्ध, परमशुभमया! ॥ ध्रु० ॥
तदधिकृती। शुभद अती। कर महाशया! सदैव दे जया!
सतत तुझी वितत असो ईश्वरा! दया. ॥ २ ॥.
आयुर्बल धनसुखास सन्तत दे भूवरास;
धन्य धन्य ही जगती। वरुन पती। हा असो सती!
पूर्ण फलवती! सदैव दे जया!
सतत तुझी वितत असो ईश्वरा! दया. ॥ ३ ॥.
निहत करीं। सकल अरी। गिरिकुहरीं। खल दडोत कीं!
सदा खल दडोत कीं!
बहुवदान्य। नृप अनन्य। अग्रगण्य। लोकनायकीं,
असो भूपनायकीं! सदैव दे जया!
सतत तुझी वितत असो ईश्वरा! दया. ॥ ४ ॥
प्रीति नीति शान्ति दान्ति कांतिमंडिता,
कीर्ति वसो स्फूर्तिप्रद जगीं अखंडिता!
सर्व धरा एक पदीं कर विभो! युता!
परमात्मन् परमवरद! रक्ष रक्ष परमवंद्य,
सार्वभौम राजया, सदैव दे जया! ॥ ५ ॥

# जाहिरात.

**नारायण विठ्ठल आपटे, शिक्षक, ट्रेनिंग कालेज फार मेन, पुणें, यांनीं लिहिलेलीं पुस्तकें.**

**सर्व प्रकारच्या वाचकांकरितां.**

१. महाराज सखारामबोवा कवाडकर ह्यांचें चरित्र. किंमत ८८.

**आईबाप व शिक्षक ह्यांकरितां.**

* २. बालोद्यानशिक्षणसार. किंमत ८६.
* ३. बालशिक्षण भाग पहिला. किंमत ८६.
* ४. बालशिक्षण भाग दुसरा. किंमत ८७.
* ५. पदार्थपाठमाला गुच्छ पहिला. किंमत ८८.
* ६. पदार्थपाठमाला गुच्छ दुसरा. किंमत८८.
* ७. पदार्थपाठमाला गुच्छ तिसरा. किंमत ८१०.

**शिक्षक व मुलें ह्यांकरितां.**

* ८. ठाणें जिल्ह्याचें वर्णन. किंमत ८५.
* ९. शालोपयोगी कवाईत. किंमत ८१.
\+ १०. शाळेंतील गाणीं. किंमत ८१८६.
११. कवाइतीच्या हुकुमांचे शब्द. किंमत ८८९.
१२. शुद्धलेखनदीपिका. किंमत ८१.
१३. चिमुकल्या प्राण्यांच्या मजेदार गोष्टी, भाग १ला. किं.८३.
१४. नवीन भूमितीच्या प्रश्नांचें पृथक्करण, भाग१ला. किं. ८६.

* हीं सर्व पुस्तकें मुंबई इलाखा, वऱ्हाडसह मध्यप्रांत, बडोदें संस्थान व कोल्हापूर संस्थान ह्यांत मंजूर झालीं आहेत. + हें पुस्तक वऱ्हाडसह मध्यप्रांत, बडोदें संस्थान व कोल्हापूर संस्थान ह्यांत मंजूर झालें आहे.

हीं आणि इतर सर्व प्रकारचीं पुस्तकें मालकाकडे व आमचेकडे मिळतील. व्यापारी व शिक्षक ह्यांस घाऊक खरेदीवर योग्य कमिशन मिळेल.

व्यवस्थापक, नवीन किताबखाना, पुणें.